नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## नाशिकमध्ये जमावाची पोलिसांवर दगडफेक

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १६ :
नाशिक शहरातील कोठे गल्ली परिसरात असलेल्या अनधिकृत दर्गा काढण्याचे काम मध्यरात्री सुरू करण्यात आले. मात्र, त्या आधी रात्री उशिरा या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात जमाव जमा झाल्यामुळे काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी अश्रू धुराचा वापर केला. तर काही जणांना ताब्यात देखील घेण्यात आले आहे.
नाशिकच्या कोठे गल्ली परिसरातील अनधिकृत दर्गा हटवण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत होती. यासाठी मागील महिन्यातच काही हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलन देखील केले होते.

* वर्ष ५० * अंक २९१ * * अमरावती * गुरुवार, दिनांक १७ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## इंद्रपुरीतून विमान उड्डाण

आज अमरावती येथून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते अमरावती ते मुंबई या वायू मार्गावरील विमानसेवा सुरू झालेली आहे. आतापर्यंत अमरावतीकरांना विमानाने जायचे असल्यास नागपूरला जावे लागत असे. म्हणजेच दीडशे किलोमीटरचा प्रवास केल्यावरती सात-आठ हजार ते वीस हजार पर्यंत भाडे देऊन प्रवाशांना मुंबईला जाण्यासाठी विमानात बसता येत असे. आता पुढील काही दिवस तरी अमरावती ते मुंबई विमानसेवा प्रवास भाडे फक्त २१०० /- रुपये राहणार आहे. पण हे भाडे आहे तोपर्यंत आता नागपूरच्या विमान प्रवाशांनी अमरावतीला येऊन विमान पकडले. तर त्यांचा बराच पैसा वाचेल. नागपूर ते अमरावती दीड दोन तासात पोहोचता येते. अशा प्रकारे हा नवा फंडा आणि नवीन प्रवासाचा हातखंडा प्रयोग सुरू होणार आहे. अर्थात हा नवा फंडा वापरलाही जाणार आहे. अमरावती ते मुंबई हा प्रवास जर २१०० रुपयांमध्ये होऊ शकतो. तर नागपूर ते मुंबई हा प्रवास तीन-साडेतीन हजारात का होऊ नये? या विमानतळाची उभारणी कल्पना पांडेय नामक महिला अधिकाऱ्यांनी केली आहे, असे म्हणतात. अर्थात त्यांच्या नावानेच हे काम झालेले आहे. अधिकारी फक्त हुकूम देतात. तसे हुकूम या बाईने दिले असावेत. विमानतळाचा उपयोग आतापर्यंत फक्त अति महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजेच व्हीआयपींसाठी होत असे. आता ७२ प्रवाशांना घेऊन जाईल. असे मोठ्या एअरबससारखे विमान अमरावती ते मुंबई पर्यंत ये-जा करणार आहे. या विमानाचे वेळापत्रक ठरलेल्या वेळा पाळू शकेल काय? हा सुद्धा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी नागपूर ते अकोला किंवा अगदी नांदेड पर्यंत सुद्धा विमान सेवा सुरू झालेली होती. अर्ध्या तासात ते विमान अकोल्याहून नागपूरला पोहोचणार होते. त्याचे तिकीट आम्ही सुद्धा काढले होते. पण ते विमान ठरलेल्या वेळेनंतर चक्क साडेचार तास उशिरांनी जाणार होते. अर्ध्या तासाच्या प्रवासासाठी साडेचार तास वाट कोण पाहणार आणि मग काही दिवसातच त्या विमान प्रवासाचे परिपूर्ण बारा वाजलेले आम्ही पाहिलेले आहेत. आता बरीच प्रगती झालेली आहे, हे मान्य आहे. त्यामुळे या नवीन विमान प्रवासालाही चांगली गती येईल. प्रवाशांची अजिबात दुर्गती होणार नाही. अशी कल्पना करून आपण हे विमानतळ उभारणाऱ्या पांडेय बाईंना शुभेच्छा देऊया. याचे कारण असे की या कल्पना पांडेय बाईने सर्व श्रेय स्वतःकडे घेतलेले आहे. म्हणजे विमान उड्डाणाचे सर्व कार्य पांडेय बाईंच्या हातानेच झालेले असेल, असे समजायला काही हरकत नाही. इंद्रपुरी अमरावती कोणे एकेकाळी सिनेमा उद्योगाची राजधानी होती. आताही या नगरीतून मोठा व्यापार चालतो. फक्त वेळेचे बंधन पाळले आणि भाड्यात भरमसाठ वाढ केली नाही. तर यांचे विमान जमिनीवर येणार नाही याची खात्री आहे. अमरावतीची जनता हुशार आहे. त्याहून विमानाने जाणारे अजूनही हुशार असतात. वेळ नावाची गोष्ट असते. त्याच वेळेची काही गणिते असतात. तेव्हा या गोष्टीबाबत 'चार दिनों की चांदनी, फिर अंधेरी रात' असे होऊ नये. हीच आमची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# पायलट ट्रेनिंग स्कूलमुळे अमरावती जगाच्या नकाशावर

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १६ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते विमानतळ लोकार्पण सोहळा पार पडला. अमरावती येथे पायलट ट्रेनिंग स्कूल सुरू होणार असून यामुळे अमरावती जगाच्या नकाशावर येणार आहे, केंद्राने पहिले विमान आम्हाला दिले, त्याच विमानातून आम्ही आलो आहोत, असे फडणवीस यावेळी म्हणाले.
आज या एअरपोर्टचे काम आपण पूर्ण केले. २०१९ साली काम सुरू केले होते. मोदींच्या सरकारमध्ये प्रयत्न करून महाराष्ट्र आणि केंद्र सरकारने काम हाती घेतले. धावपट्टीचे विस्तारीकरण केले, नवनीत राणा सोबत होत्या. त्यानंतर काही कारणाने बंद पडले होते. केंद्र सरकारशी संबंधित काम सुरू होते. राज्य सरकारशी संबंधित काम संथगतीने होते. पण शिंदे सरकार आल्यानंतर वेगाने काम सुरू झाले, असे ते म्हणाले.
अमरावती येथे सुरू झालेले हे विमानतळ आपल्याला अजून वाढवायचे आहे. जवळपास ३ हजार मीटर पर्यंत धावपट्टी बनवावी लागेल. ज्यामुळे अमरावतीच्या विमानतळावर कुठलेही विमान उतरू शकेल. यामुळे विदर्भात दुसरे मोठे विमानतळ उभे राहण्यास मदत होणार आहे.




### तेव्हा मी 'पायलट' अन् फडणवीस व अजितदादा 'को-पायलट'...

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चौफेर फटकेबाजी केली. २०१४ ते २०१९ या काळात फडणवीस मुख्यमंत्री असताना विमानतळाच्या कामाची सुरुवात झाली. पण मग मधले जे काही सरकार आले, त्या सरकारच्या माध्यमातून पूर्णपणे काम बंद झाले. पुन्हा २०२२ ला जेव्हा तुमच्या मनातले सर्वसामान्यांच्या मनातले महायुतीचे सरकार आले. त्यामुळे अतिशय कमी वेळात आपण अमरावती येथील विमानतळाचे काम सुरू करू शकलो. त्यावेळेस विमानाचा पायलट मी होतो आणि को-पायलट देवेंद्र फडणवीस आणि अजित दादा होते. मात्र आता देवेंद्रजी पायलट आहे आणि आम्ही दोघे को पायलट, असे मिश्किल वक्तव्य करत एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर टीका केली.
शिंदे म्हणाले की, पायलटची सीट बदलली तरी विकासाचे विमान हे कायम तेच आहे आणि आम्ही त्याच गतीने समोर जात आहोत. कारण आमचे इंजिन तेच आहे. आधीच्या सरकारला केवळ अडचणीचा पाढा पाठ होता.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणले, अमरावती येथे पायलट ट्रेनिंग स्कूल आल्यामुळे मोठ्या प्रमाणात इकनॉमिक ॲक्टिविटी सुरू होत आहे, अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. याचे वेगवेगळे फायदे आपल्याला मिळणार आहेत. रोजगार निर्मिती होणार आहे. अमरावती हे केवळ एक विमानतळ म्हणून ओळखले जाणार नाही, तर जगाच्या पाठीवर साऊथ ईस्ट एशियामधली सर्वात मोठी पायलट ट्रेनिंग स्कूल आपल्या अमरावतीमध्ये सुरू होत आहे. यावेळी त्यांनी विदर्भात सुरू होत असलेले प्रकल्प आणि रोजगार निर्मितीविषयी माहिती दिली.

## वक्फ कायद्याला स्थगितीस सुप्रीम कोर्टाचा नकार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :
केंद्र सरकारच्या वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध बुधवारी सर्वोच्च न्यायालयात दोन तास सुनावणी झाली. या कायद्याविरुद्ध १०० हून अधिक याचिका दाखल झाल्या आहेत.
सर्वोच्च न्यायालयाने या मुद्द्यांवर केंद्राकडून उत्तर मागितले आहे, परंतु न्यायालयाने कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती दिलेली नाही. वक्फ कायद्याच्या निषेधार्थ देशभरात होत असलेल्या हिंसाचाराबद्दल सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली. यावर एसजी म्हणाले की, दबाव आणण्यासाठी हिंसाचाराचा वापर केला जाऊ शकतो असे वाटू नये.
सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार, केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल (एसजी) तुषार मेहता युक्तिवाद करत आहेत. तर कपिल सिब्बल, राजीव धवन, अभिषेक मनु सिंघवी, सीयू सिंग हे कायद्याच्या विरोधात युक्तिवाद करत आहेत.
आता सर्वोच्च न्यायालय गुरुवारी दुपारी २ वाजता या प्रकरणाची सुनावणी करेल. आतापर्यंत झालेल्या सुनावणीत, अपीलकर्त्यांनी प्रामुख्याने वक्फ बोर्डाची स्थापना, जुन्या वक्फ मालमत्तेची नोंदणी, बोर्ड सदस्यांमध्ये बिगर मुस्लिमांचा समावेश आणि वादांचे निराकरण यावर युक्तिवाद केला.

## ट्रम्प यांनी चीनवर २४५% कर लादला

■ वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. १६ :
अमेरिका आणि चीनमधील टॅरिफ वॉर आणखी वाढले आहे. अमेरिकेने आता चीनवर आणखी १००% कर लादला आहे. यासह, चिनी वस्तूंवरील एकूण शुल्क २४५% पर्यंत वाढले आहे. चीनने ११ एप्रिल रोजी अमेरिकन वस्तूंवर १२५% कर लादला होता, त्याला प्रत्युत्तर म्हणून ट्रम्प यांनी नवीन कर लादला आहे.
यापूर्वी चीनने म्हटले होते की आता ते अमेरिकेने लादलेल्या कोणत्याही अतिरिक्त शुल्काला प्रतिसाद देणार नाही. ११ एप्रिल रोजी चीनने म्हटले की अमेरिकेने लादलेले असामान्य शुल्क आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यापार नियमांचे गंभीर उल्लंघन करते. हे दबाव आणि धमकीचे पूर्णपणे एकतर्फी धोरण आहे. अमेरिकेने जरी शुल्क आणखी वाढवले तरी आता त्याचा काही अर्थ राहणार नाही. शेवटी ते जागतिक अर्थव्यवस्थेच्या इतिहासात एक हास्यास्पद पात्र बनतील, असेही चीनने म्हटले होते.
अमेरिकेसोबतच्या वाढत्या टॅरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी पहिल्यांदाच विधान केले आहे. ते म्हणाले की, चीन कोणालाही घाबरत नाही. गेल्या ७० वर्षात चीनचा विकास हा कठोर परिश्रम आणि स्वावलंबनाचा परिणाम आहे. चीन कधीही इतरांच्या दानधर्मावर अवलंबून राहिलेले नाही. किंवा कधीही कोणाच्या बळाला घाबरले नाही. जग कितीही बदलले तरी चीनला काळजी वाटणार नाही. स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांच्याशी झालेल्या भेटीदरम्यान जिनपिंग यांनी हे सांगितले. सांचेझ चीनच्या दौऱ्यावर आले.
ट्रम्प यांनी कर जाहीर केल्यानंतर चीनला भेट देणारे सांचेझ हे पहिले युरोपीय नेते आहेत. गेल्या २ वर्षात त्यांनी तीन वेळा चीनला भेट दिली आहे. सांचेझ यांनीही ट्रम्प यांच्यावर शुल्कांवर टीका केली आहे.

## आगीत ५ ठार

### मृतांत ४ मुले, १५ बेपत्ता

■ वृत्तसंस्था, मुझफ्फरपूर, दि. १६ :
बिहारमधील मुझफ्फरपूरमध्ये बुधवारी दलित वस्तीतील ५० हून अधिक घरांना आग लागली. या अपघातात चार मुलांसह पाच जणांचा जळून मृत्यू झाला. त्याच वेळी, १५ मुले बेपत्ता आहेत. बरियारपूर पोलिस स्टेशन हद्दीतील रामपूर मणी पंचायतीत ही घटना घडली.
गोलक पासवान यांच्या घरात शॉर्ट सर्किटमुळे आग लागली आणि काही वेळातच ती संपूर्ण झोपडपट्टीत पसरली, असे सांगितले जात आहे. लोकांना काहीही समजेल तोपर्यंत जोरदार वाऱ्यामुळे आग खूप वेगाने पसरली. आग खूप तीव्र होती. त्यामुळे मुले घाबरली. बाहेर पडता आले नाही आणि आगीत अडकली. 'आगीत ४ मुले आणि एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. एसडीएमना घटनास्थळी पाठवण्यात आले आहे. मृतांच्या कुटुंबाला भरपाई दिली जाईल आणि लोकांसाठी २ दिवसांसाठी खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
स्थानिक लोकांनी सांगितले की, राजू पासवान नावाच्या व्यक्तीची तीन मुले जळून मृत्युमुखी पडली. या मुलांचे वय १२ वर्षे, आठ वर्षे आणि नऊ वर्षे आहे.

## देशभरात ईडी कार्यालयांबाहेर काँग्रेसची निदर्शने




### नॅशनल हेराल्ड केसमध्ये सोनिया, राहुलविरुद्ध आरोपपत्रास विरोध

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :
काँग्रेसच्या नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) शी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) पहिले आरोपपत्र दाखल केले. यामध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी, सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांची नावे आहेत.
याच्या निषेधार्थ, काँग्रेसने आज बुधवारी देशभरातील ईडी कार्यालयांबाहेर निदर्शने केली. काँग्रेसचे संघटन सरचिटणीस केसी वेणुगोपाल म्हणाले होते की, पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहा धमकावण्याचे काम करत आहेत.
या प्रकरणाची सुनावणी २५ एप्रिल रोजी दिल्लीतील राऊस अव्हेन्यू कोर्टात होईल. न्यायालयाने ईडीकडून या प्रकरणाची केस डायरीही मागितली आहे. २०१२ मध्ये, भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी सोनिया, राहुल आणि त्यांच्या सहयोगी कंपन्यांशी संबंधित लोकांविरुद्ध या प्रकरणाची तक्रार केली होती. दरम्यान, ईडीच्या कारवाईविरोधात काँग्रेसच्यावतिने देशभरात निदर्शने करण्यात आली . यावेळी ईडी कार्यालयाबाहेर तगडा पोलीस बंदोबस्त होता.

### झटापटीत खासदार वर्षा गायकवाड जखमी

मुंबईतील ईडी कार्यालयाबाहेरील आंदोलनावेळी काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड जखमी झाल्या. त्यांना जी. टी. रुग्णालयात दाखल करण्यात आले.
वर्षा गायकवाड म्हणाल्या की, सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या राजकीय हेतूने प्रेरित आरोपपत्राविरुद्ध मुंबई काँग्रेसच्या वतीने शांततेत निदर्शने करत होते, परंतु मुंबई पोलिसांनी आम्हाला निदर्शने करू दिली नाही. इतर कार्यकर्त्यांसह मलाही मारहाण करण्यात आली.

## मंदिर उत्सवात निखाऱ्यावर पडून एकाचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, चेन्नई, दि. १६ :
तामिळनाडूच्या रामनाथपुरम जिल्ह्यात एका उत्सवादरम्यान ५६ वर्षीय भक्त केशवन यांचा अंगाऱ्यात पडून मृत्यू झाला. कुयावनकुडी येथे अंगाऱ्यातून चालण्याच्या विधीदरम्यान ही घटना घडली. या अपघाताचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे.
स्थानिक पातळीवर थेमिधी थिरुविझा म्हणून ओळखला जाणारा हा विधी वार्षिक सुब्बैया मंदिर उत्सवाचा एक भाग आहे. जे यावेळी १० एप्रिल रोजी सुरू झाले. भाविक त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी



जळत्या निखाऱ्यावर अनवाणी चालतात.
१० एप्रिलपासून सुरू झालेल्या थेमिधी थिरुविझाच्या विधीसाठी वलंतरवाई गावातील रहिवासी केशवन देखील आला होता.

## सहा कोटींचा गांजा नष्ट

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १६ :
राज्याचे मुख्यमंत्री यांचे १०० दिवसांकरिता सात कलमी कार्यक्रम अंतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तलय हद्दीत दाखल असलेल्या एनडीपीएस गुन्हयातील मुद्देमाल नाशक करण्याबाबत पाऊल उचलले आहे.
पिंपरी चिंचवड पोलीसांचे अंमली पदार्थ विरोधी पथकाने सहा कोटी २८ लाख ५१ हजार रुपये किंमतीचा मध्यवर्ती गोडाऊन मधील रेकॉर्डवरील एकूण १२५७ किलो २५ ग्रॅम गांजा रांजणगाव एमआयडीसी मधील भट्टीत नष्ट करण्यात आला आहे.

## काँग्रेस नेत्यांवर खोटे गुन्हे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
भाजप सरकार काँग्रेस नेत्यांवर खोटे गुन्हे दाखल करत आहेत. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी व लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्यावर राजकीय सुडबुद्धीने ईडी कारवाई करण्यात आली आहे. यापूर्वीही ईडीने सोनिया व राहुल गांधी यांची चौकशी केली



आहे. अशाप्रकारे काँग्रेस नेत्यांना नाहक त्रास दिला जात आहे, असा आरोप काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केला.
काँग्रेसने दंगलग्रस्त नागपुरात आज काँग्रेसने सद्भावना शांती मार्च काढला. यावेळी ते बोलत होते.ते म्हणाले, भाजपा सरकारच्या विरोधात निर्भिडपणे उभे राहणाऱ्या काँग्रेसच्या देशभरातील नेत्यांवर मोदी सरकार कारवाई करत आहे. काँग्रेस पक्ष ईडी, सीबीआयच्या कारवायांना घाबरत नाही. काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता एकजूट होऊन या कारवाईचा निषेध करेल. जाती धर्माच्या नावावर सुरु असलेला भेदभाव थाबंवण्यासाठी काँग्रेसने सदभावना यात्रा काढली असून अशा सदभावना यात्रा राज्यभर काढल्या गेल्या पाहिजे.
भाजपा जाती धर्माच्या नावाखाली भेदभाव करत आहे. नागपुरात सर्व जाती धमार्चे लोक गुण्या गोविंदाने नांदत असताना या शहरात हिंसाचार झाला त्याला जबाबदार कोण? मुख्यमंत्री आणि गृहमंत्री नागपूरचे आहेत तरीही त्यांना या घटनेची माहिती कशी मिळाली नाही? गुप्तचर विभागाने त्यांना माहिती दिली होती काय आणि घटनेपूर्वी माहिती मिळाल्यानंतर काय केले. आणि जर दंगलीची चाहुलच लागली नसेल तर हे गुप्तचर विभागाचे अपयश असल्याचे ते म्हणाले.

## राज्यपाल भवनाच्या जागेवर शिवस्मारक बांधा




### उद्धव ठाकरेंनी केले उदयराजेंच्या मागणीचे समर्थन

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १६ :
उद्धव ठाकरे यांनी बुधवारी नाशिक येथील निर्धार शिबिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर टीकेची झोड उठवत सर्वसामान्य शिवसैनिकांना अन्यायाविरोधात पेटून उठण्याचे आवाहन केले.
सध्या उन्हाळा खूपच तापलाय... महाराष्ट्र खूप गरम झालाय. पण हा सूर्य आग ओकत असताना आपली डोकी उन्हाने नव्हे, तर अन्यायाविरोधात लढण्यासाठी पेटले पाहिजे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी मुंबईतील राज्यपाल भवनाच्या जागेवर छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक बांधण्याचीही मागणी केली. या प्रकरणी त्यांनी भाजप खासदार उदयराजे भोसले यांच्या मागणीचे समर्थन केले.
उद्धव ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले, मला बाळासाहेब व माँ साहेबांसारखे आई-वडील लाभले हे माझे भाग्य आहे. त्यांनी तुमच्यासारखी पुण्याई माझ्यामागे उभी करून ठेवली. हे सत्तेपेक्षा कित्येक पटीने जास्त आहे. कारण, सत्ता असली की सर्वजण त्याच्यामागे जातात. ही जगरहाटी आहे. पण सत्ता नसताना जे राहतात, तो खरा निष्ठावन व तो आपला खरा सोबती असतो. सत्यनारायणाची पूजा असली की प्रसादाला सगळेच जातात.
आज आपली मुंबई अक्षरशः लुटली जात आहे. सर्वकाही गुजरातला नेले जात आहे. पंडित जवाहरलाल नेहरू आपल्या काळात उघड्या गाडीत फिरत होते. पण मराठी माणूस एवढा पिसाळला की, त्यांनी नेहरुंनाही महाराष्ट्रात बंद गाडीतून फिरावे लागले. कारण, महाराष्ट्र कुणाचीही मस्ती खपवून घेत नाही.

**अमित शहांवर साधला निशाणा**

उद्धव ठाकरेंनी यावेळी अमित शहांवरही निशाणा साधला. अमित शहांची गेल्या काही काळातील वक्तव्य ऐकली तरी आपण कपाळावर हात मारून घेतो. शिवाजी महाराजांचा उल्लेख शहांनी एकेरी नावाने केला, हे काय चालले आहे? असा सवाल त्यांनी केला.

## दोन योजनांच्या लाभार्थी असल्याने एक हजार कपात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
लाडकी बहीण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवरील वाढता भार कमी करण्यासाठी राज्य सरकारकडून पावले उचलली जात आहेत. यापूर्वी निकषात न बसणाऱ्या तब्बल ११ लाख लाडक्या बहिणी अपात्र ठरवून त्यांचे पैसे बंद करण्यात आले होते.
आता शेतकरी सन्मान योजनेचाही लाभ घेणाऱ्या ८ लाख महिलांची छाननी करण्यात आली असून त्यांना लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपयांऐवजी फक्त ५०० रुपयेच दरमहा देण्यात येणार आहेत. एकाच वेळी दोन सरकारी योजनेचा लाभ घेत असल्यामुळे त्यांचे प्रत्येकी एक हजार रुपये कपात केले जाणार आहेत.
या निर्णयामुळे सरकारचे दरमहा ८० कोटी रुपये वाचणार आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. यात लाभ झाला व पुन्हा महायुतीचेच सरकार स्पष्ट बहुमताने सत्तेवर आले. मात्र सरकार स्थापन झाल्यानंतर सरकारला




लाडक्या बहिर्णीपेक्षा तिजोरीची काळजी जास्त वाटू लागली. त्यामुळे या योजनेतील लाभार्थींचा आकडा कमी कसा करता येईल यासाठी छाननी सुरू करण्यात आली.
या योजनेत काही अटी-शर्ती सुरुवातीपासूनच टाकण्यात आल्या होत्या, पण निवडणुकीपूर्वी त्या अटींकडे सपशेल डोळेझाक करुन सरकारने अर्ज करणाऱ्या बहुतांश महिलांना पैशाचे वाटप केले. निवडणूक निकालानंतर अर्जाची छाननी सुरु झाली व अपात्र लाभार्थीची नावे यादीतून कट करण्यास सुरुवात झाली.
संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी, वय वर्षे ६५ पेक्षा जास्त असलेल्या महिला आणि कुटुंबातील सदस्यांच्या नावे वाहन असलेल्या महिला आणि वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिला या योजनेतून अपात्र ठरवल्या जात आहेत. दोन योजनेचा लाभ घेत असलेल्या महिलांच्या अर्जांची छाननी सुरू आहे. शेतकरी सन्मान योजनेत ज्या महिलांना १ हजार रुपये अनुदान मिळत आहे. त्याच महिला लाडकी बहीण योजनेच्याही लाभार्थी आहेत. अशा महिलांना दोन्ही योजनांतून ३ हजार रुपये मिळत होते. मात्र अशा ८ लाख महिलांचे आता लाडकी बहीण योजनेचे अनुदान १५०० रुपयांवरुन फक्त ५०० रुपये केले आहे.

## पाच सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ **मुंबई:** महाराष्ट्र शासनाने पाच सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या असून, आस्तिककुमार पांडे यांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) सहआयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यासह अन्य अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

रमेश चव्हाण यांची राज्य कामगार विमा योजनेचे आयुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे. राहुल गुप्ता यांच्याकडे हिंगोलीच्या जिल्हाधिकारीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सत्यम गांधी यांना सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून नेमण्यात आले आहे. तसेच, विशाल खत्री यांना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (आयटीडीपी) डहाणू येथे प्रकल्प अधिकारी आणि डहाणू उपविभागाचे सहायक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

## कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणावर कारवाई



■ **मुंबई:** पुणे जिल्ह्यातील कुरकुंभ (ता. दौंड) येथील औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संयुक्त मोहीम राबवून कारखान्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचे नमुने गोळा करून आवश्यक कारवाई करावी, असे निर्देश कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. यात स्थानिक ग्रामपंचायत प्रतिनिधींचाही समावेश करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

कुरकुंभ येथील अल्कली अमाइन्स कंपनीत नुकत्याच झालेल्या स्फोटानंतर निर्माण झालेल्या परिस्थिती आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर कामगारमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी आमदार राहुल कुल, एमआयडीसी अधिकारी, रासायनिक उद्योगांचे प्रतिनिधी, पर्यावरण आणि कामगार विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. फुंडकर यांनी रासायनिक उद्योगांच्या संख्येमुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी विशेष उपाययोजनांची गरज असल्याचे सांगितले. त्यांनी स्वतंत्र पथक गठित करून औद्योगिक परिसराची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले.

## पंडित पाटलांचा शेकापला रामराम



■ **मुंबई:** शेकापला मोठा धक्का बसला आहे. जयंत पाटील यांचे बंधू पंडित पाटील यांनी आपल्या हजारो समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांनी यापूर्वी आलिबाग विधानसभेचे नेतृत्व केले आहे. भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाणांच्या नेतृत्वात पक्ष प्रवेश झाला आहे.

दरम्यान पंडित पाटील म्हणाले की, यावेळी ते म्हणाले की, मला भांडण करायची गरज नाही. जिल्हा बँक संचालक, जिल्हा परिषद सदस्य, सगळे आज आले आहेत. पंडीत शेट भाजपात येणे शक्य नव्हते. पण मी धारप साहेब आणि चव्हाण साहेब यांना शब्द दिला होता. माझ्या ज्ञानाचा उपयोग भारतीय जनता पार्टीच्या संघटनेला होईल. रायगड जिल्ह्यात मला मानणारा मोठा वर्ग असून त्याचा भारतीय जनता पार्टीला याचा मोठा फायदा होईल, शिवाय आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीत पंडित पाटील काय आहे ते इतरांना कळेल, असा टोला जयंत पाटलांचे नाव न घेता लगावला आहे.

दुसरीकडे, पंडित पाटील यांच्या भाजपमध्ये जाण्याने फरक पडत नाही, मतदार शेकापसोबतच राहतील, अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी दिली. तर मी उद्या पक्ष सोडला तरीही मतदार शेकापसोबत राहतील, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## भिडेंना वाघ्या कुत्रा तर चावला नाही?



■ **मुंबई:** संभाजी भिडे यांना रायगडावरील वाघ्या कुत्रा तर चावला नाही ना? अशा आशयाची एक वादग्रस्त पोस्ट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे.

संभाजी भिडे सोमवारी रात्री सांगली येथे धारकऱ्याकडे जेवणाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर ते घरी परत येत होते. तेव्हा शहरातील माळी गल्ली भागात एका कुत्र्याने अचानक त्यांच्यावर हल्ला चढवत त्यांच्या डाव्या पायाचा चावा घेतला. सांगली महापालिकेने शहरात मोकाट कुत्र्यांची धरपकड सुरू केली आहे. या घटनेची राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा रंगली असताना आमदार अमोल मिटकरी यांनी एका ट्विटद्वारे संभाजी भिडे यांचा चिमटा काढला आहे. त्यांना चावलेला कुत्रा वाघ्या तर नव्हता ना? .....जो कुणी असेल त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. खटला फास्ट ट्रॅक मध्ये चालला पाहिजे. चावतो म्हणजे काय? मुगलाई लागलीय का? असा सवाल मिटकरी यांनी आपल्या पोस्टद्वारे केला आहे. त्यांच्या या पोस्टवर उलटसुलट प्रतिक्रियांचा महापूर आला आहे. अनेकांनी त्यांच्या या भूमिकेचे समर्थन केले आहे. तर काहींनी त्यांच्यावर टीका केली आहे.

## संजयकाका उद्या बोलायचं काय?



■ **मुंबई:** मुंबईत रस्त्याचा घोटाळा असेल, पाणी टंचाई असेल, कचऱ्याचा प्रॉब्लेम असेल, या सगळ्या गोष्टींवर बोलत असताना मला एक गोष्ट जाणवली की, प्रत्येक जिल्ह्यात, विभागात असं शिबीर होणं गरजेच आहे. आज आपल्याला वाटचाल कशी करणार आहोत, असं आदित्य ठाकरे नाशिकमध्ये म्हणाले.

आज जेव्हा मला नाशिकला यायचं होतं, तेव्हा मी राऊतसाहेबांना फोन केला. संजयकाका उद्या बोलायचं काय? मला विषय काय दिलाय? ते लगेच बोलले, महाराष्ट्र चाललाय तरी कुठे? या विषयावर बोलं. प्रश्न हाच आहे की, महाराष्ट्र चाललाय तरी कुठे? या सरकारला १०० दिवस उलटून गेले आहेत, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

# फिल्म इंडस्ट्री दुसरीकडे घेऊन जाणे शक्य नाही

### मुख्यमंत्री फडणवीसांची ग्वाही : यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथांना नाव न घेता टोला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** कोणतेही राज्य फिल्मसिटी तयार करू शकते. यावर कोणतेही निर्बंध नाही. पण चित्रपटसृष्टीसाठी मुंबईत जी नैसर्गिक परिसंस्था अस्तित्वात आहे ती इतर कोणत्याही शहरात निर्माण होणे फार कठीण आहे. त्यामुळे कोणी सेट तयार करून शूटिंगसाठी जागा उपलब्ध करून देत असेल तर त्याचे स्वागतच आहे. पण सध्या तरी मुंबईचा चित्रपट उद्योग दुसऱ्या कोणत्याही शहरात जाईल हे शक्य नाही. अशी तिखट टीका मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे नाव न घेता केली.



मुंबईच्या चित्रपट उद्योगाला इतर शहरांमध्ये नेण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांबाबत विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. याबाबत ते पुढे म्हणाले की, आता महाराष्ट्र सरकार काय निर्माण करत आहे. आता महाराष्ट्र सरकार जे काही निर्माण करत आहे. त्यामुळे जगातील फिल्म इंडस्ट्री आणि मनोरंजन उद्योग मुंबईत येणार आहेत.

विशेष म्हणजे, यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना यमुना प्राधिकरणाच्या सेक्टर २१ मध्ये फिल्मसिटी बनवायची आहे. हा त्याचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याचे म्हटले जात आहे. बॉलीवूड निर्माते बोनी कपूर यांची कंपनी बेव्यू भुतानी फिल्म सिटी प्रा. लि.कडेही या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्याची पायाभरणी ६ एप्रिल रोजी होणार होती, परंतु काही कारणांमुळे ते शक्य झाले नाही.

ऑडिओ, व्हिडिओ आणि मनोरंजन क्षेत्रात क्रिएटिव्ह स्पेस निर्माण झाली आहे. म्हणून जगातील सर्वात मोठी शिखर परिषद भारतात, विशेषतः मुंबईत आयोजित करावी ही मोदींची संकल्पना होती. म्हणूनच, मुंबईत वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल आणि एंटरटेनमेंट समिट (वेव्हज समिट २०२५) आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. ते म्हणाले की, जागतिक स्तरावरचे हे संपूर्ण आयोजन १ मे ते ४ मे दरम्यान होणार आहे. ज्यामध्ये जगभरातील सुमारे १०० देशांतील ५ हजारांहून अधिक दिग्गज व्यक्ती येणार आहेत.

# पावसाळ्यापूर्वी खड्डेमुक्त रस्ते

### उपमुख्यमंत्री शिंदे यांची ग्वाही



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :** मुंबईतील रस्त्यांना कायमस्वरूपी खड्डेमुक्त करण्यासाठी सिमेंट काँक्रिट रस्त्यांचा निर्णय घेण्यात आला असून, मे २०२५ अखेरपर्यंत काँक्रीटीकरण पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) आणि एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना दिले.

कामाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा देत त्यांनी पावसाळ्यापूर्वी चौक ते चौक रस्ते वाहतूकयोग्य करण्याचे आणि मॅनहोल, सांडपाणी वाहिन्यांची स्वच्छता प्राधान्याने करण्याचे आदेश दिले.

शिंदे यांनी मुंबई शहर आणि पूर्व उपनगरातील काँक्रीट रस्त्यांच्या कामांची पाहणी केली. पाहणी बॉम्बे हॉस्पिटलजवळील चौकापासून सुरू होऊन सी विभाग (आर.एस. सप्रे मार्ग), एफ उत्तर विभाग (माटुंगा, जामे जमशेद मार्ग) आणि एम पश्चिम विभाग (चेंबूर, मार्ग क्रमांक २१) येथील कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत त्यांनी सुरक्षित आणि सुखकर प्रवासासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. बैठकीला मंत्री मंगल प्रभात लोढा, बीएमसी आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर उपस्थित होते.

### प्रवाशांना चांगली सुविधा न देणाऱ्या

## हॉटेलचे थांबे रद्द करा

### सरनाईक यांचे एसटी प्रशासनाला निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान एसटी बसेस थांबत असलेल्या हॉटेल-मोटेल थांब्यावर प्रवाशांना आरोग्यदायी आणि किफायतशीर सुविधा मिळत नसतील तर असे थांबे रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत.



या संदर्भात सध्या सुरू असलेल्या सर्व थांब्याचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल पुढील १५ दिवसात सादर करण्याच्या सूचना देखील त्यांनी एस. टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना केल्या आहेत.

अनेक हॉटेलमधील थांब्या बाबत प्रवाशांच्या तक्रारी येत असून प्रामुख्याने प्रसाधनगृहे अस्वच्छ असणे, फराळाचे जिन्नस शिळे, अशुद्ध व महाग असणे, याचबरोबर संबंधित हॉटेल वरील कर्मचारी व मालकांची वर्तणूक वाईट असणे अशा प्रकारच्या तक्रारी उद्भवत आहेत. या तक्रारीची गंभीर दखल घेऊन मंत्री सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला याबाबत कडक धोरण स्वीकारण्याची निर्देश दिले आहेत.

## पंचवटी एक्स्प्रेसमध्ये एटीएम मशीन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** भारतीय रेल्वेने आणखी एक इतिहास रचला आहे. आता ट्रेनने प्रवास करणाऱ्या लोकांना रोख रक्कम नसल्याची चिंता करावी लागणार नाही. आता भारतीय रेल्वेने प्रवाशांसाठी गाड्यांमध्ये एटीएम सेवा सुरू केली आहे.

मुंबई मनमाड पंचवटी एक्स्प्रेसमध्ये अशा प्रकारे एटीएम मशीन असलेली देशातील पहिली ट्रेन ठरली आहे. या ट्रेनमध्ये बँक ऑफ महाराष्ट्राची एटीएम मशीन बसवण्यात आली आहे.



## लाचखोर पीएसआय एसीबीच्या जाळ्यात

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १६ :** पिंपरी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील वाहन सोडण्यासाठी पोलिस उपनिरीक्षकांनी ४० हजार रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती ३० हजार रुपये घेऊन वाहन सोडल्याचा प्रकार उजेडात आला आहे. या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने सापळा रचून पोलिस उपनिरीक्षक निलेश रमेश बोकेफोडे (वय ३८) यांना रंगेहाथ अटक केली आहे.

तक्रारदार यांना त्यांच्याविरोधात दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी तसेच सदर गुन्ह्यात तक्रारदाराचे जप्त करण्यात आलेले वाहन सोडविण्यासाठी निलेश बोकेफोडे यांनी ४० हजार रुपयांची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी याबाबत एसीबीकडे तक्रार दाखल केली. पोलिस निरीक्षक प्रविण निंबाळकर यांनी तक्रारीची पडताळणी केली असता, निलेश बोकेफोडे यांनी तक्रारदार यांना गुन्ह्यात मदत करण्याकरिता ४० हजार रुपये मागितल्याचे सिध्द झाले. तडजोडीअंती ३० हजार रुपये घेताना एसीबीचे पथकाने अटक केली.

## सागरिका – झहीर खान झाले आईबाबा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** क्रिकेटपटू झहीर खान आणि अभिनेत्री सागरिका घाटगे पालक झाले आहेत. सागरिकाने एका मुलाला जन्म दिला आहे. या जोडप्याने सोशल मीडियाद्वारे त्यांच्या चाहत्यांसोबत ही आनंदाची बातमी शेअर केली आहे.

यासोबतच त्यांनी त्यांच्या बाळाचे नावही सांगितले आहे. चाहते आणि सेलिब्रिटी दोघेही या जोडप्याचे अभिनंदन करत आहेत. सागरिकाने तिच्या इंस्टाग्रामवर तिचा पती झहीर खान आणि मुलासोबतचा एक फोटो पोस्ट केला आहे. त्याच्या कॅप्शनमध्ये तीने लिहिले की, 'त्यांच्या घरी एक मुलगा आला आहे, ज्याचे नाव फतेह सिंग खान आहे.

# उर्दूचा जन्मच मुळात भारतातील

### पातूर नगरपरिषदेच्या नामफलकावर सुप्रीम कोर्टाचा निर्वाळा

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि.१६ :** अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेच्या नामफलकावरील उर्दूचा उल्लेख योग्यच असल्याचा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात सुनावणी करताना दिला.

मराठी व हिंदीसारखी उर्दू ही एक इंडो-आर्यन भाषा आहे. तिचा जन्मच मुळी भारतीय भूमीत झाला. त्यामुळे तिला कोणत्याही धर्माशी जोडता येत नाही. उर्दू ही भारतासाठी परकीय भाषा आहे हा एक पूर्वग्रह आहे, असे कोर्टाने या प्रकरणी ठणकावून सांगितले आहे.

पातूर नगरपरिषदेचा नामफलक उर्दू भाषेत आहे. या बोर्डावर माजी नगरसेविका वर्षाताई बगाडे यांनी आक्षेप घेतला होता. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण (अधिकृत भाषा) कायदा २०२२ अंतर्गत उर्दूचा वापर करण्यास परवानगी नाही, असा दावा त्यांनी केला होता. या प्रकरणी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. पण तिथे त्यांना कोणताही दिलासा मिळाला नाही. अखेर त्यांनी सुप्रीम कोर्टाचे दार ठोठावले. पण तिथेही त्यांची निराशा झाली.

पातूर नगरपरिषदेचा नामफलक १९५६ पासून आहे. येथील स्थानिकांना उर्दू भाषा मोठ्या प्रमाणात समजते. त्यामुळे हा नामफलक काढून टाकण्याची काहीच गरज नाही. मराठी व्यतिरिक्त उर्दू वापरण्यास कोणताही कायदेशीर प्रतिबंध नाही. २०२२ च्या कायद्यानुसार किंवा कायद्याच्या कोणत्याही तरतुदीनुसार उर्दू वापरण्यास बंदी नाही. भारतीय संविधानाच्या ८ व्या अनुसूचीमध्ये याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे ही याचिकाच मुळात भाषा व कायद्याच्या चुकीच्या समजुतीवर आधारित आहे, असे सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्ती सुधांशू धुलिया व न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने या प्रकरणी स्पष्ट केले.

खंडपीठ पुढे म्हणाले, मराठी व हिंदीसारखीच उर्दू ही एक इंडो - आर्यन भाषा आहे. उर्दूचा विकास व भरभराट झाली. कारण वेगवेगळ्या सांस्कृतिक वातावरणातील याच भाषेतून विचारांची देवाणघेवाण होत होती. लोक एकमेकांशी संवाद साधायचे. शतानुशतके त्यात सुधारणा होत गेली. अनेक प्रशंसित कवींची ही भाषा पसंतीची बनली. फौजदारी व दिवाणी कायद्यातही उर्दू शब्दांचा फार मोठा प्रभाव आहे. अदालतपासून हलफनामा ते पेशी अशा विविध भारतीय न्यायालयांच्या भाषेत उर्दूचा मोठा प्रभाव आढळतो.

उर्दू मूळ भारतीय भाषा असूनही ती वसाहतवादी शक्तींमुळे मुस्लिम धर्माशी जोडली गेली. वास्तविक उर्दू भाषेचा जन्म कुठे झाला व तिच्या अस्तावर सविस्तर चर्चा करण्याचा हा प्रसंग नाही. पण एवढे म्हणता येईल की, हिंदी व उर्दू या दोन भाषांच्या मिश्रणातून हिंदी अधिकाधिक संस्कृतीकृत झाली, तर उर्दू भाषा अधिक पर्शियन झाली. उर्दूचे मूळ हे भारतात आढळले. त्यामुळे तिला कोणत्याही विशिष्ट धर्माशी जोडता येत नाही, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

# लघुउद्योग ते डी.लिट. : प्रवास एका उद्योजकाचा!

साधारण ३५ वर्षांपूर्वी घरच्या घरी लिक्विड सोप आणि क्लिनिंग पावडर बनवून ती हॉटेल्स आणि घरोघरी स्वतः जाऊन विकणे ते आज १३०० हुन अधिक कर्मचाऱ्यांची कंपनी उभी करून अमेरिका, कॅनडा, ब्राझील, रशिया आणि ऑस्ट्रेलियासह २६ हुन अधिक देशांत कंपनीची उत्पादने पोहचवणे, नऊ डिव्हिजन्समध्ये ८२ हुन अधिक दर्जेदार उत्पादने बाजारात आणणे असा थक्क करणारा प्रवास साध्य केला आहे तो एका मराठी उद्योजकाने.

'बायको गेली माहेरी, काम करी पितांबरी' ही टॅगलाईन घेऊन तांब्या पितळेची भांडी लखलखीत करणारी पितांबरी शायनिंग पावडर घेऊन बाजारात उतरणारी पितांबरी आज घरोघरी पोहोचली आहे. या पितांबरीचा डोलारा उभा करणारे आणि तितक्याच ताकदीने तो पेलणारे पितांबरीचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र प्रभुदेसाई यांची उद्योगक्षेत्रातील भरीव कामगिरी आणि ते करत असलेल्या सामाजिक कार्याची दाखल घेत गेल्याच महिन्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात रवींद्र प्रभुदेसाई यांना डी. लिट.(विद्यानिधी) पदवी प्रदान करण्यात आली.

एका मराठी उद्योजकाला मिळालेला हा बहुमान समस्त मराठी जनांसाठी गौरवास्पद आहे. प्रभुदेसाई यांच्या या यशाचा यथोचित गौरव करण्यासाठी प्रभुदेसाई यांची जन्मभूमी आणि प्रथम कर्मभूमी असलेल्या ठाणे शहरात १७ एप्रिलला डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात येणार आहे.

या सत्कार सोहळ्याला जेष्ठ अणुशास्त्रज्ञ पदमविभूषण डॉ. अनिल काकोडकर, सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ, सच्चीदानंद शेवडे, सनातन संस्थेच्या सद्गुरू सुश्री अनुराधा वाडेकर आणि चितळे उद्योग समूहाचे श्रीकृष्ण चितळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

समाजसेवेचा आणि देशभक्तीचा वारसा रवींद्र प्रभुदेसाई यांच्याकडे त्यांच्या वडिलांकडूनच आला आहे. लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत त्यांचे जाणे असल्याने समाजसेवेचे आणि देशसेवेचे बालकडू त्यांना लहानपणीच मिळाले आहे.

आपल्या प्रत्येकावर देव, पितर, ऋषी आणि समाज अशी चार ऋणे असतात. त्यापैकी समाज ऋण फेडण्याच्या दृष्टीने ते विविध सामाजिक संस्था, राष्ट्र आणि धर्म यांच्या पुनरुत्थानासाठी झटणाऱ्या संघटना, उदयोन्मुख कलाकार, गरजू व्यक्ती, गतिमंद



मुले यांना नियमितपणे दान देत असतात. मग ते दान पैशाच्या स्वरूपात असो वा पितांबरीच्या गृहोपयोगी उत्पादनांच्या स्वरूपात. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि लोकोपयोगी कार्यांना प्रायोजकत्व देऊनही ते सामाजिक बांधिलकी जपत असतात.

त्यांच्या प्रत्येक वाढदिवसाला ते ठराविक रकमेचा धनादेश विविध सामाजिक, शैक्षणिक, आध्यत्मिक संस्थांना, गोशाळांना आणि आश्रमांना अर्पणस्वरूपात देतात. कोरोनाकाळात स्वच्छता दूत, पोलीस कर्मचारी, रुग्णालये यांना पितांबरीचे सॅनिटायजर, मास्क, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारी पितांबरीच्या हेल्थ केअर डिव्हिजनची आयुर्वेदिक औषधे कंपनीच्या वतीने विनामूल्य वितरित करण्यात आली.

आषाढी आणि कार्तिकी वारीनिमित्त लाखो वारकरी पंढरीची वारी पायी करत असतात. त्यांच्या सेवेसाठी पितांबरीचा चमू वारीमार्गात दरवर्षी कार्यरत असतो. या चमूतील पितांबरीचे कर्मचारी पितांबरीचे क्युअर ऑन हे वेदनाशामक आयुर्वेदिक तेल वारीतील वारकऱ्यांच्या पायांना लावून त्यांच्या पायांची मालिश करून देतात. ज्यामुळे वारकऱ्यांना वारीसाठी पुनश्च्य नव्याने मार्गरत होण्यासाठी स्फूर्ती मिळते. पितांबरीत काम करणारा मग तो शिपाई असो वा स्वच्छता कर्मचारी त्याला कर्मचारी म्हणणे प्रभुदेसाई यांना आवडत नाही.

पितांबरीचा प्रत्येक कर्मचारी पितांबरी उद्योगसमूहाला पुढे घेऊन जाण्यासाठी आपापलया परीने हातभार लावत असतो, या विचाराने ते कंपनीतील कर्मचाऱ्यांना 'सहकारी' म्हणून संबोधतात आणि इतरांनाही तसेच संबोधण्यास सांगतात. पितांबरीतील सहकाऱ्यांच्या अडचणीत ते त्यांना आर्थिक सहाय्यही करतात, प्रत्येकाची आपुलकीने चौकशी करतात त्यामुळे पितांबरीचा प्रत्येक सहकारी त्यांच्याकडे मालकाच्या भावनेने नव्हे, तर अन्नदाता पित्याच्या भावनेने पाहतो.

आज कंपनीने १३०० हुन अधिक गरजवंतांना कंपनीत रोजगार दिला आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात अनेक वर्षे एकाच ठिकाणी नोकरी करणारे कर्मचारी केवळ शासकीय सेवेतच दिसून येतात; मात्र अशाही काळात २० हुन अधिक वर्षे कार्यरत असलेली मोठी फळी केवळ पितांबरी या खासगी कंपनीतच पाहायला मिळते.

कोरोनासारख्या महामारीत जेव्हा सर्वच उद्योगधंदे बंद होते अशाही काळात त्यांनी कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवू दिले नाही.

पितांबरी म्हणजे गुणवत्ता हे समीकरण ठरलेले आहे. प्रभुदेसाई यांनी कंपनीच्या प्रत्येक उत्पादनात गुणवत्ता जपताना त्यापासून ग्राहकांना कोणताच त्रास होणार नाही याची विशेष काळजी घेतलेली आहे. ही काळजी घेण्यासाठी आणि उत्पादनाची गुणवत्ता पडताळण्यासाठी प्रभुदेसाई यांनी कंपनीचे स्वतंत्र 'आर अँड डी' युनिट उभारले असून त्याठिकाणी उत्पादनांची गुणवत्ता पडताळण्यासाठी तज्ज्ञांची नेमणूक केली .

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

प्रभुदेसाई यांची आधीपासूनच आयुर्वेदात अधिक रुची असल्याने त्यांनी आपल्या बहुतांश उत्पादनांच्या निर्मितीमध्ये आयुर्वेदाचा आधार घेतला आहे. केवळ व्यवसाय वाढवायचा म्हणून रसायनांचा अधिक वापर करून बाजारात आपले उत्पादन खपवणे हे त्यांना कधीच मान्य झाले नाही.

मराठी माणसांनी नोकरीमध्ये अडकून न पडता लहान मोठा व्यवसाय करावा आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी प्रभुदेसाई वेळोवेळी मार्गदर्शन करत असतात. हजारो कर्मचाऱ्यांचे संसार आज त्यांच्यामुळे उभे आहेत. त्या कुटुंबियांचे तसेच सामाजिक कार्यात ते वेळोवेळी करत असलेल्या मदतीमुळे अशा कृतार्थांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा प्रभुदेसाई यांच्या पाठीशी आहेत. उद्योगक्षेत्रात गरुडभरारी घेऊनही ते अजातशत्रू आहेत.

केवळ यशस्वी उद्योजक म्हणून नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपणारे, दानधर्म करण्यात सदैव पुढे असणारे, गरीब-श्रीमंत, लहान-थोर असा कोणताच भेदभाव न बाळगता सर्वांशी आपुलकीने वागणारे, कंपनीतील कर्मचाऱ्यांची पित्याच्या नात्याने काळजी घेणारे, सर्वांना हवेहवेसे वाटणारे रवींद्र प्रभुदेसाई मराठी उद्योगविश्वातील एक अनोखे उदाहरण आहे.

■ ■ ■

# भूसंपादन मोबदला विलंब : शेतकऱ्यांचे नुकसान

### बँकांसाठीच्या दरापेक्षा एक टक्के अधिक दराने व्याज मिळणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :** भूसंपादनाचा मोबदला विलंबाने दिल्या गेल्यास आता त्या रकमेवरील व्याज एकाच दराने दिले जाईल. हा व्याज दर बँकांसाठीच्या व्याज दरापेक्षा (रेपो रेट) फक्त एक टक्क्यांनी अधिक असेल, सा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचा मोठा आर्थिक फटका विविध पायाभूत सुविधांसाठी आपली जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना बसणार आहे.

राज्य सरकारने विविध सार्वजनिक, शासकीय, निमशासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्यासाठी उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ स्वीकारला आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार होणाऱ्या भूसंपादनामुळे जमीन मालकांना चांगला मोबदला, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना होत असल्याने विरोधाचे प्रमाण खूप कमी झाले आहे.

या अधिनियमात जमीन मालकांना भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास कलम ३०(३) अनुसार १२ टक्के आणि कलम ७२ तसेच कलम ८० नुसार ९ टक्के आणि १५ टक्के व्याज देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर बोजा पडून प्रकल्पांच्या मूळ खर्चात वाढ होत असे.

मूळ प्रकल्प खर्चातील वाढ रोखण्यासाठी आता या व्याजदरात बदल करुन भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास त्या रकमेवर सरसकट एकाच दराने व्याज देण्यात येईल.

हा दर बँकासाठीच्या व्याज दराहून एक टक्के अधिक असेल. थकीत मोबदल्यावर या दराने दरसाल दर शेकडा प्रमाणे व्याज आकारण्याची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. याबाबत विधेयक विधिमंडळात मांडण्यात आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

केंद्र सरकारच्या २०१३ च्या कायद्यानुसार भूसंपादन प्रक्रिया पार पडून निवाडा झाल्यानंतर पहिल्या वर्षात ९ टक्के व्याज देण्याची तरतूद आहे. तर विलंब झाल्यास दुसऱ्या वर्षी १५ टक्के व्याज देण्याचे कायद्यात नमूद केले आहे. मात्र, राज्यात शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदल्याच्या व्याजापोटी अधिक रक्कम मिळवून देण्याचे आमिष देणारे रॅकेट कार्यरत आहेत.

हे रॅकेट वकिलांच्या मदतीने न्यायालयात जातात. न्यायालयात अनेक वर्ष खटला चालून निकाल आल्यानंतर सरकारला व्याजापोटी मोठी रक्कम मोजावी लागते. त्यामुळे राज्य सरकारने भूसंपादन विलंबापोटी बँकांसाठीच्या दरापेक्षा एक टक्के अधिक दराने व्याज देण्याचा निर्णय घेतला आहे.

असा निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे, अशी माहिती मदत आणि पुनर्वसन विभागाच्या अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

# पाण्याच्या फवाऱ्याने सलामी



अमरावती-बुधवारी अमरावती विमानतळाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री, राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी उड्डाण घेणाऱ्या पहिल्या प्रवासी विमानावर अग्निशमन बंबाद्वारे पाण्याचे फवारे उडवून अशी सलामी देण्यात आली.

# एमएडीसी चे अधिकारी कडक गांजा मारुन काम करतात काय?

नागरिकांचा सवाल

## विमानतळाच्या नामकरणावरून वारंवार जनतेची करताहेत दिशाभूल


**रोहित गासे**

**अमरावती, ( दि.16 ) –** अमरावती विमानतळाच्या नामकरणावरून महान व्यक्तीं चे समर्थक वैचारिक रस्सीखेच करताना दिसत आहे असे असताना मात्र एमएडीसी (महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी) चे अधिकारी कडक गांजा मारून काम करत आहे का, असा सवाल नागरिक करत आहे. कारण कुठलीही अधिकृत घोषणा सरकार कडून करण्यात आलेली नसताना एमएडीसीचे अधिकारी मात्र आपल्या दस्तावेजामध्ये वारंवार विमानतळाची नावे बदलत आहे. या अधिकाऱ्यांमध्येच कुठला तालमेळ नसल्याचे अनेक उदाहरणांमधून दिसून येत आहे.




भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे नाव अमरावती विमानतळाला देण्यात यावे अशी मागणी गेल्या काही वर्षापासून शहरातील प्रतिष्ठित मंडळींकडून करण्यात आली. इंटरनेटवर पंजाबराव देशमुख विमानतळ असाच उल्लेखही या विमानतळाचा करण्यात आला होता. अश्यातच 10 एप्रिल रोजी खासदार बळवंत वानखडे यांना एमएडीसी कडून विमानतळाच्या उद्घाटनाचे रितसर निमंत्रण पत्र देण्यात आले.

ज्यामध्ये या विमानतळाचा उल्लेख 'डॉक्टर पंजाबराव देशमुख विमानतळ' या नावाने करण्यात आला . हे पत्र समाज माध्यमांवर व्हायरल होताच भाऊसाहेबांच्या समर्थकांमध्ये प्रचंड आनंद व उत्साह पाहायला




मिळाला. मात्र अवघ्या काही तासातच सरड्याने रंग बदलावा याप्रमाणे एमएडीसी ने आपली चूक मान्य करत अद्याप विमानतळाला कोठलेही नाव दिले नसल्याची कबुली दिली, तसा खुलासाही त्यांनी प्रसार माध्यमांना दिला. त्यामुळे भाऊसाहेबांच्या समर्थकांमध्ये पुन्हा नाराजीचा सूर उमटला.

### एमएडीसी ने पुन्हा खाल्ली माती

16 एप्रिल 2025 रोजी अमरावती विमानतळाचे उद्घाटन केंद्रीय विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. मात्र या वेळेसही एमएडीसी ने इतक्या मान्यवरांसमोर माती खाल्ली . मुख्यमंत्र्यांचे भाषण सुरू असताना त्यांच्या पाठीमागील स्क्रीनवर 'प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज विमानतळ' असे नाव या विमानतळाचे प्रकाशित करण्यात आले. हा प्रकार पाहून मुख्यमंत्री ही काही वेळासाठी आश्चर्य चकित झाले. त्यांनी आपल्या भाषणात वेळ मारुन नेली. गुलाबराव महाराजांचे नाव विमानतळाला देण्यात आल्याचे कळताच त्यांच्या भक्तांमध्ये व समर्थकांमध्ये प्रचंड आनंद व्यक्त करण्यात आला. त्यांनी मुख्यमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन केले, परंतु पुन्हा काही तासातच एमएडीसी कडून खुलासा करत अद्याप विमानतळाला कुठलेच नाव देण्यात आले नसल्याचे स्पष्टीकरण करण्यात आले. या प्रकारातून पुन्हा एकदा एमएडीसीच्या अधिकाऱ्यांचा सरड्यासारखा रंग बदलूपणा जनतेसमोर आला. अधिकारी नशेत असतात काय?, गांजा मारून कामकाज करतात काय?, असे अनेक सवाल जनतेने प्रसार माध्यमातून केले. अशा बेजबाबदार कंपनीमुळे अमरावती विमानतळाचे भविष्य अंधारात तर नाही ना अशी भीती या नियोजन शून्य कार्यक्रमातून अमरावतीकरांना वाटत आहे.

# अत्याधुनिक साधनांनी पोलिस दल सक्षम करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 16 ) –** पोलिस दलाला परिणामकारक अंमलबजावणीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून वाहने देण्यात येत आहे. येत्या काळातही पोलिसांना अत्याधुनिक साधने देऊन सक्षम करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

कोंडेश्वर येथे अमरावती ग्रामीण पोलिस दलाची कोंडेश्वर येथील निवासस्थान इमारत, प्रशासकीय इमारत, चारचाकी नवीन वाहने, तसेच शहर पोलिसांचे चारचाकी नवीन वाहने, वातानुकूलित वाहतूक कक्ष आणि महिला विसावा कक्षाचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या करण्यात आले.

यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा, केवलराम काळे, उमेश उर्फ चंदू यावलकर, प्रताप अडसड, प्रवीण तायडे, प्रवीण पोटे-पाटील, पोलीस महासंचालक (गृहनिर्माण) अर्चना त्यागी, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ




पोकळे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पोलीसांच्या आधुनिकीकरणासाठी शासन कटिबद्ध आहे. आधुनिक संसाधनांमुळे नागरिकांच्या सुरक्षितेत भर पडणार आहे. त्यासोबतच पोलीसिंग अधिक गतिमान होईल. आधुनिक साधने पोलिसांनाही सहाय्यभूत ठरणार असल्याने त्यांचे जीवनमान उंचावेल. पोलीस दलात अद्ययावत वाहने दाखल होणे सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. तसेच पोलिस गृहनिर्माण महामंडळाच्या माध्यमातून दर्जेदार घरे बांधण्यात येत आहेत. पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना हक्काचे घर मिळावे यासाठी डीजी लोन स्कीमही सुरू करण्यात आली आहे.

नागरिकांना सुरक्षितता प्रदान करणाऱ्या पोलीसांनाही उत्तम सुविधा पुरविण्यावर भर देण्यात येत आहे. यातील शहर पोलिस दलाचे वातानुकूलित कक्ष, महिला विसावा कक्ष निश्चितच पोलिसांना मदतीचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शहानूर शासकीय निवासस्थान इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. तसेच 18 चारचाकी वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. पोलिस कर्मचाऱ्यांना कोंडेश्वर येथील निवासस्थानाची चावी सुपूर्द करण्यात आली.

# अपघात ग्रस्त आदिवासींकडे प्रशासनाची पाठ

## विमानतळाच्या उद्घाटनाप्रसंगी लोक नृत्य साठी येतांना वाहन झाडावर धडकले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 16 ) –** अमरावती विमानतळाच्या उद्घाटन कार्यक्रमात मुख्यमंत्रिंकडून आपली पाठ थोपटून घेण्याकरिता आदिवासी बांधवांच्या लोकनृत्य पथकाला वाहनाने कार्यक्रमला बोलाविण्यात आले. दरम्यान परतवाडा ते अमरावती रस्त्यावर मेघनाथपूरजवळ या वाहनाला अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतू एक लहान मुलगा गंभीर जखमी झाला. बेडदाबल्डा येथील 18 आदिवासी कलावंत जखमी झाले. ही घटना 16 एप्रिल रोजी पहाटे 4 वाजता घडली.या घटनेनंतर प्रशासनाचा कोणताही अधिकारी या जखमींच्या भेटीला सुद्धा गेले नाही. ज्यामुळे आदिवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये जिल्हा प्रशासनाच्या विरुद्ध प्रचंड रोष व्यक्त केल्या जात आहे.

धारणी तहसील कार्यालयाच्या वतीने, बेडदाबल्डा गावातील आदिवासी कोरकू समुदायाच्या गदली सुसुन गटाला विमानतळ उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहण्याचे तोंडी कळविण्यात आले. ज्या अंतर्गत हे पथक रात्रीच धारणी येथून निघाले होते. पण पहाटे 4 वाजता पथकाच्या वाहनाचा परतवाडा-अमरावती रस्त्यावर अपघात झाला. यामध्ये सुमारे 18 पुरुष



आणि महिला जखमी झाल्याचे वृत्त आहे. रात्री उशिरा झालेल्या अपघातामुळे जखमी त्याच ठिकाणी पडले होते. अचलपूरच्या जय आदिवासी समाज विकास संघटनेला माहिती मिळताच अध्यक्ष गणूजी सावळकर आणि उपाध्यक्ष मिठाराम कोल्हेकर यांनी घटनास्थळी पोहोचून जखमींना रुग्णालयात पाठवण्यास मदत केली. सर्व जखमींना अचलपूरच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी दोघे जखमी गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. ज्यांच्यावर उपचार सुरू झाले आहेत.





# अवैध गुटखा तस्करीवर अमरावती ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

## 71.70 लाख रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त, एक आरोपी अटकेत



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.16 ) –** जिल्ह्यात प्रतिबंधित गुटख्याच्या तस्करीवर आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या आदेशाने सुरु असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे.

15 एप्रिल रोजी तिवसा पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालणाऱ्या गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की नागपूर येथून अमरावती-अकोला मार्गावर एक कंटेनर मधून प्रतिबंधित गुटख्याची तस्करी होत आहे. या माहितीच्या आधारे तळेगाव ते तिवसा दरम्यान वऱ्हेगाव जवळ नाकाबंदी लावण्यात आली. काही वेळातच एक संशयित कंटेनर थांबवून तपासणी करण्यात आली. वाहन चालकाने आपले नाव गुलाब सरमन अहेरवार (वय 44), रा. गोना, ता. पाली, जि. ललितपूर, उत्तरप्रदेश असे सांगितले. पंचांसमक्ष कंटेनरची झडती घेतली असता त्यामध्ये 100 पोती बहार सुगंधित पानमसाला व बीएचआर सुगंधित तंबाखू आढळून आले, ज्याची अंदाजे बाजारभावाने किंमत 36.60 लाख आहे. चौकशीत आरोपीने सांगितले की सदर माल दिल्लीहून अकोला येथे नेण्यात येत होता. पोलिसांनी सदर गुटखा, तस्करीसाठी वापरलेला कंटेनर (क्रमांक आरजे 11 जीसी 0352, किंमत 35 लाख), तसेच एक सॅमसंग स्मार्टफोन (किंमत 10,000) असा एकूण 71.70 लाखांचा माल जप्त केला आहे. या प्रकरणी तिवसा पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम 123, 223, 274, 275, 3(5) व अन्न सुरक्षा मानक अधिनियम 2006 अंतर्गत कलम 59 नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास तिवसा पोलिस करत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या कारवाईत पो.उप.नि. सागर हटवार, मुलचंद भांबुरकर, पो.अं. बळवंत दाभणे, रविंद्र बावणे, भुषण पेठे, मंगेश लकडे, सचिन मसांगे व चालक संजय प्रधान यांनी मोलाची भूमिका बजावली.

# विदर्भाला विकसित करुन मुख्य प्रवाहात आणणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पायलट प्रशिक्षण केंद्रामुळे अमरावती विमानतळामुळे अमरावतीची जागतिक नकाशावर नवी ओळख

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 16 ) –** स्टेट ऑफ आर्ट असलेल्या अमरावती विमानतळ आणि पायलट प्रशिक्षण केंद्रामुळे अमरावतीला विशेष ओळख प्राप्त होणार आहे. येत्या काळात सिंचन, पायाभूत सुविधा यासोबतच सर्वसामान्य नागरिकांसाठी वेगवान प्रवासाच्या सुविधा निर्माण करण्यात येतील. विदर्भातील विकासात्मक कामे पूर्ण करून या भागाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम प्राधान्याने केले जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




अमरावती विमानतळाचे उद्घाटन, तसेच प्रवाशी विमानसेवेचा शुभारंभ आणि एअर इंडिया पायलट प्रशिक्षण केंद्राच्या उड्डाणाचे प्रात्यक्षिक आज पार पडले. यावेळी केंद्रीय विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू, केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर, अनुसुचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ, खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार संजय खोडके, डॉ. संजय कुटे, रवी राणा, सुलभा खोडके, प्रतापदादा अडसड, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रविण तायडे, उमेश यावलकर, गजानन लवटे, नवनीत राणा, परिवहन व बंदरे विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

अमरावती विमानतळावर आलेल्या पहिल्या प्रवासी विमानाचे वॉटर कॅननने स्वागत करण्यात आले.

त्यानंतर पायलट प्रशिक्षण केंद्राच्या डेमो फ्लाईटचे प्रात्यक्षिक करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस आणि मान्यवरांनी विमानतळाच्या कोनशिलेचे अनावरण केले. माजी आमदार प्रवीण पोटे आणि बेलोराच्या सरपंच माधुरी चौधरी यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार केला.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# काँग्रेसने सकारात्मक व्हायला हवे!

**कॉंग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच गुजरात मधील अहमदाबाद येथे पार पडले. गेली ३० वर्षे कॉंग्रेस, गुजरात मध्ये सत्तेच्या बाहेर आहे. गुजरातच्या स्थापने नंतर कॉंग्रेस बराच काळ राज्यात सत्तेवर होती.त्याला अपवाद होता तो १९७५ ते १९७६ आणि १९७७ ते १९८० या कालावधीत गुजरात मध्ये सत्तेवर असलेल्या बाबूभाई पटेल यांच्या नेतृत्वाखालील बिगर कॉंग्रेसी सरकारचा. १९९५ नंतर आजतागायत कॉंग्रेस, गुजरात मध्ये सत्तेच्या आसपास फिरकलेली नाही. एवढेच नव्हे तर २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला गुजरात मधील लोकसभेची एकही जागा जिंकता आली नव्हती. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने गुजरातमध्ये आपले खाते उघडले. लोकसभेची एक जागा जिंकून, कॉंग्रेसने गेल्या खेपेच्या तुलनेत समाधानकारक कामगिरी केली. या पार्श्वभूमीवर अहमदाबादमध्ये झालेल्या अधिवेशनाचा आढावा घेऊया.**

■ अभय गोखले



लोकसभा निवडणुकीनंतर हरयाणा आणि महाराष्ट्र या राज्यांत कॉंग्रेसचा जो दारूण पराभव झाला, त्यापासून कोणताही बोध कॉंग्रेसने घेतला नसल्याचे अधिवेशनातील एकंदर कामकाजावरून ठळकपणे दिसून आले. भाजपावर टीकाटिप्पणी आणि आरोपबाजी करताना आपलं कुठं चुकतंय यावर साधकबाधक चर्चा करण्याचे भान फारच कमी वक्त्यांनी राखले.भाजपावर भ्रष्टाचार आणि हुकूमशाही यांचे आरोप लावताना,२०१४ साली आपले सरकार भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळेच निवडणूकीत हरले याचा विसर वक्त्यांना पडला. १९७७ साली कॉंग्रेसचा झालेला पराभव हा हुकूमशाहीमुळेच ( आणीबाणी ) झाला होता, याचाही विसर भाजपावर आरोपबाजी करणाऱ्या वक्त्यांना पडला.

खरी गोष्ट अशी आहे की कॉंग्रेस जो पर्यंत नकारात्मक भूमिकेतून बाहेर पडत नाही, तोपर्यंत कॉंग्रेसला काही भवितव्य आहे असे वाटत नाही.भाजपा ज्या चुका करत आहे, तिकडे जनतेचे लक्ष आहे.तुम्ही जनतेसाठी काय करणार आहात ते जनतेला विस्तृतपणे सांगा, अशी जनतेची कॉंग्रेसकडून अपेक्षा आहे.

विरोधी पक्ष म्हणून सत्ताधारी पक्षावर विधायक टीका करण्यात गैर असे काहीच नाही, परंतु आपण काय योजना तयार केली आहे, यावर भर न देता केवळ टिकेकरीता टिका करणे देशातील युवा पिढीला तरी मान्य होणार नाही. कॉंग्रेसने सकारात्मक भूमिका स्विकारायला हवी.

शशी थरूर यांच्या सारख्या वक्त्यांनी कॉंग्रेसच्या नेमक्या याच कमकुवतपणावर बोट ठेवले. पण ते अल्पमतात असल्याने त्यांच्या सुचनेनुसार कार्यवाही होण्याची शक्यता फारच कमी आहे. मुळात शशी थरूर यांच्या सारखा अध्यक्ष कॉंग्रेसला लाभला असता तर कॉंग्रेसला ते नकारात्मक भूमिकेतून बाहेर काढू शकले असते.परंतु त्यांचा स्पष्टवक्तेपणा कॉंग्रेस नेतृत्वाला मान्य होणार नाही.

महत्वाचे म्हणजे एक पाय कॉंग्रेसमध्ये आणि दुसरा पाय इतर पक्षात असणाऱ्या कॉंग्रेस नेत्यांचा शोध घेऊन पक्षनेतृत्वाने, त्यांची ताबडतोब पक्षातून हकालपट्टी करायला हवी. परंतु असे धाडस कॉंग्रेसचे नेतृत्व दाखवेल काय, हा खरा प्रश्न आहे.

कॉंग्रेस हा संस्थानिकांचा पक्ष आहे.हे संस्थानिक आपली संस्थाने बरोबर सांभाळतात. निवडणुकीच्या काळात आपल्या संस्थानावर आपले सर्व लक्ष केंद्रित करतात.पक्षाच्या इतर उमेदवारांना मदत करण्यासाठी ते फारसे उत्सुक नसतात. पक्षनेतृत्वाने त्यांची ही मक्तेदारी प्रथम मोडीत काढायला हवी.

भाजपावर टीका करणे सोपे आहे परंतु त्यांच्या सारखी शिस्तबद्ध निवडणूक यंत्रणा जोपर्यंत तुम्ही उभी करत नाही, तोपर्यंत त्यांना टक्कर देणे हे अतिशय अवघड काम आहे, ही वस्तुस्थिती कॉंग्रेसने लक्षात घ्यायला हवी.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा २०२४ मध्ये कॉंग्रेसची कामगिरी समाधानकारक झाली यात दुमत असण्याचे कारण नाही. परंतु त्यामुळे हुरळून जाण्याचेही कारण नव्हते. त्यानंतर झालेल्या हरयाणा विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस मजबूत स्थितीत असतानाही पक्षाला दारुण पराभव पत्करावा लागला.

महाराष्ट्रात तर कॉंग्रेसने लोकसभा निवडणुकीत त्यांच्या वाट्याला आलेल्या १७ जागांपैकी १३ जागा जिंकून दैदिप्यमान यश मिळविले होते. परंतु नंतर झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा दारुण पराभव झाला आणि पक्षात नैराश्य पसरले. त्या पराभूत मानसिकतेतून पक्ष अद्याप बाहेर आलेला नाही.

कॉंग्रेसला गतवैभव प्राप्त करायचे असेल तर नुसते इतिहासाचे दाखले देऊन ते साध्य होणार नाही.त्याकरीता पक्ष संघटनेत मूलभूत बदल करावे लागतील. पक्षामधील निरनिराळ्या पदांवर नियुक्त्या करताना युवकांना प्राधान्य द्यावे लागेल.

आज देशभरातील कॉंग्रेसची स्थिती पाहता, आशादायक असे वातावरण दिसत नाही. उत्तरप्रदेश सारख्या मोठ्या राज्यात काँग्रेस गेली ३५ वर्षे सत्तेच्या बाहेर आहे. गेल्या काही निवडणुकांतील कॉंग्रेसची दयनीय कामगिरी पाहता उत्तरप्रदेशमध्ये नजीकच्या भविष्यकाळात कॉंग्रेस सत्तेवर येण्याची सुतराम शक्यता नाही. तामिळनाडूमध्ये गेली ५८ वर्षे कॉंग्रेस सत्तेच्या बाहेर आहे. तेथील द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांच्या भोवती केंद्रीत झालेले सत्ताकारण पाहता, कॉंग्रेसला तेथे बिलकुल आशा नाही.

पश्चिम बंगाल मध्ये कॉंग्रेस गेली ४८ वर्षे सत्तेच्या बाहेर आहे.तेथे आता तृणमूल काँग्रेस आणि भाजपा यांच्यातच प्रमुख लढत असल्याने कॉंग्रेसला तेथेही आशा नाहीच.

बिहारमध्ये कॉंग्रेस गेली साडेतीन दशके सत्तेच्या बाहेर आहे. इतके दिवस लालूप्रसाद यादव यांच्या कुबड्या घेऊन कॉंग्रेसने मार्गक्रमण केल्याने पक्षाला आपली संघटना तळागाळापर्यंत पोहोचवता आली नाही.

आंध्रप्रदेशचे विभाजन झाल्यानंतर तेथे कॉंग्रेस इतकी कमकुवत झाली की तेथे पक्षाचे अस्तित्व नावापुरते उरले आहे.ज्या ओडिशामध्ये कॉंग्रेस बरीच वर्षे सत्तेवर होती तेथे गेली २५ वर्षे कॉंग्रेस सत्तेच्या आसपासही फिरकलेली नाही.

कॉंग्रसची देशभरात अशी दयनीय अवस्था असताना, कॉंग्रेसच्या अहमदाबादमधील अधिवेशनात त्यावर विस्तृत चिंतन व्हायला हवे होते, परंतु तसे न करता वरवर मलमपट्टी करण्यात कॉंग्रेस नेतृत्वाने धन्यता मानली. अशा परिस्थितीत भाजपा भरपूर चुका करेल आणि मग भाजपाला वैतागलेली देशातील जनता आपल्याला संधी देईल, तोपर्यंत वाट पाहुया, असे कॉंग्रेसचे सध्याचे धोरण दिसत आहे.

■ ■ ■

# भाजपा - अण्णा द्रमुक युतीचे स्टॅलिनना आव्हान!

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक पक्ष भक्कम पाय रोवून असताना भाजपाने अण्णा द्रमुक पक्षाशी युती केल्याचे जाहीर केले व आगामी विधानसभा निवडणूक अण्णा द्रमुकचे नेते एडप्पादी पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली युती लढवणार असल्याची भाजपाने घोषणा केली. ही घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी चेन्नईत जाऊन केली आणि स्टॅलिन सरकारचे आता दिवस भरले असा सज्जड इशारा दिला.

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतेच संपले. या अधिवेशनाच्या अखेरीस मोदी सरकारने मांडलेल्या वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभा व राज्यसभेत वादळी चर्चा झाली. या विधेयकाला विरोध करण्यासाठी भाजपा विरोधक एकवटले होते. वक्फ सुधारणा विधेयक मुस्लिमांच्या विरोधात आहे, अशी खरमरीत टीका काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, द्रमुक आदी विरोधी पक्षांनी केली. अण्णा द्रमुकने याच सुरात सूर मिसळला होता. एवढेच नव्हे तर वक्फ सुधारणा सरकारच्या विरोधात अण्णा द्रमुक पक्षाच्या खासदारांनी राज्यसभेत मतदानही केले. मग असे अचानक काय घडले की भाजपा व अण्णा द्रमुक हे दोन्ही पक्ष एकदम जवळ आले?

अमित शहा मुत्सद्दी राजकारणी आहेत, तसेच राजकीय कुटनीतीमध्ये ते चाणक्य म्हणून ओळखले जातात. जो राजकीय पक्ष संसदेत भाजपाला साथ देत नाही, ज्या राजकीय पक्षाने गेल्या निवडणुकीत भाजपाशी युती तोडली त्या अण्णा द्रमुकशी भाजपाने पुन्हा युती केली, त्या पक्षाला एनडीएमध्ये दाखल करून घेतले, या सर्व घटना एवढ्या झटपट घडल्या की त्याचे देशातील सर्वच राजकीय पक्षांना आश्चर्य वाटले. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी अण्णा द्रमुक पक्षाबरोबर घाईघाईने युती का करण्यात आली हे गूढ अनेकांना उलगडलेले नाही.

यापूर्वी भाजपाने आपली ताकद वाढविण्यासाठी सर्व शक्ती पश्चिम बंगालमध्ये पणाला लावली होती, तसेच आता भाजपाने अण्णा द्रमुकची पुन्हा युती करून एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकार चेन्नईच्या तख्तावरून खाली खेचण्याचा चंग बांधला आहे. तामिळनाडूत पक्ष विस्तारासाठी भाजपा गेली दहा-बारा वर्षे अटोकाट प्रयत्न करीत आहे. पण द्रमुक विरुद्ध अण्णा द्रमुक अशा लढाईत भाजपाचे काही फावत नाही हे श्रेष्ठींना कळून चुकले आहे. स्टॅलिन हे करारी नेतृत्व आहे. ते मोदी सरकारपुढे झुकत नाहीत, भाजपापुढे नमत नाहीत आणि परंपरागत राजकीय शत्रू असलेल्या अण्णा द्रमुकला वाढू देत नाहीत.

द्रमुकला सत्तेवरून हटवायचे असेल तर आपण दोघांनी एकत्र येणे गरजेचे आहे, याची जाणीव भाजपा व अण्णा द्रमुक या दोन्ही पक्षांना झाली आहे. म्हणूनच राजकीय अरिहार्यतेतून आगामी विधानसभा निवडणूक भाजपा-अण्णा द्रमुक यांची युती लढणार असल्याची घोषणा स्वतः अमित शहा यांनी चेन्नईत येऊन केली.

अण्णा द्रमुकशी युती करण्यात भाजपाचे मावळते प्रदेशाध्यक्ष अन्ना मलाई यांचा मोठा अडथळा होता. त्यांचा अण्णा द्रमुकशी युती करायला कठोर विरोध होता. स्वतः अन्ना मलाई हे लढाऊ नेतृत्व आहे. त्यांनी द्रमुक सरकारच्या विरोधात लढताना पक्षात जान आणली व पक्षाचा पाया भक्कम केला हे मान्य करावेच लागले.

जिथे भाजपाला कोणी विचारत नाही, भाजपाची केडर नाही, अशा राज्यात भाजपाच्या मतांची टक्केवारी ३ वरून ११ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात अन्ना मलाई यांचे मोठे योगदान आहे. म्हणूनच अन्ना मलाई यांच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करणे व त्यांना पदावरून दूर करणे हे भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाला कठीण होऊन बसले होते. अन्ना मलाई हे निवृत्त आयएएस अधिकारी आहेत. ते तरुण आहेत.

सन २०१९ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली व भाजपात प्रवेश केला. आपल्या दमदार कामाने त्यांनी मोदी-शहांचेही मन जिंकले. त्यांच्या कामाची तडफ पाहूनच त्यांच्यावर तामिळनाडूच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी दिली. प्रदेशाध्यक्ष झाल्यावर त्यांनी सत्तेवरील द्रमुक सरकारच्या विरोधात जोरदार मोहीम सुरू केली. स्टॅलिन सरकारला सतत ते हैराण करू लागले. सन २०२६ मध्ये तामिळनाडूमध्ये होणारी विधानसभा निवडणूक अन्ना मलाई यांच्याच नेतृत्वाखाली भाजपा लढवणार असे सर्वांना वाटले होते. आगामी विधानसभा निवडणुकीत अन्ना मलाई हेच भाजपाचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असतील अशीही चर्चा होत असे. राजकारणात दिसते तसे नसते याची प्रचिती सर्वांनाच आली. भाजपा श्रेष्ठींनी भाकरी फिरवली. अचानक अन्ना मलाई यांची प्रदेशाध्यक्षपदावरून पक्षाने उचलबांगडी केली. त्यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटविल्याशिवाय द्रमुकशी युती होणार नाही, याची श्रेष्ठींना खात्री होती. म्हणून त्यांच्या जागी नयनार नागेंद्र यांची पक्षाने नेमणूक केली व लगेचच भाजपा-द्रमुक युती झाल्याची घोषणा केली. ६४ वर्षांच्या नयनार नागेंद्रन यांनी भाजपाचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष म्हणून १२ एप्रिल रोजी सूत्रे हाती घेतली. नागेंद्रन हे मृदुभाषी व्यक्तिमत्त्व आहे. दक्षिणी तिरूनेलवेली मतदारसंघातून ते आमदार आहेत. अन्ना मलाईंसारखे ते आक्रमक नाहीत, मग पक्षाचा अजेंडा कसा राबवणार? अण्णा द्रमुकचे नेते जे म्हणतील ते मान्य करून युती भाजपाला युती चालवायची आहे. स्टॅलिन सरकारचा पराभव हा एकमेव अजेंडा भाजपा-अण्णा द्रमुक युतीपुढे आहे.

लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने तामिळनाडू हे पाचवे मोठे राज्य आहे. भाजपाने कर्नाटकमध्ये जम बसवला, पण केरळ व तामिळनाडूत भाजपाला फारसा शिरकाव करता आला नाही, आता २०२६ च्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाने अण्णा द्रमुकला पुन्हा बरोबर घेऊन पक्ष विस्ताराचा अजेंडा तयार केला आहे.

२०२४ ची लोकसभा निवडणूक भाजपाने स्वबळावर तामिळनाडूत लढवली होती. या निवडणुकीत भाजपाला ११ टक्के मते मिळाली. लोकसभा निवडणुकीत भाजपाचा एकही उमेदवार खासदार म्हणून निवडून आला नाही. तत्कालीन प्रदेशाध्यक्ष अन्ना मलाई हे सुद्धा पराभूत झाले. तामिळनाडूत पक्षाला मोठा आधार नाही व स्वबळावर निवडणूक लढणे हे फायद्याचे नाही हे भाजपा श्रेष्ठींच्या लक्षात आले.

पुन्हा जुन्या मित्रपक्षाला बरोबर घेऊन आगामी विधानसभा निवडणूक लढवावी असा विचार पक्षात प्रबळ होऊ लागला, त्यातूनच भाजपाची साथ सोडून गेलेल्या अण्णा द्रमुक पक्षाला भाजपाने पुन्हा पायघड्या अंथरल्या. संसदेचे अधिवेशन संपल्यावर अण्णा द्रमुकच्या नेत्यांनी दिल्लीत जाऊन अमित शहांबरोबर चर्चा केली आणि अमितभाईंनी चेन्नईला जाऊन भाजपा-अण्णा द्रमुक युतीची घोषणा केली.

अण्णा द्रमुक व भाजपापेक्षा द्रमुकचा जनाधार मोठा आहे. पलानीस्वामीपेक्षा स्टॅलिन यांचा जनाधार मोठा आहे. पण त्यांना अँटी इनकबन्सीचा फटका बसण्याचीही शक्यता आहे. तामिळनाडूत भाजपाने अण्णा द्रमुकला महत्त्व देऊ केले आहे. दीड वर्षांच्या फारकतीनंतर भाजपा व अण्णा द्रमुक पुन्हा युती झाली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तामिळनाडूतील सर्व ३९ जागांवर द्रमुकचे खासदार विजयी झाले. द्रमुकला ४६.९ टक्के मते मिळाली. भाजपाने तामिळनाडूत लोकसभेच्या ३९ पैकी २३ जागा लढवल्या. पण सर्वत्र भाजपाचा पराभव झाला. २०१९ लोकसभा निवडणुकीत भाजपाला ३.६ टक्के मते मिळाली होती, सन २०२४ मध्ये ५.५ टक्के, २००९ मध्ये २.३ टक्के, २००४ मध्ये ५.१ टक्के मते मिळाली होती.

■ ■ ■

# आंतरराष्ट्रीय आवाज दिन

**उत्तरार्ध**
**कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३.**

मेंथॉलमुळे वेदना तात्पुरत्या थांबतात आणि आराम मिळाल्यासारखे वाटते. त्यामुळे खरेतर आवाज बसलेला असताना देखील तुम्ही बोलू लागता, अशाने आवाजाला अधिक जास्त त्रास होतो. दुसरे म्हणजे चोखून खाण्याच्या गोळ्यांमधील साखर घसा कोरडा करते, त्यामुळे बोलायला अजून सोपे जाते. ४) आवाजाला काही त्रास होत असेल, तर तो दूर होईपर्यंत थांबा. सत्यः आवाजाला काही त्रास होत असेल किंवा आवाज बदलला असेल तर आवाजाला थोडा आराम मिळण्यासाठी एक आठवडाभर वाट पाहणे ठीक आहे. त्यानंतर देखील आवाजात काही सुधारणा होत नसेल तर लॅरीन्गओलॉजिस्ट किंवा ईएनटी सर्जनला दाखवावे. ते तुमच्या स्थितीचे नेमके निदान करतील आणि त्यानुसार उपचार करतील. ४) जर आवाज बसला असेल तर चहामध्ये मध व लिंबू मिसळून किंवा व्हिस्की, गरम पाणी, साखर, लिंबू मिसळून प्यावे. सत्यः स्वर पटांना ओलसर ठेवायचे असेल तर पाणी हा एकमेव उपाय आहे. वर उल्लेख केलेली पेये ?सिडिक आहेत, त्यामुळे आम्लपित्ताचा त्रास होऊ शकतो, जो आवाजासाठी अजून जास्त हानिकारक आहे. त्यामुळे आवाजाचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. जर आवाज बसला असेल तर पाण्याखेरीज इतर कोणतेही पेय पिणे टाळणे उत्तम. ५) बिटाडाईनने गुळण्या केल्यास आवाज बरा व्हायला मदत होते. सत्यः गुळण्या घशाच्या पोकळीत केल्या जातात. ते स्वरयंत्रात असलेल्या कंठातील पोकळीपर्यंत किंवा स्वर पटापर्यंत पोहोचत नाही, त्यामुळे त्याचा काहीही उपयोग होत नाही. ६) वेपिंग हे तुमच्या आवाजासाठी धुम्रपानाइतके वाईट नाही. सत्यः वेपिंग किंवा ई-सिगारेट या तुमच्या फुफ्फुसांसाठी तितक्याच हानिकारक असतात. जर त्याचा विपरीत परिणाम तुमच्या श्वासावर होत असेल तर आवाज आणि गाण्यावर देखील त्याचा परिणाम होणार हे नक्की. धुम्रपानामुळे व्होकल फोल्ड एडेमा किंवा रेन्के एडेमा होतो, तसेच कर्करोग होण्याची शक्यता असते. ७) कफ असेल तर घसा साफ करणे चांगले असते. सत्यः घसा साफ केल्याने स्वर पटांवर खूप ताण पडतो आणि आवाजाचे नुकसान होते. जर तुम्हाला घसा साफ करावासा वाटत असेल, तर एक घोट पाणी प्या किंवा कफ गिळण्याचा प्रयत्न करा. ८) गाताना डोक्यातून आवाज येतो. सत्यः आवाज आपल्या स्वर पटांमध्ये निर्माण केला जातो, आणि अशी काही चेंबर्स असतात जिथे आवाज प्रतिध्वनीत होतो. त्यामुळे गायकाला असे वाटते की आवाज डोक्यामध्ये घुमत आहे, याला हेड रजिस्टर म्हणतात. ९) आवाजाची काही समस्या असेल तर शस्त्रक्रिया हा त्यावरील एकमेव उपाय आहे. सत्यः आवाजाला काही त्रास होत असेल तर फुल टाईम स्पेशालिटी सिस्टिम असलेल्या रुग्णालयातील लॅरीन्गओलॉजिस्ट किंवा ईएनटी सर्जनला दाखवा, ते तुमच्या समस्येचे नेमके निदान करतील आणि त्यानुसार थेरपी किंवा शस्त्रक्रिया करून उपचार करतील. कंठातील पोकळीमध्ये संसर्ग होण्यासारख्या काही समस्यांवर औषधे दिली जातात आणि सुधारणा होते का ते पाहिले जाते. ■ ■ ■

# खरा आनंद



राजिंदरसिंहजी महाराज

सृष्टीच्या सुरुवातीपासूनच मानवाचा हा प्रयत्न आहे की, त्याने आपल्या जीवनात आनंदाने जगावे म्हणून तो अशीच कृती करण्याचा प्रयत्न करतो कि, ज्यामुळे त्याला असे वाटते कि त्याला आनंद मिळेल.

आपल्या पैकी बरेचसे लोक असा विचार करतात की, जेव्हा आपले शरीर सुदृढ असेल, आपल्याजवळ भरपूर पैसा असेल, आपले नातेसंबंध चांगले असतील, एक मोठे घर असेल आणि एक यशस्वी कारकीर्द असेल, तेव्हा आपल्याला खुशी प्राप्त होईल. याकरिता त्याचा असा प्रयत्न असतो की, संसारात काही तरी व्हावे, आपले शारीरिक स्वास्थ्य चांगले राहावे, आपण नावलौकिक कमवावा, धन-दौलत कमवावी, आपले कुटुंबीय व नातेसंबंध चांगल्या प्रकारे निभवावे, या सर्व भौतिक सुखांना प्राप्त करण्यात आपला अमूल्य वेळ या कार्यात खर्च करतो.

हे बाह्य सुख प्राप्त करण्याकरिता आपण त्याच्या मागे बालपणापासूनच धावपळ करीत असतो. जेव्हा मूल जन्माला येते तेव्हा आपण त्याला जगाच्या बाह्य आकर्षणा मध्ये उदाहरणार्थ - खुळखुळा, मोबाईल, संगीतमय खेळणी आणि चहूबाजूला चमचमणारी एक छोटीशी दुनिया बनवितो, जेणेकरून या सगळ्या गोष्टींना पाहून तो खुश रहावा. जस जसा तो मोठा होतो, तेव्हा आपण त्याला आपली संस्कृती आणि जीवनशैली शिकवितो, कारण की आपल्याला असे वाटते, हे सर्व त्याच्या शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक विकासा करिता आवश्यक आहे. ज्यामुळे तो प्रसन्नतेचे जीवन जगू शकेल. कालांतराने या सर्वांमध्ये अडकून आपल्या मोठ्या वडीलधाऱ्या माणसांसारखेच तो सुद्धा या दुनियेत मग्न होत जातो आणि आपल्या वास्तव आत्मिक स्वरूपाला विसरून जातो.

आपल्यापैकी बरेचसे लोक स्वतःला शरीर आणि मन समजतात. आपला सर्व वेळ आपले शरीर आणि बौद्धिक गरजा पूर्ण करण्याकरता खर्च करतात. कारण की आपल्याला हेच शिकविले जाते की खुशी केवळ या दोन्ही क्षेत्रात सफल झाल्यानेच प्राप्त होते. ज्यामुळे आपले जीवन एखाद्या वेगवान यंत्राप्रमाणे होत जाते. ज्यामध्ये आपण आपला सर्व वेळ शारीरिक गरजा उदाहरणार्थ अन्न, वस्त्र, निवारा यांच्या पूर्ती करिता आणि त्याला आराम देण्याकरिता विविध प्रकारच्या खुशी इत्यादींमध्ये व्यतीत करतो. याच बरोबर आपण आपल्या बौद्धिक विकासाकरिता आपला बराचसा वेळ एक चांगलं शिक्षण प्राप्त करण्यात घालवितो. ज्याद्वारे, आपण एक सोनेरी उज्वल भविष्य बनवून या जगात नावलौकिक आणि धन-दौलत कमवू शकू.

जर आपण आपल्या जीवनावर एक नजर टाकली तर आपण सर्व आयुष्य आपल्या मनाच्या इच्छा पूर्ण करण्यात व्यतीत करतो. जेणेकरून आपल्या मनाला आनंद होईल. मन खुश राहील. या व्यतिरिक्त आपले नातेवाईकां बरोबरचे भावनिक संबंध दृढ करण्यासाठी, आपला अमूल्य वेळ त्यांच्याशी नातेसंबंध जोडण्यात खर्च करतो. कारण, आपण असा विचार करतो की, जेव्हा आपल्याला कधी शारीरिक अथवा मानसिक यातना होईल, तेव्हा हे नातेवाईक आपल्याला सहाय्यक होतील.

याकडे आपण जर लक्षपूर्वक पाहिले तर आपल्याला लक्षात येईल की, या जगात शारीरिक, मानसिक, बौद्धिक खुशी प्राप्त करीत असताना आपल्याला अशी भीती वाटत असते की आपण ही यांच्यातच कायमचे गुरफटून जाऊ. यांच्यातले कोणतेही सुख कायमस्वरूपी नाही कारण की या जगातील प्रत्येक वस्तू नाशवान आहे.

महापुरुष आपल्याला समजावितात की आपणास खरे सुख प्राप्त करायचे असेल तर, ते बाह्य जगात नसून ते आपल्या अंतरीच आहे. त्याकरिता आपल्याला आपले लक्ष बाह्य दुनियेच्या आकर्षणा पासून हटवून आपल्या आत्म्याकडे लावलं पाहिजे. आपल्याला हे शाश्वत सुख प्राप्त करण्यासाठी कोण्या एखाद्या पूर्ण महापुरुषाच्या चरणकमली जावे लागेल. ध्यान ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये आपण आपले ध्यान बाह्य जगतापासून हटवून आपल्या आत्म स्थानी, दोन डोळ्यांच्या मधोमध भ्रुमध्य शिवनेत्रावर टिकविले पाहिजे.

प्रभू परमात्मा सुख, शांती व प्रेमाचा स्त्रोत आहे. त्याच्याशी जोडले गेल्याने आपण सुद्धा त्या प्रेम व खुशीचा अनुभव करू शकतो. ज्यामुळे आपला या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला जातो.

■ ■ ■

# सज्जनांची निष्क्रियता कुणाच्या पथ्यावर?

**उत्तरार्ध**
**मिलिंद गड्डमवार**
**सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार**
**राजुरा, जि. चंद्रपूर.**
**9511215200**

**(कालच्या अंकावरून पुढे)**

त्यांच्या डोळ्यादेखत पैसे घेऊन कामे केली जातात. तरीही ते अनदेखा करतात.आजच्या तरूणाईला हे दृश्य दिसत नाही कां? खुलेआम चालणारी लूट दिसत असूनही ते यांस विरोध करण्यास तयार नाहीत. पैसे देऊन आप आपली कामे करवून घेतली जात आहेत. मग तो आमदाराचा माणूस असो वा खासदारांचा ! कुणीही सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यास तयार नाहीत.

याचे कारणं सरकारी कामांमध्ये हस्तक्षेप करण्याचा फौजदारी कायदा आपल्या संघटनेच्या बळावर कर्मचारी व अधिकारी लोकांनी आपल्या बाजूने पास करवून घेतलेला आहे. आज सामान्य माणसांकडून कुठलेही फौजदारी कायदे हे अस्तित्वात आलेले नाहीत. या कायद्यांमुळे भ्रष्टाचाराला बळकटी प्राप्त झाली आहे. याकडे जनतेचे लक्ष केंद्रित करणे गरजेचे वाटते आहे.

सज्जन शक्ती ही काही आकाशातून पृथ्वीवर पडत नसते.तर ती लोकांमधूनच निर्माण करावी लागत असते. यासाठी वेळप्रसंगी अपमान पणं सहन करावा लागतो. २५-३० वर्षांपुर्वी भ्रष्टाचाराचा एवढा सुकाळ पहायला मिळत नव्हता. अधिकारी लोकांना हाताखालील लोक मानसन्मान देत होते. त्यांचा आपल्या कर्मचाऱ्यांवरील वचक पहायला मिळत होता.ते आपले अधिकार खुलेपणाने वापरत होते.ते कुणाही लोकप्रतिनिधींना, पदाधिकाऱ्यांना घाबरून सरकारी कामे नियमबाह्य पद्धतीने करीत नव्हते. त्यांचा रूबाब पहायला मिळत होता.

आजचे चित्र एकदम बदलून गेल्याचे पहायला मिळते आहे. अधिकारी व कर्मचारी वर्ग हा आमदार-खासदार यांचे हस्तक बनून वागत असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे आमदार-खासदारांना वैयक्तिक कामांसाठी जनतेला हाती धरावे लागते आहे. जनतेचा कुठलाही वचक हा नोकरदारांवर आज राहिलेला नसल्याने जनता दुबळी झाली आहे. याचाच फायदा नोकरशहा वर्ग आज घेतांना आढळून येतो आहे.

स्वातंत्र्यानंतरची जनता ही आज मालक राहिलेली नसून सत्ताधारी व नोकरशाहीची गुलाम बनलेली आहे. यासाठी जनतेला नव्याने व नेटाने या व्यवस्थेविरोधात लढा उभारावा लागणार आहे. यासाठी तरूणाईने पुढे येणे गरजेचे वाटते आहे. पाहू या कोण पुढे येतो ते.

■ ■ ■

# टोमॅटो खाण्याचे जसे फायदे तसे तोटे



अनेकजण वजन कमी करण्यासाठी रात्रीच्या जेवणामध्ये टोमॅटोचं सूप पितात. टोमॅटो तुमच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते.

टोमॅटो आरोग्यासाठी देखील खूप फायदेशीर मानले जाते. टोमॅटोमध्ये लायकोपिन नावाचा घटक असतो, जो अनेक समस्यांपासून आराम देऊ शकतो. कोलेस्टेरॉलच्या रुग्णांसाठी टोमॅटो फायदेशीर मानले जाते. टोमॅटोचे असंख्य फायदे आहेत, परंतु टोमॅटोचे सेवन सावधगिरीने करावे. जर असे लोक टोमॅटो खाल्ले तर ते अडचणीत येऊ शकतात.

अहवालानुसार, ज्यांचे पोट संवेदनशील आहे आणि ज्यांचे पोट ॲसिड रिफ्लक्सचा त्रास आहे त्यांनी टोमॅटो खाऊ नये. टोमॅटो नैसर्गिकरित्या आम्लयुक्त असतात आणि त्यामुळे पोटात जळजळ आणि अस्वस्थता निर्माण होऊ शकते. टोमॅटो आम्लयुक्त असतो आणि त्यामुळे छातीत जळजळ होण्याची समस्या उद्भवू शकते. टोमॅटो खाल्ल्यानंतर जर तुम्हाला अपचन आणि पोटात त्रास होत असेल तर टोमॅटो टाळावेत. अशा लोकांनी कच्चे टोमॅटो खाणे टाळावे.

किडनी स्टोनच्या रुग्णांनी टोमॅटो टाळावेत. तथापि, टोमॅटो फक्त ऑक्सलेट स्टोन असलेल्या लोकांसाठी हानिकारक असू शकतात. टोमॅटोमध्ये ऑक्सलेट नावाचा घटक असतो, जो शरीरात कॅल्शियमसोबत एकत्र येऊन खडे तयार करू शकतो. जर एखाद्या व्यक्तीला ऑक्सलेट किडनी स्टोनचा इतिहास असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच टोमॅटो खावेत.

अनेक लोकांना अन्नाची ॲलर्जी असते आणि काही पदार्थ खाल्ल्याने त्या होऊ शकतात. काही लोकांना टोमॅटोची ॲलर्जी असू शकते. ही ॲलर्जी सौम्य ते गंभीर असू शकते. जर एखाद्याला टोमॅटोची ॲलर्जी असेल तर टोमॅटो आणि त्याचे पदार्थ जसे की सॉस, केचप किंवा पॅक केलेले पदार्थ टाळावेत.

टोमॅटोमध्ये असलेले संयुगे काही औषधांच्या प्रभावीतेवर परिणाम करू शकतात. विशेषतः रक्त पातळ करणारी औषधे घेणाऱ्या लोकांनी टोमॅटो टाळावेत. संधिवात आणि सांधेदुखीने ग्रस्त असलेल्या लोकांच्या समस्या वाढू शकतात. अशा लोकांनी टोमॅटोपासूनही दूर राहावे.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## हॅपी ॲनिव्हर्सरी?

लग्न म्हणजे
जन्मजन्मांतराच्या गाठी
ही शिकवण देते
भारतिय संस्कृती . . !

लग्न म्हणजे
एक गेम असतं
तुमचं आमचं
भौ सेम असतं . . !

उर्वरीत आयुष्य
जगायचं असेल सुखात
तर एकमेकांची कदर
व तडजोड करावी मनात . !

# प्रमुख सदस्य बाहेर पडत असल्याने डब्ल्यूएचओ चे औचित्य संपुष्टात येत आहे का? भारत आपल्या स्थितीवर फेरविचार करणार का?

**नवी दिल्ली १६ मार्च :** संपूर्ण जगभरात जागतिक आरोग्य संघटनेवरील (डब्ल्यूएचओ) विश्वासाचे पुनर्मूल्यांकन केले जात आहे. अमेरिकेने या संस्थेमधून बाहेर पडण्याचा घेतलेला निर्णय एक महत्त्वाचे वळण देणारा टप्पा आहे. अमेरिकेच्या या निर्णयानंतर अर्जेंटिना, हंगेरी आणि रशियासारखे देखील आपल्या संबंधांवर पुनर्विचार करू लागले आहेत. टिकाकारांचे म्हणणे आहेकी, डब्ल्यूएचओ आता तटस्थ आरोग्य संस्था म्हणून काम करत नाही, तर काही शक्तिशाली देणगीदार आणि बाह्य हितसंबंधांच्या प्रभावाखाली काम करत आहे.

येथे एका व्यापक समस्येकडे आपले लक्ष जाते: बऱ्याचदा राष्ट्रीय वास्तविकतेकडे कानाडोळा करणारी एक जागतिक आरोग्य प्रणाली अनुकूल धोरण निर्मितीचा विरोध करते आणि व्यावहारिक परिणामांच्या तुलनेत विचारसरणीला प्राधान्य देते. भारतासारख्या देशात, जेथे १.४ बिलियन लोक विविध आरोग्य समस्यांशी झुंजत आहेत, तेथे ही ताठरता एक गंभीर अडचण आहे. स्वतःचा मार्ग स्वतःच काढण्याचा भारताचा ट्रॅक रेकॉर्ड आहे. एचआयव्ही / एड्स संकट आले तेव्हा किफायतशीर जेनेरिक औषधे प्रदान करण्याच्या बहुराष्ट्रीय दबावाविरुद्ध, भारत दृढतेने उभा राहिला आणि जागतिक पोहोच नव्याने व्याख्यायित केली. भारताचे पोलिओ अभियान विदेशी फ्रेमवर्कअंतर्गत काम करून नाही, तर स्थानिक इनोव्हेशन आणि समुदाय-नेतृत्वाच्या माध्यमातून यशस्वी झाले. आणि, कोव्हिड-१९ महामारीदरम्यान, भारताने केवळ आपला स्वतःचा डिजिटल लसीकरण प्लॅटफॉर्म (कोव्हिन) विकसित केला नाही, तर लसीची समानता सुनिश्चित करण्यासाठी टीआरआयपीएस माफीसाठी जागतिक आवाहनाचे नेतृत्व देखील केले. या केवळ आरोग्य यशोगाथा नाहीत, तर त्या आरोग्य सार्वभौमत्वाच्या ब्लूप्रिंट आहेत.

ग्रीसमधील हृदयरोगतज्ज्ञ आणि सर्वाधिक उल्लेखित हानी कमी करण्याचे संशोधक प्रोफेसर डॉ. कॉन्स्टॅन्टिनॉस फर्सलिनॉस म्हणाले, आजही जगभरात १.२ बिलियन धूम्रपान करणारे लोक आहेत आणि भारत व ब्राझिलसारखे देश जोखीम कमी करण्याच्या धोरणात सामील होण्याच्या संधीपासून वंचित आहेत आणि धूम्रपान करणाऱ्यांना कमी हानिकारक पर्यायांच्या त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवणे एक गंभीर बाब आहे. याचा विज्ञानाशी काहीएक संबंध नाही कारण विज्ञान तर अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे असे अनेक नैतिक प्रश्न उभे राहतात की, धूम्रपान करणाऱ्यांना ज्याची गरज आहे आणि जो त्यांचा हक्क आहे, ते त्यांना का दिले जात नाही.

भारत आत्मनिर्भर भारताचे स्वप्न बघत आहे. या आत्मनिर्भरतेस सार्वजनिक आरोग्य धोरण निर्मितीपर्यंत विस्तारित केले पाहिजे. यामध्ये आंतरराष्ट्रीय आरोग्य प्राथमिकता निर्धारित करण्यात जागतिक दक्षिण देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मोठ्या आवाजाची वकिली करणे, अंमलीकरणाच्या अधिक लवचिक, संदर्भ-संवेदनशील अजेंडाला प्रोत्साहन देणे सामील आहे. भारताने अशी मागणी केली पाहिजे की, जागतिक फंडिंग तंत्र हे राष्ट्रीय नैपुण्य आणि पुराव्यांची पायमल्ली करण्याऐवजी पूरक असावे. तसेच, देशातील सार्वजनिक आरोग्य इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये अर्थपूर्ण गुंतवणूक करणे, विशेषतः तंबाखू सोडविण्याबाबत, नुकसान कमी करून सुव्यवस्थित सार्वजनिक-खाजगी भागीदारीला प्रोत्साहन देणे- ज्यात भारतीय उद्योग, संशोधन संस्था, नागरिक संस्था आणि राज्य आरोग्य प्रणालींचा आवाज सामील असावा. जेणेकरून, भारताच्या वास्तविकतांमध्ये रुजलेले संदर्भ-जागरूक, शाश्वत उपाय तयार होऊ शकतील.

जग एका वळणावर उभे आहे- आणि भारत देखील. यावेळी बहुपक्षीयतेपासून दूर जायचे नाही, तर पुढाकार घेऊन अधिक चांगल्या पद्धतीने हे सांगितले पाहिजे की, आम्ही कोण आहोत आणि आम्हाला काय हवे आहे. जागतिक फ्रेमवर्क्स या जर जागतिक दक्षिणेच्या देशांसाठी बनलेल्या असतील तर त्या तेथे राहणाऱ्या आणि त्या भागाचे नेतृत्व करणाऱ्या लोकांनीच तयार केलेल्या असल्या पाहिजेत. आणि या बदलाची सुरुवात करण्यासाठी या वेळेइतकी योग्य दुसरी वेळ नाही आणि भारतापेक्षा जास्त योग्य देश नाही.

# जागतिक तज्ज्ञ सहमत आहेत: बदाम कार्डिओमेटाबॉलिक आरोग्य उत्तम ठेवतात आणि वजन व्यवस्थापनास मदत करतात



**मुंबई, १६ एप्रिल :** नवीन पीअर-रिव्ह्यू केलेल्या प्रकाशनात, जगातील आघाडीच्या आरोग्य व पोषण तज्ज्ञांनी निष्कर्ष काढला आहे की, दररोज बदाम खाल्ल्याने कार्डिओमेटाबॉलिक आरोग्यासाठी अर्थपूर्ण फायदे होतात. अकरा शास्त्रज्ञ व डॉक्टरांनी बदाम आणि कार्डिओमेटाबॉलिक आरोग्यावरील संशोधनाचे विश्लेषण केले आणि प्रमुख आरोग्य क्षेत्रांमध्ये बदामाच्या फायद्यांबाबत एकमत सादर केले. तज्ज्ञांना आढळून आले की दररोज बदाम खाणे हे हृदयाचे आरोग्य, वजन व्यवस्थापन आणि आतड्यांतील सूक्ष्मजीवांसाठी अनुकूल आहार धोरण आहे. या पेपरमध्ये निष्कर्ष काढण्यात आला आहे की, बदामाचे जास्त सेवन (दररोज किमान ५० ग्रॅम/१.८ औंस किंवा जवळपास दोन सर्व्हिंग) काही लोकांमध्ये वजन कमी करण्यास मदत करू शकते.

जगभरात कार्डिओमेटाबॉलिक आजार वाढत आहेत आणि मानवी आरोग्याचे संरक्षण करण्यात बदामांची भूमिका शोधणे अत्यंत महत्त्वाचे आहे. बदामांमध्ये पौष्टिक घटक संपन्न प्रमाणात असतात, तसेच बदाम जगभरात सर्वाधिक संशोधन करण्यात आलेले फूड देखील आहे,'' असे या पेपरचे सह-लेखक, युनिव्हर्सिटी ऑफ वॉशिंग्टनमधील महामारीविज्ञानाचे प्राध्यापक आणि जगातील आघाडीचे पोषण तज्ज्ञ डॉ. ॲडम ड्रेवोव्स्की म्हणाले. जगभरातील संशोधक बदाम कार्डिओमेटाबॉलिक गोलमेज परिषदेमध्ये आले होते. विविध दृष्टिकोन आणि सखोल तज्ज्ञता एकत्रित करत समूहाने एकमताने निष्कर्ष काढला की, बदाम कार्डिओमेटाबॉलिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम करतात. संभाव्य यंत्रणांमध्ये एलडीएल-कोलेस्टेरॉल कमी करणे आणि डायस्टोलिक रक्तदाब कमी करणे, आरोग्यदायी वजन व्यवस्थापनात मदत करणे आणि आतड्यांचे आरोग्य उत्तम राखणे याचा समावेश आहे.''

आशियाई भारतीयांसंदर्भात या संशोधनातून निदर्शनास आले आहे की, दररोज बदाम सेवन केल्याने हृदयाचे आरोग्य, चयापचय आणि वजन व्यवस्थापनात मदत होते. आशियाई भारतीयांमध्ये कार्डिओमेटाबॉलिक आजारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता बदामासारखे पोषक घटकांनी संपन्न, कमी ग्लायसेमिक फूड्स एलडीएल कोलेस्ट्रॉल, डायस्टोलिक रक्तदाब आणि फास्टिंग ब्लड ग्लुकोज कमी करण्यास मदत करू शकतात,'' असे फोर्टिस सेंटर फॉर डायबिटीज, ओबेसिटी ॲंड कोलेस्ट्रॉल (सी-डीओसी)चे अध्यक्ष आणि नॅशनल डायबिटीज ओबेसिटी ॲंड कोलेस्ट्रॉल फाउंडेशन (एनडीओसी), इंडियाचे प्रमुख डॉ. अनुप मिश्रा म्हणाले.

नॅशनल डायबिटीज, ओबेसिटी ॲंड कोलेस्ट्रॉल फाउंडेशनच्या न्यूट्रिशन रिसर्च ग्रुपच्या प्रमुख डॉ. सीमा गुलाटी म्हणाल्या, भारतातील वाढती कार्डिओमेटाबॉलिक आरोग्यासंदर्भात समस्या पाहता अगदी योग्य वेळी हे पीअर-रिव्ह्यू केलेले प्रकाशन करण्यात आले आहे. यामधून निदर्शनास आले की, बदामाचे सेवन आशियाई भारतीयांमध्ये एलडीएल कोलेस्ट्रॉल, फास्टिंग ब्लड ग्लुकोज आणि एचबीए१सी कमी करण्यास मदत करू शकते. हे संशोधन बदाम वजन वाढण्यास कारणीभूत ठरतात या गैरसमजाला दूर करते आणि त्याऐवजी निदर्शनास आणते की, दररोज ५० ग्रॅम (१.८ औंस) बदाम सेवन केल्याने वजन कमी होण्यास मदत होऊ शकते.''

कार्डिओमेटाबॉलिक आरोग्यामध्ये हृदय, रक्तवाहिन्या आणि चयापचय प्रणालीचे आरोग्य किंवा शरीराची अन्न पचन करण्याची प्रक्रिया यांचा समावेश असतो. हृदयरोग, लठ्ठपणा आणि मधुमेह यांसारखे कार्डिओमेटाबॉलिक आजार जगभरात साथीच्या आजाराप्रमाणे पसरत आहेत, ज्याला अनारोग्यकारक आहार आणि अयोग्य जीवनशैली कारणीभूत आहे.

दशकांच्या वैज्ञानिक पुराव्यांची काळजीपूर्वक तपासणी केल्यानंतर आम्ही निष्कर्ष काढला की, बदाम हृदय आणि चयापचय आरोग्यासाठी पूर्णपणे अनुकूल आहेत. दररोज स्नॅक्स म्हणून बदामांचे सेवन केल्याने, तसेच सलाड्स व इतर पाककलांमध्ये बदामांचा समावेश केल्याने प्लाझ्मा लिपिड प्रोफाइल आणि आहाराचा दर्जा सुधारतो, यासोबत जीवनाचा दर्जा देखील उत्तम राहतो,'' ड्रेवोव्स्की म्हणाले.

# टाटा एआयजीची नवी 'मेडिकेयर सिलेक्ट' आपली रिटेल पोहोच वाढवण्यासाठी सुरु केली आधुनिक आरोग्य योजना

**मुंबई, १६ एप्रिल :** टाटा एआयजी जनरल इन्श्युरन्स कंपनीने 'मेडिकेयर सिलेक्ट' सुरु करत असल्याची घोषणा आज केली आहे. ही आधुनिक आरोग्य विमा योजना आहे, रिटेल आरोग्य पोर्टफोलिओ अधिक मजबूत करणे आणि संपूर्ण भारतभर आरोग्य सेवा पोहोच वाढवणे हा याचा उद्देश आहे. व्यापक धोरणांतर्गत आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत आपले हॉस्पिटल नेटवर्क ११,५०० वरून १४,०००+ वर नेण्याचे टाटा एआयजीचे उद्दिष्ट आहे. कंपनीचे हे देखील अनुमान आहे की, या कालावधीत त्यांच्या आरोग्य विमा पोर्टफोलिओचा ३५% भाग द्वितीय आणि तृतीय श्रेणी बाजारपेठांमधून येईल, जो सध्या २६% आहे. ही बाब कमी सेवा पुरवल्या जात असलेल्या क्षेत्रांवर आणि सखोल रिटेल पोहोच वाढवण्यावर कंपनी जास्त लक्ष केंद्रित करत असल्याचे दर्शवते.

ही योजना सुरु करणे टाटा एआयजीच्या आपल्या रिटेल आरोग्य पोर्टफोलिओ मजबूत करण्याशी आणि भविष्यासाठी तयार आरोग्य योजना प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करण्याशी अनुरूप आहे. मेडिकेयर सिलेक्ट लवचिक आणि सर्वसमावेशक कव्हरेज पर्याय प्रस्तुत करून शहरी आणि निम-शहरी दोन्ही बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याच्या कंपनीच्या व्यापक महत्त्वाकांक्षेचा एक भाग आहे.

भारतीय आरोग्य विमा क्षेत्रामध्ये अनेक बदल, अतिशय वेगाने घडून येत आहेत, हे क्षेत्र १८% सीएजीआर ने वाढत असल्याचे अनुमान आहे. वाढते मेडिकल खर्च, आरोग्याविषयी वाढती जागरूकता आणि जीवनशैलीशी संबंधित आजारांचे वाढणे ही यामागची कारणे आहेत. भारतातील सर्वसाधारण विमा बाजारपेठ आर्थिक वर्ष २०३१ पर्यंत ५.६ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल अशी आशा आहे, यामध्ये आरोग्य विमा सहज, सुलभ आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवेचा एक प्रमुख प्रवर्तक बनेल.

टाटा एआयजी जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेडचे चीफ अंडररायटिंग आणि डेटा सायन्स ऑफिसर नील छेडा यांनी सांगितले, मेडिकेयर सिलेक्टमध्ये व्हॅल्यू, व्हर्सटॅलिटी आणि पोहोच यांना एकत्र आणले गेले आहे. ही योजना अर्थपूर्ण सुरक्षा प्रदान करते, जे आजच्या काळातील ग्राहकांच्या बदलत्या आरोग्य सेवा गरजांनुरूप आहे. जसजसा वैद्यकीय खर्च वाढत आहे आणि आरोग्य स्थिती बदलत आहे, ही योजना व्यक्ती आणि परिवारांना कोणतीही तडजोड करावी न लागता कव्हर्ड राहण्यासाठी सक्षम बनवते. गेल्या तीन वर्षात आमच्या रिटेल आरोग्य योजनांना स्वीकारले जाण्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून आले आहे, आणि ही योजना आम्हाला आमची पोहोच अजून जास्त भौगोलिक क्षेत्रांपर्यंत आणि विभागांपर्यंत वाढवण्यात मदत करेल, ज्यामुळे दर्जेदार आरोग्य सेवांपर्यंत व्यापक पोहोच सुनिश्चित होईल.

# तेनाली उपाय शोधताना शक्तीवर विसंबून न राहता मन आणि बुद्धी बळाचा वापर करतो : कृष्ण भारद्वाज

**मुंबई, १५ एप्रिल :** सोनी सबवरील तेनाली रामा ही मालिका एका अत्यंत चतुर आणि मुत्सद्दी अशा तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज) या दरबारी कवीच्या सुरस रम्य कथा सादर करून प्रेक्षकांचे मन जिंकून घेत आहे.



तेनालीने गोंधळ माजवणाऱ्या दरबारी तांत्रिकाचे पितळ कसे उघडे पाडले हे अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले.

आगामी भागांमध्ये, रामा आणि कृष्णदेवराय (आदित्य रेडिज) यांना उमगते की, केदाली मिशन हे केवळ दिशाभूल करण्यासाठी होते. बहामनी लोकांचा मुख्य उद्देश तर भुयारी मार्ग आणि प्रशिक्षित लांडग्यांचा उपयोग करून विजयनगर सम्राज्यावर गुपचुप हल्ला करण्याचा आहे. पुढचा संकेत मिळवण्यासाठी लांडग्यांचा माग काढण्याचा अम्माचा (निमिषा वखारिया) सल्ला ऐकून रामा एक अशी खास शीळ निर्माण करतो, जिची मूक स्पंदने फक्त लांडग्यांनाच ऐकू येतात. पण अम्माचा सफाई करत असताना तिच्या नकळत ही स्पंदने छेडते व त्यामुळे योजना फिस्कटते. आणि गोंधळलेले लांडगे रामाच्या घराकडे वळतात. एका तीव्र संघर्षात, रामा लांडग्यांना सापळ्यात अडकवतो आणि त्यांच्या मानेवर त्याला एक निशाणी दिसते, ज्यावरून त्याला खरा गुन्हेगार कोण आहे ते समजते. त्यानंतर तो पुराव्याचे विविध तुकडे जोडून दरबारात हा कट उलगडून दाखवतो आणि बहामनींना पुन्हा एकदा माघार घेण्यास भाग पाडतो.

विजयनगरचे रक्षण करण्यासाठी तेनाली रामा वेळच्या वेळी खऱ्या कट करणाऱ्याला शोधून काढू शकेल का?

या मालिकेत तेनालीची भूमिका करणारा कृष्ण भारद्वाज म्हणतो, आम्ही आत्तापर्यंत केलेल्या शूटिंगपैकी हा सगळ्यात थरारक आणि आव्हानात्मक भाग होता. रामाची बुद्धिमत्ता आणि संभाषण चातुर्य ही त्याची खरी ताकद आहे. या कथानकात पुन्हा एकदा हे सिद्ध होते की त्याचे प्रसंगावधान हेच कसे त्याचे महत्त्वाचे शस्त्र बनते! या दृश्याचे शूटिंग करताना मानसिक आणि शारीरिक दमछाक झाली. मला रामाविषयी सगळ्यात जास्त काय आवडत असेल, तर ते हे की, तो बळावर विसंबून रहात नाही तर उपाय शोधण्यासाठी तो आपल्या मनाचा आणि बुद्धीचा वापर करतो. या कथाभागात तुम्हाला दिसेल की, अत्यंत दबावाच्या क्षणी देखील तो किती शांत राहू शकतो आणि त्यामुळे आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर शत्रूला नामोहरम करू शकतो. आमच्या संपूर्ण टीमने या दृश्यासाठी खूप कष्ट घेतले आहेत आणि ते ज्या प्रकारे साकारले आहे, ते पाहून मला अभिमान वाटतो. आपल्या अनोख्या शैलीने शत्रूला झुंजवणारा तेनाली रामा बघायला प्रेक्षकांना नक्की आवडेल, अशी मला खात्री वाटते.

# कलाकारांनी व्यक्त केली चहाप्रती त्यांची आवड!

**मुंबई, १५ एप्रिल :** आपल्यापैकी अनेकांना कपभर चहाचा आस्वाद घेण्यामधून कम्फर्ट मिळतो. पण शूटिंगचे व्यस्त वेळापत्रक, लवकर कॉल टाइम्स आणि भावनिकदृष्ट्या प्रखर सीन्सच्या अवतीभोवती गुंतलेल्या कलाकारांसाठी चहाचे महत्त्व मोठे आहे. नॅशनल टी डे निमित्त एण्ड टीव्ही कलाकार दैनंदिन सोबती असलेल्या चहासोबतच्या त्यांच्या नात्याबाबत सांगत आहेत, जेथे चहा त्यांना व्यस्त कामकाजादरम्यान ऊर्जा, उबदारपणा आणि आरामदायी क्षणांचा अनुभव देतो. स्मिता साबळे (मालिका 'भीमा'मधील धनिया), योगेश त्रिपाठी (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील दरोगा हप्पू सिंग) आणि शुभांगी अत्रे (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अंगूरी भाबी) त्यांच्या आवडत्या चहामधून कशाप्रकारे आरामदायीपणा व शांतता मिळते, तसेच चहा त्यांच्या व्यस्त जीवनामध्ये शांतमय व महत्त्वाची भूमिका कशाप्रकारे बजावतो याबाबत सांगत आहेत. मालिका 'भीमा'मध्ये धनियाची भूमिका साकारणाऱ्या स्मिता साबळे म्हणाल्या, ''चहा माझा शांतमयरित्या उत्साहित करणारा सोबती आहे. तो मला कोणत्याही शब्दांशिवाय समजून घेतो. पहाटेच्या वेळी इतर लोक अर्धवट झोपेत असताना मी लवकर सेटवर गेल्यानंतर स्वादिष्ट मसाला चहा पिते, जो मला उबदारपणा देतो आणि म्हणतो की 'तुला आता ऊर्जा मिळाली आहे'. मसाला चहाचा आस्वाद घेतल्यानंतर मला त्वरित ऊर्जा मिळते. थंडीच्या दिवसात मी आल्याची चहा पिते. चहाचा आस्वाद घेतल्यानंतर मनात निर्माण होणाऱ्या अनुभवामधून घरी असल्यासारखे वाटते. कडक उन्हाळ्यामधील शूटिंगदरम्यान मी ग्लासभर थंडगार लेमन टी पिते. हा चहा स्वादिष्ट, थंड असतो आणि त्वरित उत्साह वाढवतो. ग्रीन टीचा आस्वाद घेतल्यानंतर भावनिकदृष्ट्या प्रखर सीन्स देखील काहीसे सोपे वाटतात. हा चहा मला उत्साहित करतो. माझ्यासाठी चहा फक्त पेय नसून मूड उत्साहित करणारा आणि शांतमय भावना देणारा सोबती आहे.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील योगेश त्रिपाठी ऊर्फ दरोगा हप्पू सिंग म्हणाले, ''कुल्हडमध्ये चहाचा आस्वाद माझ्यासाठी मेडिटेशनसारखे आहे. व्यस्त दिवसासाठी तयारी करायची असो किंवा काहीसा आराम करायचा असो चहा नेहमी माझा मूड उत्साहित करतो. मी सकाळच्या वेळी चहाचा आस्वाद घेत दिवसाची सुरूवात करतो, ज्यामुळे मला ऊर्जा मिळते. मला दूध, चहापत्ती, साखर, आले, वेलची आणि कधी-कधी थोडीशी काळीमिरी वापरून तयार केलेला चहा खूप आवडतो. मला चहाचा आस्वाद घेण्यासोबत चहा बनवायला देखील आवडते. मी घरी असल्यावर तुम्हाला किचनमध्ये माझ्या पत्नीसाठी व स्वत:साठी चहा बनवताना पाहायला मिळेल. तिला मी बनवलेला चहा खूप आवडतो. ती म्हणते की, माझा चहा सर्वात स्वादिष्ट आहे आणि प्रामाणिकपणे सांगायचे तर मला ते कौतुक खूप आवडते. हे लहान शेअर केलेले टी ब्रेक्स व्यस्त दिवसानंतर पुन्हा उत्साहित होण्याचे मार्ग आहेत.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''मी चहाप्रेमी आहे, पण मला सुगंधी चहा आवडतो. तुम्हाला सांगते मी अस्तित्वात असलेल्या प्रत्येक चहाचा आस्वाद घेतला आहे. मी प्रवास करते तेव्हा नवीन व विविध प्रकारच्या चहाचा शोध घेणे माझी सवय बनली आहे. मॅराकेशमधील मारोक्कन पुदिना चहा, जपानमधील माचा चहा किंवा चीनमधील उलोंग चहा असो मला स्थानिक चहांचा शोध घ्यायला आवडते. पण माझा आवडता चहा म्हणजे देसी कुल्हडवाली चाय, नुकतेच मी वाराणसीला गेले होते, तेथे मी या चहाचा आस्वाद घेतला. चहाचा आस्वाद घेतल्यानंतर त्वरित माझ्यामध्ये ऊर्जा निर्माण झाली आणि मी प्रत्येक सिपचा मनसोक्त आस्वाद घेतला. अर्थी फ्लेवर अत्यंत अद्वितीय आहे, जो तुम्हाला तुमच्या मूळ संस्कृतीशी संलग्न करतो.''

# या आठवड्यात एण्ड टीव्हीवर ड्रामा व कॉमेडीचे मनोरंजन!

**मुंबई, १५ एप्रिल :** या आठवड्यात एण्ड टीव्हीवर प्रखर ड्रामा आणि हसवून-हसवून लोटपोट करणाऱ्या मनोरंजनासाठी सज्ज राहा. मालिका 'भीमा'मध्ये पारंपारिक विधीमुळे भावनिक अशांतता आणि धक्कादायक गोंधळ निर्माण होतो. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये रोमांचक वळण पाहायला मिळणार आहे, जेथे सिक्रेट चेम्बर प्रँक विनोदी स्वरूपात चुकीचे ठरतो. दरम्यान मालिका 'भाबीजी घर पर है' भयावह पण धमाल मनोरंजन देणार आहे, जेथे विभुतीची योजना रहस्यमय महिलेच्या आगमनासह उलटते. ॲक्शन, कॉमेडी आणि सरप्राइजेजने भरलेल्या मनोरंजनाचा आनंद घेण्यास चुकवू नका!



भीमा: मालिका 'भीमा'च्या आगामी एपिसोड्समध्ये प्रेक्षकांना भीमाच्या प्रवासामधील रोमांचक वळण पाहायला मिळणार आहे. कलिका (त्रिपुरारी यादव) धूर्तपणे एका व्यथित जोडप्याला भीमाकडे (तेजस्विनी सिंग) पाठवतो आणि ते जोडपे भीमाला कथित आत्म्यापासून मुक्त करण्यासाठी एक विधी करण्यास सांगते. अंतर्गत संघर्ष आणि कुटुंब व समाजाच्या प्रचंड दबावाशी झुंजत भीमा संकोचून विधी करण्यास सहमत होते. पण, भीमाने गाव न सोडल्याचे समजल्यानंतर कैलाशा बुआ (नीता मोहिंद्रा) तिला क्रूरपणे वागवण्याची धमकी देते, तेव्हा परिस्थिती आणखी बिकट होते. भीमाला कळते की तिच्या वडिलांना आमदाराने थप्पड मारली आहे, ज्यामुळे ती मनातून खचून जाते. घर सोडण्यासाठी कुटुंबावर समाजाकडून मोठा दबाव टाकला जात असताना भीमाला बाबासाहेब आंबेडकरांच्या शक्तिशाली शिकवणींमध्ये बळ मिळते. दरम्यान, कैलाशा बुआ आणि कलिका शाळेच्या एका कार्यक्रमादरम्यान सर्वांसमोर भीमाचा अपमान करण्याचा कट रचतात.

हप्पू की उलटन पलटन: मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोड्समध्ये तणाव वाढत जातो, जेथे अवधेशिया (उर्मिला शर्मा) कटोरी अम्माबाबत (हिमानी शिवपुरी) सतत अपमानानित टिप्पण्या करत राहते, ज्यामुळे कटोरी अम्माचे मन दुखावते. ती हप्पूला (योगेश त्रिपाठी) सांगते की त्याने अवधेशियाला तिची माफी मागण्यास सांगावे. हप्पू याबाबत राजेशला (गीतांजली मिश्रा) सांगतो तेव्हा ती त्याचा अपमान करते आणि प्रकरण फेटाळून लावते. दरम्यान पोलिस स्टेशनमधील एका केसमध्ये सिक्रेट चेम्बर असलेल्या कंत्राटदाराचा समावेश असतो, ज्यानंतर हप्पूला एक युक्ती सुचते. तो त्याच्या स्वत:च्या घरामध्ये सिक्रेट चेम्बर बांधण्यासाठी त्याच कंत्राटदाराला नियुक्त करतो. कौटुंबिक ट्रिपचा बहाणा करून तो सर्वांना दूर पाठवतो आणि त्यांच्या अनुपस्थितीत गुपचूपपणे चेम्बर बांधले जाते. त्यानंतर हप्पू व बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) चेम्बरमध्ये मद्यपानाचा आनंद घेत असतात, तेव्हा त्यांना अवधेशियाला अम्माची माफी मागण्यास भाग पाडण्यासाठी घाबरवण्याची योजना सुचते. बेनी चेम्बरच्या आतून भूतासारखा आवाज काढेल, ज्यामुळे घरातील सर्वांना वाटेल की घर भूताने झपाटलेले आहे. त्यानंतर ते अवधेशियाला घाबरवतील. योजना यशस्वी ठरणार असे वाटत असताना चेम्बरच्या इलेक्ट्रिक सिस्टममध्ये बिघाड होतो, ज्यामुळे बेनी चेम्बरच्या आतमध्ये अडकतो. हप्पू मदतीसाठी कंत्राटदाराच्या घरी जातो, तेव्हा त्याला धक्का बसतो की कंत्राटदार देखील त्याच्या सिक्रेट चेम्बरमध्ये अडकला आहे.

भाबीजी घर पर है : नशिबाच्या हास्यास्पद वळणात विभुती नारायण मिश्रा (आसिफ शेख) आणि डेव्हिड चाचा (अनुप उपाध्याय) घरकाम करत असताना एका गुप्त खोलीत जातात. आत त्यांना एक जुनी काळी डायरी सापडते. ते डायरी वाचायला सुरुवात करताच त्यांना मूळ घरमालक शर्मांची भावनिक कथा समजते, जो या खोलीत तासनतास रडत असायचा, त्याचे बालपणीचे प्रेम चंद्रलेखाची आठवण काढायचा, तसेच आपल्या पत्नीच्या टोमण्यांना सहन करू शकत नव्हता. डायरीतून प्रेरित होऊन विभुती एक खोडकर योजना आखतो. त्याच वेळी, अंगूरी भाभी (शुभांगी अत्रे) तिच्या घरातून नकारात्मकता दूर करण्यासाठी छोटासा विधी करत असते, तर व्यवसायात झालेल्या नुकसानीमुळे चिडलेला तिवारी (रोहिताश्व गौड) वाईट मूडमध्ये असतो. त्याच्या निराशेत तो चुकून पवित्र दिवा विझवतो, ज्यामुळे अंगूरी आणखी अस्वस्थ होते. दरम्यान, विभुती सर्व शेजाऱ्यांना रात्रीच्या जेवणासाठी आमंत्रित करतो आणि सर्वांना गुप्त खोली शोधल्याचे सांगतो.

## आज का अंदाज

गुरूवार १७ एप्रिल २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| ४७० | २५५ | २५८ | १२५ | २३९ | ४४७ | ६०० | २७० |
| ३८० | ६७९ | ७८० | २७९ | ५९० | ३३९ | ५५६ | ३६० |
| २९० | ५८९ | ६९० | ४६८ | ६८० | १२२ | ४६६ | ४५० |
| १० | २० | ५३ | ८३ | ४० | ५० | ६७ | ९७ |
| १९ | २९ | ५६ | ८६ | ४१ | ५१ | ६८ | ९८ |
| १७ | २७ | ५४ | ८४ | ४२ | ५२ | ६३ | ९३ |

**१७ एप्रिल : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ | ६९ | ७८ | ०८ |
| ३१ | ६१ | ७५ | ०५ |
| ३२ | ६२ | ७४ | ०४ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** अनावश्यक खर्च वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे जपून खर्च करा. घराबाहेर जाणे टाळा, कारण दुर्घटना होण्याची शक्यता आहे. वडीलधाजयांचे सहकार्य मिळेल. वेळेवर कामे पूर्ण होतील.

**वृषभ :** लोकांविषयी नकारात्मक विचार करू नका. कामात जे कष्ट घेतले आहेत, त्याचे त्यांना चांगले फळ मिळेल. गरीब लोकांना मदत केल्याने तुम्हाला आनंद वाटेल. लोक तुमच्या कामाची प्रशंसा करतील.

**मिथुन :** मनोरंजक प्रवास होण्याची शक्यता आहे. व्यवसाय चांगला चालेल. खर्चात वाढ होऊ शकते. कुटुंबातील सदस्याचे आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे.

**कर्क :** व्यक्तींच्या वैवाहिक जीवनातील ताण कमी होईल. दोघांमध्ये समजूतदारपणा वाढेल. भविष्यातील योजनांवर चर्चा कराल. वैवाहिक जीवनात प्रेम वाढेल. कुटुंबात एखादा कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

**सिंह :** गाडीमध्ये बिघाड होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे ते त्रस्त होतील. अनोळखी व्यक्तींबरोबर संवाद वाढेल, पण खासगी गोष्टी सांगणे टाळा. मालमत्तेचा व्यवहार यशस्वी होईल.

**कन्या :** कायदेशीर बाबतीत विजय मिळेल. जोडीदार तुमच्या सोबत खांद्याला खांदा लावून चालेल. उधार दिलेले पैसे परत मिळू शकतात. भूतकाळातील चुकांमधून शिकणे आवश्यक आहे.

**तुळ :** इतरांसमोर गोष्टी उघडपणे बोलणे टाळा. घरात ठेवलेल्या पैशांवर लक्ष ठेवण्याची गरज आहे. कारण त्यात गडबड होण्याची शक्यता आहे. बुडालेली रक्कम परत मिळू शकते. प्रवास आनंददायी राहील.

**वृश्चिक :** कार्यक्षेत्रात बदल संभवतात. उत्पन्नात वाढ होईल. समाजात मान-सन्मान वाढेल. नवीन कामे सुरु करण्याची योजना आखाल. घरात वाद होण्यापूर्वी सामज्यंस्य राखण्याचे प्रयत्न करा.


**धनु :** आज आनंदी राहाल. उत्साहात वाढ होईल. वडीलधाजयांचे सहकार्य मिळेल. धोका पत्करण्याचे धाडस कराल. नशिबाची साथ मिळेल. वेळेवर कामे होतील. प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**मकर :** उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील आणि मित्रांमधील संबंध सुधारतील. लहान भावांचे सहकार्य मिळेल. दुखापत आणि अपघातामुळे नुकसान होईल. अपेक्षित कामांना विलंब होऊ शकतो.

**कुंभ :** व्यापारात नवीन ग्राहक मिळतील, ज्यांच्यामुळे भविष्यात मोठा फायदा होईल. नवीन मित्र भेटू शकतात. विद्यार्थ्यांना काही कारणास्तव पालकांकडून ओरडा बसण्याची शक्यता आहे.

**मीन :** कार्यक्षेत्रात संयमाने काम करा. कोणत्याही अमिषाला भूलू नका. मैत्री तुटण्याची शक्यता आहे. कुटुंबात एखाद्या शुभ कार्याचे आयोजन होईल. काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न फळ देईल.

## शब्दकोडे क्रमांक २०८७



**आडवे शब्द :-**


१) मधुन मधुन तुटलेला
४) तसराळे
८) गाढव
१०) पातळ खांब
१२) जीवनावश्यक
१४) कमीज बरोबरचे वस्त्र
१७) एक उभयचर प्राणी
१९) बारीक तांदूळ
२०) धष्टपुष्ट मेंढा
२२) वाळा
२३) हात
२५) मेहेरबानी
२६) मंत्रीमंडळ
२८) श्वशुर
३१) गुणाकार
३२) आश्चर्याची गोष्ट
३३) उद्देशावाचून
३५) अवस्था
३६) कशा प्रकारचा
३८) पलंग
४०) जाणे, प्रस्थान करणे
४२) छाती
४३) खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
४४) पार ओटा
४५) दाढीवा प्राणी
४६) मनाचा ओढा
४७) प्रजा
४९) ओलसर हवा
५१) समुद्राच्या लाटांचा आवाज
५३) ढाक्याचे तलम कापड
५५) गाय
५६) हार, सर
५८) नीच, दुष्ट
६० ) बारा महिने
६२) हलणारी (संपत्ती)
६४) मोठी जाड सुई
६५) ध्वनी
६७) जमलेले सैन्य, एक शहर
६९) मोठी टोपली
७०) वर्ष, साल
७१) दौतीतील द्रव
७२) शंकर
७३) दिल्लीचे विमानतळ
७४) आजच्या आधीचा दिवस
७५) छोटे कुबड
७७) कंटाळवाणी बडबड
७८) तपस्या
७९) एक रंग
८०) परभारे

**उभे शब्द :-**

१) एक पवित्र वनस्पती
२) कट्टर ठाम मताचा
३) केव्हा
५) कमळ
६) तुझा (क.)
७) जमीन चोपण्याचे लाकूड प्राण
८) संतापी
९) उपवासाचे तांदूळ
११) गाळसाळ
१३) चाकर
१५) गडबडगुंडा
१६) रुक्ष
१८) युद्ध
२१) नदीचे वाढलेले प्रचंड पाणी
२३) लाकूड कापण्याचे हत्यार
२४) बोटाच्या टोकावरील कडक आवरण
२५) वापर
२६) बेचव, पचपचीत
२७) कर्णेंद्रिय
२८) शिर्डीचे संत
२९) द्रवपदार्थ
३०) पराग
३४) विरोध
३५) छोटी युद्धनौका
३७) सावली
३९) प्रचंड, मोठा
४१) सोटा
४३) लेखणी
४६) लेखणी वगैरे ठेवण्याची लहानशी डबी
४८) कुबेराचा सेवक
४९) एक श्वासरोग
५०) मळलेला
५२) लोक
५३) पुष्परस
५४) लोणचे
५७) नृत्य
५९) मुंबईचा घरगडी
६१) लग्न
६३) छोटासा
६६) करारातील दोन जोडशब्द
६७) वाळवी
६८) ललाट
७०) मनाला टोचणारे दुःख
७४) अक्षरापुढची उभी रेघ
७५) बैलाचा सण
७६) घाव, प्रहार

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# विविध योजनांच्या अंमलबजावणीतून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणार -मुख्यमंत्री

## विदर्भातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना 831.67 कोटी रुपये सानुग्रह अनुदानाचे वितरण



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 16 ) -** सन 2006 ते 2013 दरम्यान विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने भुसंपादन करण्यात आलेल्या जमीनीचा कमी मोबदला मिळाला असल्याने प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाला होता. हा अन्याय दूर करण्यासाठी राज्य शासनाने या कालावधीतील सरळ खरेदीने संपादीत केलेल्या क्षेत्राकरीता पाच लक्ष प्रति हेक्टर दराने 16 हजार 633 हेक्टर क्षेत्राकरीता 831 कोटी 67 लक्ष रुपये सानुग्रह अनुदान वितरीत करण्यास मान्यता दिली असून ही रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना खूप मोठा दिलासा मिळाला असून यापुढेही विविध शेतीविषयक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणार, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अमरावती विभागातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात सानुग्रह अनुदानाचे धनादेश मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, रवी राणा, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, उमेश यावलकर, संजय कुटे, श्रीमती कैकई डहाके, माजी आमदार प्रवीण पोटे पाटील तसेच विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे संस्थापक तथा अध्यक्ष मनोज चव्हाण आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सन 2006 ते 2013 दरम्यान विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने भुसंपादन करण्यात आलेल्या जमीनीचा अत्यल्प मोबदला मागील सरकारने शेतकऱ्यांना दिला होता. तर 2013 नंतर भुसंपादन केलेल्या जमीनीचा चारपट मोबदला संबंधित प्रकल्पग्रस्तांना देण्यात आला. ही खूप मोठी तफावत, झालेला अन्याय दूर सारण्यासाठी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वात अनेक आंदोलने केली. आमदार प्रताप अडसड यांनी सुध्दा याविषयी सातत्याने पाठपुरावा केला. अन्याय झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सन 2014 मध्ये स्थापित नवीन सरकारने याबाबत कायदेशीर सल्ला मिळविला. यावर मार्ग काढण्यासाठी बैठकीत कसोशीने प्रयत्न करण्यात आले. कायद्याचे मार्ग बंद झाल्याने अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सानुग्रह अनुदानाचा महत्वपूर्ण निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. आज निधी वाटपाचा शुभारंभ माझ्या हस्ते होत आहे, ही अतिशय आनंदाची गोष्ट असून याबाबत मी समाधानी आहे, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

# 'नीट' च्या विद्यार्थ्यांची परिक्षा केंद्रावरच 'मॉक टेस्ट'

- आत्मविश्वास वाढवण्यासाठी नवी संकल्पना
- 'वे एज्युकेशन इंनेशेटीव्ह'चा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 16 )** वैद्यकीय शिक्षणासाठी अत्यंत स्पर्धात्मक समजली जाणारी नीट परीक्षा दरवर्षी लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य ठरवते. या परीक्षेची तयारी करताना अनेक विद्यार्थी उच्च दर्जाच्या शिकवण्या लावतात. भरपूर मेहनत घेतात. मात्र परीक्षेच्या दिवशी येणारा मानसिक तणाव आणि अपरिचित वातावरणामुळे अनेक वेळा त्यांचे प्रदर्शन अपेक्षेप्रमाणे होत नाही. हिच अडचण ओळखून 'वे एज्युकेशन इंनेशेटीव्ह'ने एक अभिनव उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या काळात नीट परिक्षा ज्या केंद्रांवर असेल, त्याच केंद्रांवर पूर्वतयारी म्हणून नीट विद्यार्थ्यांची 'मॉक टेस्ट' घेण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षा केंद्राचा अनुभव मिळणार असून, परीक्षेपूर्वीच त्या वातावरणाशी विद्यार्थ्यांचा परिचय होईल. त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि परीक्षेदरम्यान येणारा तणावही कमी होईल. शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. असे प्रयोग इतर स्पर्धा परीक्षांमध्येही राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. पालक आणि विद्यार्थी वर्गानेही या उपक्रमाचे स्वागत केले व हे एक सकारात्मक पाउल असल्याचे मत नोंदवले आहे.

शिक्षण क्षेत्रातील अनपेक्षित बदल घडविण्यासाठी 'वे एज्युकेशन इंनेशेटीव्ह' ही संस्था मागील चार वर्षांपासून कार्यरत असून कोचिंग क्लासमध्ये टॉपर असलेले विद्यार्थी नेमके परीक्षा देतांना का गोंधळून जातात, गुण कसे कमी होतात याबाबत त्यांनी निष्कर्ष काढल्यानंतर 'मॉक टेस्ट'चा उपक्रम त्यांनी राबवून बघितला. त्यात सहभागी विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे परीक्षा देऊन त्याचा निकाल सुद्धा अपेक्षेपेक्षा चांगला लागला. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकसुद्धा या 'मॉक टेस्ट'ला प्रभावित झाले आहेत. पाल्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी त 'वे एज्युकेशन इंनेशेटीव्ह'ला प्राधान्य देत आहेत.

### 24,25,28 ला मॉक टेस्ट

येत्या 4 मे रोजी नीटची परीक्षा असून हजारो विद्यार्थी या परीक्षेला बसणार आहेत. शहरातील विविध कोचिंग क्लासमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'वे एज्युकेशन इंनेशेटीव्ह'ने 24, 25, 28 एप्रिल रोजी शहरातील पी आर पोटे पाटील कॉलेज, माणिबाई गुजराथी महाविद्यालय, ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय या केंद्रांवर 'मॉक टेस्ट'चे आयोजन केले आहे. ज्या विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे, त्यांनी 8530446222 क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन वे एज्युकेशन इंनेशेटीव्हने केले आहे.



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आमदार राजेश वानखडे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**अमरावती -** तिवसा विधानसभा संघाचे आमदार राजेश वानखडे यांच्या अमरावती येथील कठोरा रोड भागातील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, आमदार डॉ. संजय कुटे, प्रविण तायडे, राजेश वानखडे, प्रविण पोटे, माजी खासदार नवनीत राणा व आदी मान्यवर उपस्थित होते.



# करतखेडा येथे जलद बसची मागणी

**अमरावती -** दर्यापूर-अकोला महामार्गावर करतखेडा येथे जलद बसथांब्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. दर्यापूर ते अकोला महामार्गावरून जाणाऱ्या बऱ्याच जलद बसेस उपलब्ध आहेत. करतखेडा येथे जलद बसला थांबा नसल्यामुळे प्रवासीअभावी रिकाम्या धावतात. यामुळे एसटी महामंडळाला तोटा सहन करावा लागत आहे. येथे शेकडो प्रवासी एसटीची वाट पाहत असतात. करतखेडा-रुस्तमपूर, गावासह चांदखेडा, भुईखेडा, सोनखेडा, चांडोळा इत्यादी गावांसह सहा खेडी टच असल्यामुळे येथून दररोज शेकडो प्रवासी प्रवास करण्याकरता निघतात. मात्र जलद बस थांबत नसल्यामुळे प्रवाशांचा हिरमोड होतो. साधी एसटीबस प्रवाशांनी फुल्ल भरलेली येत असते. त्यामुळे विद्यार्थी व सामान्य नागरिकांना दाटीवाटीने प्रवास करावा लागतो. ज्येष्ठ नागरिकांना एसटीत बसण्याकरिता अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. शेवटी प्रवाशांना प्रायवेट टॅक्सीचा आधार घ्यावा लागतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याकडे लक्ष देऊन करतखेडा येथे जलद एसटी बसला थांबा द्यावा, अशी मागणी येथील नागरिकांकडून होत आहे.

# खरीप हंगाम पुर्व नियोजन सभेकरीता बसलेल्या खुर्चीवरून पत्रकाराला उठविले

## चांदूर रेल्वे तालुका कृषि अधिकाऱ्यांचा संतापजनक प्रकार





**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि. 16 ) -** तालुका कृषि अधिकारी कार्यालय,चांदूर रेल्वे यांच्या वतीने स्थानिक तहसिल कार्यालयात सन 2025-26 करीता खरीप हंगाम पूर्व नियोजन सभा 15 एप्रिल रोजी आमदार प्रताप अडसड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. त्या सभेकरीता पत्रकार प्रा.रवींद्र मेंढे यांना आमंत्रित करण्यात आले.त्यामुळे ते दूपारी 3.30 वाजता तहसिल कार्यालयाच्या सभागृहात पोहचले. तिथे शेतकरी व कर्मचाऱ्यांकरीता बसण्यासाठी खुर्च्या लावण्यात आल्या होत्या. त्यावर नियोजन सभेकरीता आलेले कर्मचारी, शेतकरी बसले होते. पत्रकार प्रा.रवींद्र मेंढे समोरच्या ओळीतील रिकाम्या खुर्चीवर जावून बसल्यानंतर पंधरा मिनिटानंतर तालुका कृषि अधिकाऱ्यांने त्यांना तेथून उठून मागे बसायला सांगीतले. त्यामुळे नियोजन सभेला शेतकरी व पत्रकारांना आमंत्रित करून त्यांना सर्वांसमोर अपमानित करण्याचा हा संतापजणक प्रकार घडला आहे.

15 एप्रिल रोजी दुपारी 3 वाजता स्थानिक तहसिल कार्यालयात चांदूर रेल्वे येथे तालुका कृषि अधिकारी कार्यालयाच्या वतीने व आमदार प्रताप अडसड यांच्या अध्यक्षतेखाली सन 2025-26 करीता खरीप हंगाम पूर्व नियोजन सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला चांदूर रेल्वे तालुक्यातील शे तकरी बंधू-भगिणींना आमंत्रित करण्यात आले होते.तसेच पत्रकारांना फोनवरून निमंत्रीत केले होते. त्यानुसार चांदूर रेल्वे येथील पत्रकार प्रा.रवींद्र मेंढे हे दूपारी 3.30 वाजता कार्यक्रमस्थळी पोहचले आणि मंच च्या समोर आयोजनकांनी टाकलेल्या व इतर लोक बसले होते. त्यांच्यासोबत बसले.थोडया वेळाने तालुका कृषि अधिकारी संचित ढाकरे यांनी त्यांना तेथून उठायला लावून मागे बसायला सांगीतले. त्यावेळी पत्रकार मेंढे यांनी आपण शेतकरी व पत्रकारांना या सभेकरीता आमंत्रित केले आहे. त्यामुळे ते सभेला आले आहे असे असतांना तुम्ही त्यांना ते बसलेल्या जागेवरून उठवुन त्यांचा व बोलविलेल्या शेतकऱ्यांच्या अपमान करीत असल्याचे सांगत ते मागे जावून बसले.एकंदरीत सदर प्रकारातून शासकीय अधिकारी-कर्मचारी शेतकरी व पत्रकारांना चिल्लर समजत असल्याचे दिसून येत आहे.

### आमंत्रित करुन अपमान

या नियोजन सभेला मंडळ अधिकारी राजेंद्र बांबल यांनी सकाळी 11.30 फोन करून आमंत्रित केले होते. त्यामुळे पत्रकार म्हणून मी सभेच्या ठिकाणी दुपारी 3.15 वाजता पोहचलो. सभा सुरू व्हायची होती.अधिकारी-कर्मचारी व शेतकरी तहसिल सभागृहात बसण्यासाठी टाकलेल्या खुर्च्यांवर बसले होते. मी सभा मंच समोरच्या ओळीतील एका रिकाम्या खुर्ची जावुन बसलो. 15 मिनिटानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी मला तेथून उठा व मागे जावून बसा असे सांगीतले. या नियोजन सभेला शेतकरी व पत्रकारांना आमंत्रित केले आहे. सर्व बसले असतांना मला बसलेल्या जागेवरून उठवणे म्हणजे निमंत्रित पत्रकार व शेत ?ऱ्यांना बोलावुन त्यांचा जाहिर अपमान करण्याचा हा संतापजणक प्रकार आहे. या घटनेचा मी जाहिर निषेध करून सदर प्रकार चिड आणणारा व संतापजनक असून सदर प्रकार इतर कोणासोबत घडू नये हीच माफक अपेक्षा असल्याचे पत्रकार प्रा.रवींद्र मेंढे यांनी सांगीतले.

### प्रकाराबद्दल माफी मागितली

सदर प्रकार चुकीने झाला आहे.झालेल्या प्रकाराबद्दल दिलगीरी व्यक्त करतो आणि पत्रकारबंधूची माफी मागतो असे चांदूर रेल्वे तालुका कृषि अधिकारी संचित ढाकरे यांनी सांगीतले.

### पत्रकार संघटने कडून निषेध

सदर प्रकार कोणत्याही शेतकरी व पत्रकारांसोबत घडू नये.सर्वांना मानसन्मान आहे. त्यामुळे सदर घटना चिड आणणारी व संतापजनक आहे. झालेल्या प्रकाराचा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ,चांदूर रेल्वे,स्वाभिमानी पत्रकार संघ चांदूर रेल्वे व मराठी पत्रकार संघ,चांदूर रेल्वे चे सर्व पत्रकार बंधूंनी जाहिर निषेध केला.

# उष्माघात टाळण्यासाठी काळजी घेण्याचे आवाहन

## उपजिल्हा रुग्णालयाने सुचविले उपाय



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.16 ) -** उन्हाळ्याच्या दिवसात उष्माघाताने मृत्यू होण्याच्या घटना घडत असतात. यावर उपाययोजना म्हणून उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांनी नागरिकांना एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. उष्माघात टाळण्यासाठी त्यांनी उपाय सुचविले आहे.

सगळेच जण उन्हात फिरतात पण काही जणांचाच उन्हात गेल्यामुळे अचानक मृत्यू का होतो. याच कारण आपल्या शरीराच तापमान नेहमी 37 अंश सेल्सियस असतं या तापमानातच शरीरातले सर्व अवयव नीट काम करू शकतात. घामाच्या रुपाने पाणी बाहेर काढून शरीर 37 अंश सेल्सियस तापमान कायम राखतं, सतत घाम निघत असतांना पाणी पीत राहाणं अत्यंत गरजेचं आणि अत्यावश्यक आहे. पाणी शरीरात इतरही अधिक महत्त्वाची काम करतं, त्यामुळे शरीरातला पाण्याचा साठा कमी झाला, तर शरीर घामाच्या रूपाने पाणी बाहेर टाकणं टाळतं.

जेव्हा बाहेरचं तापमान 45 अंशाच्या पुढे जातं आणि शरीरातली कुलिंग व्यवस्था पाण्याच्या अभावाने ठप्प होते, तेव्हा शरीराचं तापमान 37`च्या पुढे जाऊ लागतं. शरीराचं तापमान जेव्हा 42 डिग्री सेल्सियसपर्यंत पोहोचतं, तेव्हा रक्त तापू लागतं आणि रक्तातलं प्रोटिन अक्षरश: झीजू लागतं (उकळत्या पाण्यात अंड उकडतं तसं!) स्नायू कडक होऊ लागतात, त्यात श्वास घेण्यासाठी लागणारे स्नायू ही निकामी होतात. रक्तातलं पाणी कमी झाल्यामुळे रक्त घट्ट होतं, ब्लडप्रेशर अत्यंत कमी होतं, महत्त्वाच्या अवयवांना (विशेषत: मेंदूला) रक्त पुरवठा थांबतो. माणूस कोमात जातो आणि त्याचे एक-एक अवयव अवघ्या काही क्षणांत बंद पडून मृत्यू ओढवतो. यालाच उष्माघात म्हणतात, असे त्यांनी सांगितले आहे.

उन्हाळ्यात असे अनर्थ टाळण्यासाठी सतत थोडे थोडे पाणी पित रहावे, व आपल्या शरीराचे तापमान 37 अंशच कसे राहिल याकडे लक्ष द्यावे, असे त्यांनी म्हटले आहे. आता मे महिन्याला सुरुवात होत असून दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढत आहे. त्यामुळे उष्माघात टाळण्यासाठी शेतातील कामे सकाळी 6 ते 11 व दुपारी 4 ते 6.30 या कालावधीत करा, काम करत असतांना मध्येमध्ये थोडावेळ थांबुन पाणी प्या, शक्यतो सुती (काँटन) व पांढर्या रंगाचे कपडे वापरा, डोक्यावर रुमाल टोपी इत्यादीचा वापर करा, आहारात ताक दही इत्यादीचा वापर करा, तिखट, तेलकट, मसालेदार पदार्थ, मद्यपान व मांसाहार टाळा, कोल्ड्रींक ऐवजी लिंबु सरबत, नारळपाणी याचा वापर करा, विशेषत- लहान मुलांना, गरोदर मातांना, आजारी व्यक्तींना दुपारच्या वेळी बाहेर पडु देऊ नका, अशक्तपणा, थकवा, ताप-उलट्या इ. लक्षणे आढळल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या अशा उपाययोजना वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांनी सुचविल्या आहेत.

# गावरान आमराया नामशेष

**वाड-वडिलांनी लावलेली 'आमराई' आज दिसेनाशी | दगडाने आंबा पाडून खाण्याची मजा काही औरच, त्याचा अनुभव कसा येईना**





**नितीन दुर्बुडे**
**पथ्रोट, ( दि. 16 ) -** गावरान आंब्याची एक खास चव होती त्या रसाची चव हल्लीच्या संकरीत आंब्याना मुळीच नाही. आता बाजारात अनेक संकरीत आंबे येतात. हापूससह ईतर संकरीत आंबे गावरान नावाखाली फसवणूक होते. आजी-आजोबांनी लागवड केलेले व नैसर्गिक उगवलेली शेतातील गावरान आंबे मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहेत. आमराया नष्ट झाल्याने गावरान आमरस काही होत नाही.

गावरान आंब्याच्या झाडांची कित्येक वर्षापासून मोठ्या प्रमाणात कत्तल होत आहे. परिणामी गावरान आंबा नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. पूर्वी ग्रामीण भागात मुबलक मिळणारा गावरान (गावठी) आंबा मिळेनासा झाला आहे. वाड-वडिलांनी लावलेली 'आमराई' आज दिसेनाशी झाली आहे. त्यामुळे आजच्या पिढीला दगडाने आंबा पाडून खाण्याची मजा काय असते, याचा अनुभव मिळेनासा झाला आहे. प्रत्येक गावामध्ये पूर्वी आमराई असायची. काही गावांत अनेक आमराया असायच्या. या देशी आंब्यांची लागवड करून आपल्या वाड-वडिलांनी काळजी घेतली. ही झाडे वाढवली; परंतु काळाच्या ओघात हे आंबे कमी झाले. अनेकांनी या झाडांची कुऱ्हाडीने कत्तल केली. सार्वजनिक ठिकाणी असलेल्या आंब्याची झाडे तोडता येत नाही म्हणून कृत्रिमरित्या केमिकलचा वापर करून वाळवून ती तोडून टाकली. त्यामुळे या आमराया दिसेनाशा झाल्या आहेत. जशा या आमराया नष्ट झाल्या, तशा आठवणीही विरळ होत चालल्या असून नैसर्गिक वैविध्यही गायब होत असल्याचे दिसत आहे. या अमराया म्हणजे निसर्ग समृदद्धतेचा उत्कृष्ट नमुना होत्या. या आमरायांतून कोकिळेचा आवाज सर्वांनाच आकर्षित करीत असे; तो आवाज आज हरवला आहे. या आमरायांच्या परिसरात कायम माकडांचा मुक्काम असे. ही हक्काची घरे नष्ट झाल्याने माकडेही दुसरा निवारा शोधत इतरत्र निघून गेली आहेत. आमराई म्हणजे लहान मुलांचे खेळण्याचे हक्काचे ठिकाण. ही लहान मुलं आख्खा उन्हाळा या आमराईत घालवत असायची. येथे वेगवेगळे खेळ असायचे. हे खेळ आता होताना दिसत नाही. नातवंडांना आंबा खाण्यासाठी मिळावा म्हणून आजोबा आपल्या शेतात चांगल्या जातीचे गावरान आंब्याची लागवड करुन त्यांची जोपासना करीत असत; परंतु हा उपक्रम बंद पडला. परिणामी आमराई नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. गावरान आंब्याची जागा विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या परराज्यातील आंब्यांनी घेतली आहे. त्यामुळे गावरान आंब्याची लागवड करण्यासाठी शासनाने योजना राबवण्याची गरज आहे.

# कॅलिडोस्कोप

## रेल्वेचा मालक शेतकरी?

टाटा, बिर्ला, अंबानी, अदानी यांच्या मालकीची विमाने, जहाजे आणि मेट्रो असली तरी रेल्वे मात्र त्यांच्या मालकीची होऊ शकली नाही. मात्र ही किमया काही काळासाठी का होईना, एका शेतकऱ्याने करून दाखवली आहे. रेल्वेच्या चुकीमुळे चक्क शेतकरी संपूर्ण ट्रेनचा मालक झाला.

तसेही भारतात अनेकदा विचित्र घटना पाहायला मिळतात. कधी कुणाचा फोटो दुसऱ्याच्या नावाने पेस्ट केला जातो तर कधी नावातच घोळ होतो. पण रेल्वेच्या चुकीमुळे एका शेतकऱ्याला चक्क स्वतः ची ट्रेन मिळाली. रेल्वे ही तुमची संपत्ती असल्याची अशी घोषणा अनेकदा केली जात असली तरी प्रत्यक्षात तुम्ही तिचे मालक होत नाहीत कारण रेल्वे भारत सरकारच्या मालकीची आहे. मात्र संपूर्णनाम सिंग या शेतकऱ्याने काही काळ हा होईना, रेल्वेची मालकी मिळवली होती. पंजाबमधील लुधियाना येथील कटाना गावातील तो एक साधा शेतकरी होता. तोच दिल्लीहून अमृतसरला जाणाऱ्या स्वर्ण शताब्दी एक्सप्रेस ट्रेनचा मालक बनला होता.

कसे घडले?

२००७ मध्ये लुधियाना-चंदीगड मार्ग टाकण्यासाठी रेल्वेने शेतकऱ्यांकडून जमीन खरेदी केली होती. तेव्हा रेल्वेने संपूर्णनाम सिंह यांची जमीन २५ लाख रुपये प्रति एकर या दराने संपादित केली. पण काही दिवसांनी रेल्वेने जवळच्या गावात एवढ्या मोठ्या जमिनीसाठी ७१ लाख रुपये प्रति एकर दिल्याचे संपूर्ण सिंह यांना कळले. मग या दुटप्पीपणाविरोधात ते कोर्टात पोहोचले. सुनावणीत न्यायालयाने नुकसानभरपाईची रक्कम २५ लाखांवरून ५० लाख रुपये करण्याचे आदेश दिले; मात्र नंतर ती वाढवून १.४७ कोटी इतकी करण्यात आली. न्यायालयाने रेल्वेला २०१५ पर्यंत संपूर्णनाम सिंगला संपूर्ण पैसे देण्याचे आदेश दिले. परंतु रेल्वेने त्यांना केवळ ४२ लाख रुपयेच दिले. उरलेली रक्कम देण्यात रेल्वे अपयशी ठरली होती. त्यानंतर जिल्हा आणि सत्र न्यायाधीश जसपाल वर्मा यांनी लुधियाना रेल्वे स्थानकावरच ट्रेन थांबवून तिचा ताबा सिंग यांना देण्याचा आदेश दिला. न्यायालयाच्या आदेशानंतर सिंग स्टेशनवर पोहोचले आणि अमृतसर स्वर्ण शताब्दी एक्स्प्रेस ताब्यात घेऊन तिचे मालक झाले. मात्र नंतर रेल्वे अभियंत्याने न्यायालयाच्या आदेशाने ट्रेन सोडवली आणि पुन्हा तिचा ताबा मिळवला.



## समोसा, जिलेबी, दाळभात आणि बिर्याणीही नाही आपली...

समोसा ते जिलेबी हे पदार्थ मुळात भारतीय नाहीत. ते अन्य देशांमधून इथे आले आणि इथलेच होऊन गेले. शाकाहारींचा एकमेव आधार असणारे पनीरदेखील आपले नाही. गुलाबजामपासून जिलेबीपर्यंतचे सगळे पदार्थ आपण आवडीने स्वीकारले आहेत. मात्र खरेतर हे परकीयांचे देणे आहे. गुलाबजाम हा गोड पदार्थ पर्शिया आणि भूमध्य समुद्रातून भारतात आला. तुर्की शासकांद्वारे तो येथे आणल्याचे म्हटले जाते. आणखी एक आख्यायिका अशी आहे की तो भारतात मोगलांमुळे आला. परंतु त्यावर पर्शियन प्रभाव होता. 'गुलाब' हा मूळचा पर्शियन शब्द आहे. लुकमत अल कादी नावाची एक पर्शियन मिठाई आहे, जी अगदी गुलाबजाम सारखीच असते.





### चहासुद्धा परदेशी

चहादेखील भारताचा नाही. चहाची उत्पत्ती चीनमध्ये झाली आहे. भारतात ब्रिटिशांनी चहा आणला आणि आसाम, दार्जिलिंग तसेच इतरत्र त्याची व्यावसायिक लागवड सुरू केली. भारतात, विशेषतः ईशान्येकडील भागात जंगली चहा प्यायला जात असे. कदाचित यालाच वैदिक काळात सोम म्हटले जात असावे.

**जिलेबीचे मूळ मध्य पूर्वेत** आहे. ती भारतात बरीच उशिरा आली. विशेष म्हणजे हे नावही पर्शियन-अरबी शब्द 'झलाबिया'वरून आले आहे. तेथे हे सर्वसामान्यांच्या आवडते खाद्य आहे. उत्तर आफ्रिका, युरोपचे काही भाग, मध्य पूर्व आणि आशियात या पदार्थाला वेगवेगळी नावे आहेत. उदा. जिलबीला फनेल केक, चेबाकिया, झलेबिया, झुल्बिया, ग्वारामरी, पिटुलित्सी, झोलबिया, पिट्ठले, जिलापी अशी अनेक नावे आहेत.

### इडलीचे मूळ इंडोनेशियात

इडलीच्या शोधाचे दोन सिद्धांत प्रचलित आहेत. काही इतिहासकारांच्या मते, कन्नड ग्रंथांमध्ये इडलीचे संदर्भ मिळतात. शिवकोटियाचार्य यांचे इसवी. ९२० मधील 'वड्डारधने' किंवा चावुंदराय दुसरा यांचे १०२५ इसवी सनातील 'लोकोपकार' मध्ये याचे संदर्भ आहेत. काहींच्या मते, इडली ८०० ते १२०० च्या दरम्यान भारतात प्रवास करणाऱ्या हिंदू इंडोनेशियन राजांसाठी बनवली जायची. इथे लक्षात घ्यायला हवे की, दक्षिण भारत आणि मलेशिया, इंडोनेशिया, श्रीलंका या देशांमध्ये नैसर्गिकरित्या अनेक खाद्यपदार्थांमध्ये म्हणून समानता आहे.

### कॉफी येमेनची

चहाप्रमाणेच कॉफीदेखील भारतीय वंशाची नाही. असे म्हटले जाते, की बाबा बुदान या सुफी संताने मक्केची तीर्थयात्रा केल्यानंतर येमेनहून येताना भारतात कॉफी बीन्स आणले होते. अखेर कर्नाटकातील चिक्कमंगलुरू येथे ते स्थायिक झाले आणि तिथे कॉफीची लागवड सुरू केली. अशा प्रकारे कॉफीदेखील आपली झाली.

### दाळभातही नाही हो आपला!

दाळ-भात आपल्यातील अनेकांचा आवडता पदार्थ आहे. प्रत्यक्षात याचा जन्म आपल्याकडे नव्हे तर शेजारच्या नेपाळमध्ये झाला. तेथेही त्याला 'दाल भात'च म्हणतात. दालभाताच्या एका प्लेटमध्ये सामान्यतः त्याच्यासह भाजीपाल्याचे काही पदार्थ आणि लोणचे असते. 'दाल भात पॉवर २४ तास' ही एक लोकप्रिय नेपाळी म्हण या संतुलित जेवणावरुनच तयार झाली आहे. गिर्यारोहणा दरम्यान शक्ती टिकून ठेवण्यास दाल भात मदत करतो.





बिर्याणी हा झोमॅटोवर सर्वाधिक ऑर्डर होणारा भारतातील पदार्थ आहे. मात्र पिझ्झा, पास्ता आणि नूडल्सला मागे टाकत 'बिर्याणी' हा ऑनलाईन ऑर्डर होणारा पदार्थदेखील प्रत्यक्षात पर्शियातून आला आहे. पर्शियन भाषेत बिर्याणी म्हणजे 'भात' असा अर्थ आहे.

### पनीरही मूळचे पर्शियन

पनीरला भारतीय शाकाहारींचा निर्विवाद राजा म्हटलं जातं. मात्र ते देखील इराण किंवा अफगाणिस्तानातून भारतात आले आहे. दक्षिण भारतात त्याची लोकप्रियता कमी असल्यावरूनही हे स्पष्ट होते. भगवान कृष्ण आणि लोणी, ताक यांच्याबद्दलच्या अनेक कथा आहेत. पण पनीरची एकही कहाणी नाही. मुळात पनीर हा शब्द पर्शियन शब्द 'पेनीर' पासून तयार झाला आहे. पेनीर नावाचे चीज संपूर्ण पश्चिम आशियामध्ये खाल्ले जाते.

### समोसाही पर्शियाचाच

भारतीयांचा आवडता समोसादेखील मूळचा पर्शियाचा आहे. पर्शिया म्हणजे आताचा इराण. समोसा हे नाव पर्शियन शब्द 'साम्बुसक' पासून आले आहे. तेथे समोशात मांस, काजू आणि मसाले भरलेले असायचे. भारतात मात्र त्यात बटाट्याची भाजी भरली गेली आणि हा पदार्थ लोकप्रिय झाला.

### राजम्याचे मूळ मेक्सिकन

राजमा-राईस ही उत्तर भारतीय घरांमधील आवडती डीश असली तरी राजमा किंवा लोबिया वा लाल राजमा याची मुळात भारतात कधीच लागवड होत नव्हती. याचे कारण राजमा मेक्सिकन वंशाचा आहे. प्रथम तो पेरूमध्ये पिकवला गेला. पुढे उत्तर अमेरिका आणि दक्षिण अमेरिकेत मोठ्या प्रमाणात प्रवास करणाऱ्या पोर्तुगीजांनी तो भारतात आणला असे मानले जाते.

## विमानावरील हिरव्या-लाल दिव्यांविषयी...


रात्रीच्या वेळी आकाशातून विमान उडताना सर्वांनीच पाहिले आहे. यावेळी त्यावरील काही रंगांचे दिवे लुकलुकत असल्याचेही दिसते. यामध्ये हिरवे आणि लाल दिवे आपल्याला दुरूनच दिसतात. मात्र विमानाच्या दोन्ही बाजूंना लाल आणि हिरव्या रंगांचे दिवे स्वतंत्रपणे का लावले जातात, याचा तुम्ही कधी विचार केला आहे का?

हिरव्या आणि लाल रंगाचे दिवे विमानाच्या दोन्ही पंखांवर लावण्यात येतात. म्हणजेच एका बाजूला हिरवा आणि दुसरीकडे लाल दिवा असतो. हे दोन्ही दिवे नेव्हिगेशनमध्ये मदत करतात. ते आकाशातील इतर वैमानिकांना तसेच जमिनीवरील हवाई वाहतूक नियंत्रकाला विमानाची दिशा सांगण्याचे काम करतात. त्यामुळे विमानाची स्थिती अचूकपणे कळू शकते. लाल दिवा नेहमी विमानाच्या डाव्या पंखाच्या टोकाला असतो. म्हणजेच तो विमानाच्या डाव्या बाजूबद्दल सांगतो तर हिरवा दिवा उजव्या पंखाच्या टोकाला असतो. स्वाभाविकच तो विमानाच्या उजव्या बाजूस सूचित करतो.

अर्थात कोणत्याही विमानात फक्त हिरवे आणि लाल दिवेच नसतात तर यात टॅक्सी लाइट, टेक ऑफ लाईट, रनवे लाईट, अँटी कोलिजन बीकन, लँडिंग लाईट, लोगो लाईट असे अनेक दिवे असतात. ते वेगवेगळ्या वेळी प्रकाशित होतात. त्यांचे अर्थही वेगवेगळे आहेत.




## 'एआय' मुळे रुग्णाचा पुनर्जन्म



ही गंभीर आजार असणाऱ्या एका व्यक्तीची कहाणी आहे. पण 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या मदतीने उपचार केल्याने त्याचा जीव वाचला. वर्षभरापूर्वी अमेरिकेतील जोसेफ कोट्स यांची अवस्था इतकी वाईट झाली होती, की डॉक्टरांनी त्यांना एकच प्रश्न विचारला. तो होता, तुम्हाला घरी मरायला आवडेल की रुग्णालयात? परंतु एका 'एआय' मॉडिलने थेरपी आणि औषधांचे सूत्र तयार केले आणि त्यामुळे कोट्स यांना नवीन जीवन मिळाले.

३७ वर्षीय कोट्स वॉशिंग्टनमधील रेंटनमध्ये राहतात. अनेक महिन्यांपासून ते 'एचआयव्ही सिंड्रोम' नावाच्या रक्ताच्या विकाराशी झुंज देत होते. या आजारामुळे त्यांचे मूत्रपिंड जवळजवळ बंद झाले. दर काही दिवसांनी पोटातून लिटरभर पाणी निघत असे. त्यामुळे प्रकृती इतकी खालावली होती की, स्टेम सेल प्रत्यारोपणासारखे उपचारही अशक्य होते.

हार नाही मानली

कोट्स म्हणतात, इतका त्रास असला तरी मी हार मानली होती. मला वाटले की, मृत्यू जवळ आला आहे. परंतु मैत्रीण तारा थिओबाल्डने फिलाडेल्फियाचे डॉक्टर डेव्हिड फेगेनबॉम यांना एक ई-मेल पाठवला. त्यानुसार ताराची भेट डॉ. फेजेनबॉम यांच्याशी झाली. दुसऱ्याच दिवशी डॉ. फेगेनबॉम यांनी कोट्स यांना केमोथेरपी, इम्यूनोथेरपी आणि स्टिरॉइड्सचे अनोखे संयोजन वापरण्याचा सल्ला दिला. हे सूत्र यापूर्वी कधीही एचआयव्ही सिंड्रोमच्या उपचारांसाठी वापरले गेले नव्हते. मात्र त्याच्या वापराने अवघ्या एका आठवड्यात त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होऊ लागली. चार महिन्यांनंतर ते स्टेम सेल प्रत्यारोपणासाठी तयार झाले आणि आता ते पूर्णपणे बरे होत आहेत. हा चमत्कारिक उपचार डॉक्टरांचा नव्हता तर 'एआय' मॉडेलने शोधून काढलेले ते संयोजन होते.

फॉर्म्युला कसा तयार झाला?

डॉ. फेजेनबॉम स्वत: कॅसलमॅन नामक रोगाने (रोगप्रतिकारक शक्तीशी संबंधित एक दुर्मिळ विकार) ग्रस्त होते. मात्र 'सिरोलिमस' नावाच्या जुन्या औषधाने त्यांनी आपले प्राण वाचवले. या अनुभवानंतरच त्यांनी 'एव्हरी क्योर' नावाचा प्रकल्प सुरू केला. त्यात 'एआय' च्या मदतीने ४,००० औषधे आणि १८,५०० रोगांमधील संबंध शोधले गेले. वैद्यकशास्त्राला ड्रग रिप्युरिंग नवीन नाही, परंतु 'एआय' ने ते अधिक वेगवान आणि अधिक प्रभावी उपचार केले जातात असे या तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळेच याच तंत्राने त्यांनी जोसेफ कोट्स यांच्यासाठी औषध तयार केले.

नवी उमेद

'एआय'च्या या यशामुळे एका रुग्णाचे प्राण वाचलेच खेरीज तंत्रज्ञान आणि विज्ञान यांनी मिळून अशक्य मानल्या जाणाऱ्या आजारांवरही उपचार शोधू शकतात हे सिद्ध झाले. हा आशेचा किरण असून नजिकच्या भविष्यात तो वैद्यकीय क्षेत्रात मोठे आणि महत्त्वपूर्ण बदल घडवून आणू शकतो.

## लग्नाच्या गाठी ट्रेनमध्ये जुळतात?

चीनमध्ये बऱ्याच लोकांची लग्नं होत नाहीत. त्यामुळेच एकटे जीव ही चीनमधली मोठी समस्या बनली आहे. अशा या एकट्या जीवांना दुकटं करण्यासाठी चीनमध्ये बऱ्याच कल्पना लढवल्या जातात. अशीच एक कल्पना अलिकडे चर्चेचा विषय ठरत आहे. तरुणांचं लग्न ठरावं यासाठी एका विशेष रेल्वेची सुरूवात करण्यात आली आहे. 'लव्ह स्पेशल' या नावाने ही रेल्वेगाडी चालवली जाते. ही रेल्वेसेवा सुरू होऊन काही अवधी लोटला असून यातून आजवर एक हजारपेक्षा जास्त लग्नाळू मुलामुलींनी प्रवास केला आहे. चीनमध्ये जवळपास २० कोटी लोक एकटे आहेत. अशा एकट्या लोकांची भेट घडवून आणण्यासाठी आणि त्यातून काही जोड्या जुळतील या अपेक्षेने ही रेल्वेसेवा सुरू करण्यात आली होती. चीनमधल्या चोंगकिंग नॉर्थ ते कियांगजियांग दरम्यान ही ट्रेन चालते. ती आठवड्यातून फक्त एकदाच चालवली जाते. पण ती खूप लोकप्रिय ठरली आहे. त्यामुळे आठवड्यातून दोन वेळा चालवण्याची मागणी होते आहे. या प्रवासादरम्यान जोडीदार मिळाला नाही तरी मित्रमैत्रिणी मिळत असल्याचं समाधान चीनी युवक-युवती व्यक्त करताना दिसतात.






## कुवारोंका गाँव

एखाद्या तरुणाचे लग्न न ठरण्यामागे अनेक कारणे असू शकतात. परंतु एखाद्या गावात कोणी आपली मुलगी नांदायला पाठवत नसेल तर याला काय म्हणायचे? लग्नाचे छत्तीस गुण जुळले तरी या गावात आपली मुलगी द्यायला कुठलाही बाप तयार होत नाही. त्यामुळे या गावाचे नावच 'कुंवारों का गाव' असे पडले आहे.

केरळातील जोंदालगट्टी गावात मुलगा लग्नाला आला की आई-बापाला ताण येतो कारण या गावात कुणाचे लग्नच जमत नाही. मुली या गावाशी नाते जोडण्यासाठी तयार होत नाहीत. थेट नकार देऊन टाकतात. अर्थातच या मागे गावाची आर्थिक स्थिती आणि दुर्दशा हे कारण आहे.

दुर्लक्षित खेड्याचा तरुणांना ताप

केरळला प्रगत राज्य मानले जात असले तरी आरोग्य सेवा, रस्ते आणि दळणवळणाच्या सुविधा तसेच आवश्यक यंत्रणा नसल्याने हे गाव दुलर्क्षित खेडे बनले आहे. त्यामुळे वधू येथील वर पसंद करायला तयारच होत नाहीत. सुमारे २०० लोकसंख्येच्या या गावात २० पेक्षा अधिक तरुण लग्न ठरण्याची अपेक्षा बाळगून आहेत. परंतु त्यांना कोणी मुलगी द्यायला तयार नाही. बरीच वर्षे तरुणांचे लग्न न झाल्याने गावातील तरुणांचे वैवाहिक जीवन सुरूच झालेले नाही. यामुळे येथील शाळेवरही परिणाम झाला आहे. येथील शाळेत मुलांची संख्या रोडावली आहे. या वर्षी कोणताही नवीन प्रवेश झालेला नाही. शाळेत केवळ पाच विद्यार्थी आहेत. अंगणवाडी रिकामी आहे. या गावात केवळ ४१ कुटुंबे राहतात.

## हिरवा रंग कशासाठी?

शस्त्रक्रिया करताना डॉक्टर निळ्या किंवा हिरव्या रंगाचे कपडे घालतात. तसंच त्यांच्या तोंडावर बांधायचा मास्कही हिरव्या रंगाचा असतो. असं का बरं होत असावं? जगभर डॉक्टरांनी एकाच रंगाचे कपडे घालण्यामागचं कारण काय असावं?

सुरूवातीच्या काळात डॉक्टरांपासून रुग्णालयातले सर्व कर्मचारी सरसकट पांढऱ्या रंगाचा पेहराव करायचे. पण १९१४ मध्ये एका मोठ्या डॉक्टरने एक ड्रेसकोड तयार केला. त्या अंतर्गत डॉक्टर हिरवे कपडे घालू लागले. मग हीच प्रथा पडली. काही डॉक्टर निळ्या रंगाचेही कपडे घालतात. रुग्णालयांमध्ये पडदेही हिरव्या किंवा निळ्या रंगाचे असतात. शस्त्रक्रियेदरम्यान हिरव्या रंगाचे कपडे घातल्याने डोळ्यांना थंडावा मिळत असल्यामुळे डॉक्टरांनी या रंगाचे कपडे घालायला सुरूवात केल्याचं एका जर्नलचं म्हणणं आहे. हिरवा रंग थंडावा देतो. इतर रंग असा थंडावा देत नाहीत. शस्त्रक्रिया करताना डॉक्टरांना मन एकाग्र करावं लागतं. त्यांचे डोळेही थकून जातात. त्यामुळे हिरव्या रंगाकडे पाहिल्यानंतर त्यांना आराम मिळतो. डोळ्यांना लाल किंवा पिवळ्या रंगाचा त्रास होतो. पण हिरव्या किंवा निळ्या रंगाचा तितकासा त्रास होत नाही. त्यामुळे रुग्णांच्या दृष्टीने डॉक्टर हिरव्या रंगाचे कपडे घालण्याला प्राधान्य देतात.



## फ्रान्समधले आगळे वेगळे

फ्रान्स हा युरोपमधल्या प्रमुख देशांपैकी एक. प्रत्येक देशाचे काही कायदे असतात. इथल्या काही प्रथा आपल्याला विचित्र वाटू शकतात. फ्रान्समधल्या अशाच काही अजब गजब गोष्टींविषयी आज जाणून घेऊ या. फ्रान्समधले लोक अन्नाला खूप महत्त्व देतात. या देशात अन्नाची नासाडी बेकायदेशीर ठरते. 'एप्रिलफूल' या संकल्पनेची सुरूवात फ्रान्समध्ये झाल्याचं म्हटलं जातं. इथल्या महिलांचं आयुष्यमान जगभरातल्या महिलांच्या तुलनेत अधिक असतं. फ्रान्समध्ये स्थूल लोकांची संख्या बरीच जास्त आहे. संपूर्ण युरोपमधल्या देशांच्या तुलनेत फ्रान्समध्ये सर्वाधिक स्थूल लोक आहेत. फ्रान्समध्ये गेल्या ५०० वर्षांपासून लग्नप्रसंगी नववधूने पांढरा पोशाख घालण्याची परंपरा आहे. जगाच्या सर्वाधिक भागावर राज्य करणारा इंग्लंड हा पहिला तर फ्रान्स हा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. एके काळी जगाच्या ८.६ टक्के भागावर फ्रान्सचं राज्य होतं. या देशात चक्क मृत व्यक्तीसोबत लग्न करता येतं. अर्थात यासाठी राष्ट्रपतींची परवानगी घ्यावी लागते. अपवादात्मक परिस्थितीत राष्ट्रपती मृत व्यक्तीसोबत लग्नाची परवानगी देतात.



## शिक्षक भरती घोटाळ्यात मोठी घडामोड

# पाचही आरोपींची कारागृहात रवानगी

### तीन शिक्षणाधिकारीही रडारवर


शिक्षण उपसंचालक नरड

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :**
उपराजधानी नागपुरातील ५८० शिक्षक भरती घोटाळ्यामुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. नागपूर जिल्ह्यात खासगी प्राथमिक शाळांमध्ये एक दोन नव्हे तर तब्बल ५८० शिक्षकांची बोगस पद्धतीने नियुक्त करण्यात आल्याचा प्रकार उजेडात आला आहे.

सोबतच या बोगस नियुक्ती आणि वेतनापोटी सरकारी तिजोरीला कोट्यवधींचा चुना लावण्यात आल्याचे समोर आले असून हे खुद्द शिक्षण विभागाने हे त्यांच्या एका आदेशात मान्य केले आहे. प्राथमिक वेतन पथकाचे अधीक्षक नीलेश वाघमारे यांना बनावट शालार्थ आयडी प्रकरणात निलंबित करण्यात आल्यानंतर शुक्रवारी रात्री नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक उल्हास नरड आणि मुख्याध्यापक पुडके यांना सदर पोलिसांनी अटक केली.

यानंतर निलेश मेश्राम, अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग, संजय दुधाळकर, शिक्षण उपनिरीक्षक शिक्षण उपसंचालक कार्यालय, सुरज नाईक, वरिष्ठ लिपीक शिक्षण उपसंचालक कार्यालय असे तीन आरोपींची नावे आहे. या पाचही आरोपींना पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर बुधवारी न्यायालयाने आता पाच आरोपींची कारागृहात रवानगी केली आले. विशेष म्हणजे या घोटाळ्यात पुन्हा तीन शिक्षणाधिकाऱ्यांना अटक होण्याची शक्यता आहे.

बनावट कागदपत्रांच्या आधारे विभागीय उपसंचालक उल्हास नरड, मुख्याध्यापक पुडके यांच्यासह अन्य तीन कर्मचारी अटकेत असून आता पूर्व विदर्भाच्या अनेक विभागातील शिक्षण भरतीचे घोटाळे समोर येत आहेत.

नागपूरसह भंडारा, गोंदिया, चंद्रपूर अशा जिल्ह्यांमध्येही बनावट कादपत्रांच्या आधारे शिक्षक, मुख्याध्यापक आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या झाल्याची माहिती आहे.

भंडारा जिल्ह्यातील वरठी येथे दोन शिक्षकांची बनावट कागदपत्रांच्या आधारे नियुक्ती झाल्याने माजी उपसंचालक वैशाली जामदार यांच्या विरोधात तक्रार करण्यात आली.

अटकेत असलेल्या सर्व आरोपींच्या पोलीस कोठडीत एक दिवसाची वाढ करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील लोकमान्य विद्यालयातील ११ कर्मचाऱ्यांच्या नियमबाह्य नियुक्तीचा आरोप शिक्षक संघटनांनी केला आहे. शाळा व्यवस्थापनाने संस्थेच्या दोन शाळांमध्ये पाच शिपाई व सहा लिपिक वर्गाच्या पदांची भरती केली.

या भरतीला चंद्रपूरच्या तत्कालीन शिक्षणाधिकारी पूनम मस्के यांनी मान्यता दिली होती. त्यानंतर आलेल्या शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांनी २०२२ मध्ये या भरतीमध्ये घोळ असल्याचा ठपका ठेवत कर्मचाऱ्यांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतला व प्रकरण पुढच्या निर्णयासाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे पाठवले.

तत्कालीन शिक्षण उपसंचालक वैशाली जामदार यांच्या काळात कर्मचाऱ्यांचा शालार्थ मंजूर करण्यात आला होता, असाही आरोप आहे. याशिवाय, गोंदिया जिल्ह्यात अनेक खासगी शिक्षण संस्थांमधील १६ शिक्षकांची मान्यता रद्द झाल्यानंतरही सहा महिन्यांपासून त्यांचे वेतन सुरूच असल्याची माहिती आहे. या संपूर्ण घोटाळ्यात संबंधित जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी, वेतन पथक अधिकारीही गुंतले असल्याचा आरोप होत आहे . परिणामी, काही शिक्षणाधिकारी स्वतःच्या बचावासाठी राजकीय आश्रयाला गेले आहेत.

## डाळ साठवणुकीचे स्टोरेज अंगावर पडून

# तीन जण जागीच ठार



### लोहारा एमआयडीसीतील घटना : दोन मजूर जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १६ :**
डाळ साठवणुकीचे स्टोरेज अंगावर पडल्याने सुपरवायझर यांच्यासह मजूर बापलेकांचा दबून मृत्यू झाल्याची घटना यवतमाळ शहरातील लोहारा एमआयडीसी परिसरात असलेल्या मनोरमा जैन दालमील येथे घडली.

भावेश कडवे रा. वर्धा असे मृतक सुपरवायझरचे नाव असून मुकेश सुरेश काजले आणि सुरेश काजले रा. रायपूर खंडवा (मध्यप्रदेश) असे मृतक मजूर बापलेकांची नावे आहेत. दिलीप आणि करणसिंग धुर्वे अशी गंभीर जखमी मजुरांची नावे आहे.

माहितीनूसार, शहरातील लोहारा एमआयडीसी परिसरात मनोरमा जैन दाल मिल आहे. या दामलीवर अनेक मजूर कार्यरत आहे. नेहमीप्रमाणे कामकाज सुरू असताना डाळ साठवणुकीचे स्टोरेज अचानक सुपरवायझर भावेश कडवे आणि मजूर बापलेक सुरेश कडवे, मुकेश कडवे यांच्या अंगावर पडले. या स्टोरेजखाली दबून तिघांचाही मृत्यू झाला. तर दिलीप आणि करणसिंग धुर्वे हे दोघे मजूर गंभीर जखमी झाले असून त्यांच्या शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान घटनास्थळाचा पंचनामा करून तिन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीकरीता शासकीय रूग्णालयात पाठवण्यात आले आहे. वृत्तलिहीपर्यंत या प्रकरणी लोहारा पोलिस ठाण्यात कुठल्याही प्रकारचा गुन्हा नोंद झालेला नव्हता.

अपर पोलिस अधीक्षक पियूष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाणे, लोहारा ठाणेदार यशोधरा मुनेश्वर यांच्यासह अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर स्टोरेजखाली दबलेल्या मजुरांचे मृतदेह नागरिकांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले.

### चौंडी विकास आराखड्याला गती द्या!

सभापती राम शिंदेंचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त (३१ मे २०२५) त्यांचे जन्मगाव चौंडी (ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) येथे श्री क्षेत्र चौंडी विकास आराखड्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

विधान भवन, मुंबई येथे झालेल्या बैठकीत मुख्य सचिव सुजाता सौनिक, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे सीईओ आशिष येरेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बावीस्कर आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, चौंडी विकास आराखडा परिपूर्ण असावा. सुव्यवस्थित रस्ते, संग्रहालय, महादेव-चौंडीश्वरी मंदिरांचा जीर्णोद्धार, निवास व्यवस्था, वाहनतळ, स्थानिक उत्पादनांची बाजारपेठ यांना प्राधान्य द्यावे. अहिल्यादेवींच्या जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन संकल्पनांची जपणूक करावी. मुख्य सचिव सौनिक यांनी जिल्हाधिकाऱ्यांना चौंडी येथे बैठक घेऊन कामाला गती देण्याचे निर्देश दिले.

## लाचखोर सहायक महसूल अधिकारी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाच्या जाळयात

■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १६ :**
सातबारावर नावाची दुरुस्ती करण्यासाठी तीन हजारांची लाच स्वीकारताना आज उपविभागीय अधिकारी कार्यालयात सहायक महसूल अधिकारी सुनील होमराज लोणारे (वय ४५) याला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडले. त्याच्या घराची झडती घेण्याची कारवाई सुरू होते.

तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे केसलवाडा येथे प्लॉट असून त्यातील काही क्षेत्रफळाच्या प्लॉटची २०१७ मध्ये विक्री केली होती. परंतु, त्यावेळी चुकीने तक्रारदाराच्या पत्नीचे नाव सातबारा वरून कमी करण्यात येऊन अन्य व्यक्तीचे नाव सातबारावर चढविण्यात आले.

सातबारावर चुकीने नाव वगळल्यामुळे त्यांनी पत्नीच्या नावाची नोंद सातबारावर होण्याकरिता २४ फेब्रुवारी २०२५ रोजी केसलवाडा येथे तलाठी कार्यालयात अर्ज दिला होता. हा अर्ज पुढील कारवाईकरिता तलाठी कार्यालयातून उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे पाठविला आहे. त्या अर्जावरून दुरुस्तीसंदर्भात आदेश घेऊन सातबारावर योग्य ती दुरुस्ती करण्यासाठी सहायक महसूल अधिकारी सुनील होमराज लोणारे यांनी तीन हजार रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत ११ एप्रिल रोजी केलेल्या पडताळणीत त्यांनी ३००० रुपयांची पंचा समक्ष मागणी केली.


त्यावरून आज, मंगळवारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा कारवाई करून सुनील हेमराज लोहारे यांनी पंचा समक्ष स्वतःच्या कार्यालयात तीन हजार रुपये लाच स्वीकारली. पथकाने त्यांना ताब्यात घेतले असून भंडारा पोलिस स्टेशन भंडारा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच आरोपीच्या घराची झडती घेतली जात आहे.

ही कारवाई पोलिस उपअधीक्षक डॉ. अरुण कुमार लोहार यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक मयूर चौरसिया, पोलिस हवालदार मिथुन चांदेवार, अतुल मेश्राम, शिपाई विष्णू वरठी, नरेंद्र लाखडे यांनी केली.

## मंगेशकर कुटुंबाचे मौन अत्यंत अमानुष

### काँग्रेस प्रदेशाध्यक्षांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :**
तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात मंगेशकर कुटुंबाने बाळगलेले मौन अत्यंत अमानुष असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. तनिषा भिसे यांना दीनानाथ रुग्णालयात तब्बल साडेपाच तास ताटळकत ठेवण्यात आले. त्यामुळे त्यांचा हकनाक बळी गेला. मातृत्वासाठी आसुसलेल्या महिलेचा अशा पद्धतीने बळी जाणे अत्यंत हृदयद्रावक आहे, असे ते म्हणालेत.



तनिषा भिसे नामक गरोदर महिलेला दीनानाथ रुग्णालयात गंभीर स्थितीत प्रसूतीसाठी आणण्यात आले होते. पण रुग्णालय प्रशासनाने त्यांना १० लाखांचे डिपॉझिट भरल्यानंतरच दाखल करून घेण्याची भूमिका घेतली होती. परिणामी, उपचारास विलंब झाल्यामुळे तनिषा यांचा मृत्यू झाला. हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी उपरोक्त शब्दांत आपला संताप व्यक्त केला.

ते म्हणाले, मंगेशकर कुटुंब हे महाराष्ट्र व भारताचे भूषण आहे. आतापर्यंतच्या सर्वच सरकारांनी त्यांचे हे योगदान मान्य केले आहे. दीनानाथ रुग्णालय बांधत असताना तत्कालीन सरकारने मंगेशकरांना मोठी मदत केली. तनिषा यांना तब्बल साडेपाच तास ताटकळत ठेवण्यात आले. त्यातून त्यांचा बळी गेला. मातृत्वासाठी आसुसलेल्या एखाद्या महिलेचा असा बळी जाणे अत्यंत हृदयद्रावक आहे.

### काँग्रेसचे आंदोलन बेगडी

रावसाहेब दानवे यांचे टीकास्त्र

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :**
नॅशनल हेराल्ड प्रकरणात मालमत्ता हडपणाऱ्या काँग्रेसच्या आंदोलनाला भाजपाचा कडवा विरोध असून, हे आंदोलन बेगडी असल्याची घणाघाती टीका भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केली.

बुधवारी मुंबईतील प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. दानवे म्हणाले, ह्लकाँग्रेसला आंदोलनाचा अधिकार आहे, पण कोणाचीही मालमत्ता आणि निधी लुटण्याचा अधिकार नाही. काँग्रेसने यंग इंडिया कंपनी स्थापन करून मालमत्तेचा दुरुपयोग केला, जमीन हडपली, असा आरोप रावसाहेब दानवे यांनी केला.

## शेतकऱ्यांच्या अनुदानात ५० कोटींचा भ्रष्टाचार?

### जयंत पाटलांचा सरकारवर हल्लाबोल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :**
अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने जाहीर केलेल्या सानुग्रह अनुदानात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या अनुदानातून तब्बल ५० कोटी रुपये अधिकाऱ्यांनी लंपास केल्याची माहिती थेट उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी दिली आहे. या प्रकरणावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत, इथे कुंपणच शेत खात आहे, असे म्हटले आहे.



जयंत पाटील यांनी आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून सरकारला लक्ष्य करत एक पोस्ट शेअर केली. त्यात ते म्हणाले, अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे मोठे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने सानुग्रह अनुदानाची घोषणा केली होती. पण या मंजूर अनुदानातून जवळपास ५० कोटी रुपये अधिकाऱ्यांनी लंपास केल्याची माहिती उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनीच दिली आहे. तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यकांनी शेतकऱ्यांच्या या पैशावर डल्ला मारला आहे. या प्रकरणाची सत्यता शासनाने पडताळावी आणि दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.

जयंत पाटील यांनी पुढे सवाल उपस्थित करताना म्हटले, चारही बाजूंनी शेतकऱ्यांना लुटण्याचे काम सुरू आहे. सरकार आत्मचिंतन करणार का? कारण इथे कुंपणच शेत खात आहे. त्यांच्या या वक्तव्याने राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नव्या चर्चेला तोंड फोडले आहे. शेतकऱ्यांसाठी जाहीर झालेल्या मदतीतच भ्रष्टाचार होत असेल, तर सरकारचा दावा कितपत खरा आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या विषयावरून त्यांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.

## पिडीत महिलांसाठी हक्काचे माहेर

: लोकसेवार्थ :

लोकजागर



माहेर या संस्थेची स्थापना पुण्याजवळ वढू बुद्रुक येथे सिस्टर लुसी कुरियन यांनी १९९७ साली त्याची स्थापना केली. त्याचा अनेक संस्था आहेत रांची, रत्नागिरी, एनार्कुलम येथील दुर्गम भागामध्ये काम करतात. एक आंतरधर्मीय आणि जाती-मुक्त भारतीय गैर-सरकारी संस्था आहे. या संस्थेचे उद्दीष्ट निराधार महिला व बालकांसाठी आश्रय व मदत देणे हा आहे.

१९९१ मध्ये, जेव्हा सिस्टर लुसी एच.ओ.पी.ई. संस्थेसाठी काम करत होत्या तेव्हा एक गर्भवती महिला त्यांना मदत मागायला आली. तिच्या पतीने दुसरी महिला घरी आणण्यासाठी तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. सिस्टर लुसी तिला काही मदत करू शकली नाही, परंतु पुढील दिवसासाठी तिच्यासाठी काही प्रयत्न करून काहीतरी करण्याचे आश्वासन दिले. सिस्टर लुसी म्हणतात की, मला एका सुरक्षित वातावरणात वाढवलं गेलं आणि मला माहित नव्हतं की एका रात्री एक स्त्रीच्या जीवनात इतका फरक पडू शकतो. आम्ही तिला हॉस्पिटलमध्ये नेले पण ती मरण पावली. या अनुषंगाने सिस्टर लुसी यांनी माहेरचा शोध लावण्याचा निर्णय घेतला, स्त्रियांना अशी दयनीय स्थितीत मदत करण्यासाठी आवश्यक पाठिंबा मिळण्यासाठी सात वर्षे लागली, परंतु २ फेब्रुवारी १९९७ रोजी पुण्याच्या बाहेरील वढू बुद्रुक गावात प्रथम माहेर घराचे दरवाजे उघडले.

माहेर संस्थेची संथापक सिस्टर लुसी कुरियन ह्या आहेत. सिस्टर लुसी यांनी १ घर, ३ रहिवासी अशी अनिश्चित विषमतेपासून सुरुवात केली. आज माहेरचे डॉक्टर, सामाजिक कार्यकत, शिक्षक, ट्रस्टीज, व्यवसायिक, स्वयंसेवक इ.च्या प्रेमळ सैन्याने ४३ घरे संचालित केली आहेत. माहेर संस्थेमध्ये सध्या १२०० रहिवाशी आहेत. त्यातील ८६० मुले, ३०० महिलांसह १२० मानसिक आजार असलेल्या महिला आणि ७१ मानसिकरित्या वयस्कर पुरुष आहेत. तसेच स्वयं-मदत गट, ग्रंथालय वाचनालय इत्यादीसारखे समुदाय कार्यक्रमाद्वारे हजारो जण पोहोचले आहेत.

धर्म, लिंग, जात, रंग, पंथ किंवा सामाजिक प्रतिष्ठा याकडे दुर्लक्ष करून माहेर संस्थेमध्ये सर्वांचे स्वागत आहे. माहेरमधील मुले रस्त्यावरून आणि झोपडपट्ट्यांतून येतात, समाजामध्ये भीक मागू नयेत, आईवडील त्यांना काळजी घेण्यास असमर्थ असतात, इतर संस्थांनी त्यांना नाकारले आहे. अशी मुले माहेर मध्ये अल्प किंवा दीर्घकालावधी साठी राहतात, आणि जोपर्यंत ते माहेरमध्ये राहतात तोपर्यंत त्यांचे शालेय शिक्षण, शिकवणी, उत्कृष्ट पोषण, ध्यान, कलात्मक प्रोग्रामिंग ई. सर्व गोष्टी त्यांना शिकवल्या जातात. ते शोकांतिकातून येतात आणि कुटुंब, प्रेम आणि उज्ज्वल भवितव्य दर्शवितात.

प्रत्येक स्त्रीला वैयक्तिकरित्या समर्थन देण्यात येते, मग ते कुटुंबाबरोबर सलोख्याचे आणि पुनर्मंचन करून, नोकरी-प्रशिक्षण किंवा शालेय शिक्षण माध्यमातून स्वतःचा व्यवसाय असो किंवा माहेरच्या आत नोकरी. तथापि, काही जणांच्या भूतकाळातील मानसिक आजारामुळे फारच छान झाले आहे. अशा पुरुष आणि स्त्रियांना मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या माहेरमध्ये दोन घरे आहेत, वैद्यकीय व मनोरंजक अशा लोकांची काळजी घेतात.समाजातील अत्याचाराने पिडीत,अबला महिलांना आधार देणाऱ्या माहेर संस्थेचे हे कार्य नक्कीच प्रेरणादाई आहे.

■ ■

**शब्दार्थ**

**NCC**

NCC या शब्दाचा इंग्रजी भाषेत Full Form National Cadet Corps हा आहे. NCC ला मराठी भाषेत राष्ट्रीय विद्यार्थी सैनिक दल असे म्हणतात. आपल्याकडे NCC शब्दाला हिंदी भाषेत किंवा त्यांच्या पत्रव्यवहार भाषेत राष्ट्रीय सैनिक छात्र दल म्हणून ओळखले जाते. NCC महाविद्यालयात असताना आपल्याला सतत शिस्त आणि ध्येयाकडे लक्ष केंद्रित असणारे आर्मी सारखे राहणारे काही युवक दिसत असतात. महाविद्यालयात असताना देशसेवेसाठी एक प्रेरणा निर्माण करण्यासाठी आणि मुलांना आर्मीच्या शिस्तीसाठी तयार करायल NCC ला सुरुवात झाली.

## सजावटीचा नवा ब्रँड



संस्कृती स्त्रीला देवी मानणारी आहे, आपल्या महिला आज कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. यातीलच एक क्षेत्र आहे व्यवसाय क्षेत्र.याच व्यवसाय क्षेत्रात जिद्दीने उभ्या राहून आभाळा एवढ यश मिळवणाऱ्या चंद्रप्रभा यांची ही यशोगाथा.

वयाच्या अशा टप्प्यावर, जेव्हा बहुतांश लोक निवृत्तीचा विचार करतात, ७० वर्षीय चंद्रप्रभा परिहार आज आपल्या व्यवसायात यशस्वीपणे पुढे वाटचाल करत आहेत. चंद्रप्रभा यांना प्रेमाने ह्यआबाह्न म्हटलं जातं. मुंबईत राहणाऱ्या आबांनी दीड वर्षांपूर्वी क्रोशिया कलेचा वापर करून बॅग्स, टोप्या, घरातील सजावटीच्या वस्तू आणि राख्या बनवायला सुरुवात केली आणि नेहर या नावाने आपल्या ब्रँडची ओळख निर्माण केली.

त्यांना लहानपणापासूनच विणकामाची आवड होती, पण त्या कलेला व्यवसायात रूपांतर करण्याचा विचार त्यांनी कधीच केला नव्हता. त्यांनी २० वर्षांपूर्वी या कलेत डिप्लोमा घेतला होता, पण कुटुंबाच्या गरजांमध्ये स्वतःचे स्वप्न साकार करण्याची संधी त्यांना कधी मिळाली नाही. मात्र, त्यांच्या सून स्वाती यांनी पाठिंबा दिल्यामुळे हे स्वप्न प्रत्यक्षात आणता आले. व्यवसायाचा विचार तेव्हा सुरु झाला जेव्हा आबांच्या भाचीने त्यांच्या बनवलेल्या बॅग्स ऑफिसमध्ये नेल्या आणि सहकाऱ्यांनी अशाच बॅग्स बनवण्याची मागणी केली.या मागणीने त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि लवकरच त्यांना ऑस्ट्रेलियातून मोठी ऑर्डर मिळाली. यानंतर स्वातीने कंपनीची अधिकृत नोंदणी केली आणि वेबसाइट व इंस्टाग्राम पेज सुरु केले.आज आबा स्वतः प्रत्येक ऑर्डरवर काम करतात आणि एक यशस्वी उद्योजक म्हणून पुढे येत आहेत.

परिस्थिती काहीही असो, वय कितीही असो, मात्र एखादी गोष्ट ठरवली की, आपण सर्व अडचणींवर मात करून यश प्राप्त करू शकतो. यातच जर कुटुंब आणि घर सांभाळणाऱ्या महिला असतील आणि त्यांनी काहीतरी करण्याचं ठरवलं, तर त्या आपल्या जिद्दीच्या बळावर सगळ्या अडथळ्यांचे डोंगर पार करून यश मिळवतात. नारी समाजस्य कुशलवास्तुकारा... या उक्तीप्रमाणे नारी ही समाजाची कुशल वास्तुकार आहे आणि आपली

■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## बीड जिल्ह्यात सीआयआयआयटी स्थापन करण्याचा निर्णय

### टाटा टेक्नॉलॉजीचे पवारांना पत्र



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :**
बीड जिल्ह्यात सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अँन्ड ट्रेनींग अर्थात (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी केल्यानंतर अवघ्या दोन आठवड्यांच्या आतच टाटा टेक्नॉलॉजी कंपनीने १९१ कोटी रुपये खर्चून नवीन सीआयआयटी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. तसे पत्र कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले आहे.

नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या निर्णयक्षम कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. धडाडीने निर्णय घेणे आणि नियोजित वेळेत यशस्वी अंमलबजावणी करणे, अशी त्यांच्या कामाची पद्धत आहे. त्याचा प्रत्यय पुन्हा आला आहे.

पालकमंत्री म्हणून आजित पवार यांनी २ एप्रिल २०२५ रोजी केलेल्या बीड जिल्ह्याचा दौऱ्यात बीड जिल्ह्यातील युवकांसाठी सीआयआयआयटी स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने त्यांनी ह्यटाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून सहकार्य करण्याचे आवाहन केले होते.

## विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये ट्रॅक्टर मोर्चा



■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १६ :**
विदभार्तील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कृती करणार आहे. पक्षाने २ मे रोजी विदभार्तील सहा जिल्ह्यांमध्ये ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन केले आहे.

शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी अमरावतीत झालेल्या विभागीय निर्धार मेळाव्यात या मोर्चाची घोषणा केली. अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये हा मोर्चा निघणार आहे. मोर्चाच्या यशस्वी आयोजनासाठी बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी जबाबदारी स्वीकारली आहे. पक्षाने ५ हजार गावांमध्ये निर्धार सभा घेण्याचे नियोजन केले आहे. या मोर्चात सुमारे ५ लाख शेतकरी सहभागी होतील असा अंदाज आहे.

सावंत यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर टीका केली. शेतकऱ्यांची स्थिती दयनीय झाली असून शेतमालाला भाव मिळत नाही. बी-बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या किमतींवर नियंत्रण नाही. या सर्व समस्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. शासनाला या आंदोलनाची दखल घ्यावीच लागेल. हे आंदोलन शिवसेना पक्षासाठी राज्यभरात दिशादर्शक ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या मेळाव्यात आमदार नितीन देशमुख यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर विखारी टीका करत त्यांना भगव्याच्या आत दडलेले सैतान असे संबोधले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. कार्यक्रमाला खासदार संजय देशमुख, आमदार गजानन लवटे, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार संजय दरेकर यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.